**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९६७/०२,**

**श्रीमती सुचेता संजीव राऊत,**
**द्वारा श्री.शं.गो वराडकर,**
**फ्लॅट नं.४,सहवास को.ऑप.हौ.सो.,**
**रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग(कामगार(६),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती सुचेता संजीव राऊत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३०.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१०.७.०८ व १२.१०.०८ रोजी अर्ज करुन तक्रारदाराच्या राजीनामा मागे घेण्याच्या विनंतीचा विचार का झाला नाही याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२२.७.०९ च्या पत्रानुसार खाली नमूद केल्यानुसार माहिती पुरविली.

तक्रारदाराचा राजीनामा स्वीकारण्याबाबत प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांना दि.४.१२.९३ रोजी केलेल्या विनंती अर्जानुसार प्रबंधक, औद्योगिक न्यायालय,मुंबई यांनी आपला राजीनामा स्वीकृत करुन तक्रारदारास दि.४.१२.९३ पासून शासकीय सेवेतून कार्यमुक्त केले आहे. तसेच, रिक्त झालेल्या पदावर अन्य उमेदवाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यानंतर तक्रारदाराचा राजीनामा रद्द करण्याबाबत केलेला विनंती अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. याबाबत तक्रारदाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे केलेला विनंती अर्जही फेटाळण्यात आलेला आहे. तद्नंतर याबाबत तक्रारदाराने औद्योगिक न्यायालयाकडे केलेल्या दि.५.११.९६च्या विनंती अर्जास अनुसरुन औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी दि.५.५.९७ अन्वये

तक्रारदारास उचित उत्तर दिलेले आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणी तक्रारदारास दि.१२.४.०७ रोजी माहितीच्या अधिकारान्वये दिलेल्या अर्जासही प्रबंधक, औद्योगिक न्यायालय,महाराष्ट्र, मुंबई यांचेकडून त्यांच्या दि.२९.५.२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविलेली आहे.

गैरतक्रारदाराने पुरविलेलया माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने प्रतिपादन केले की, तक्रारदाराच्या राजीनामा स्विकारण्याच्या विनंती अर्जानुसार प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी तक्रारदाराचा राजीनामा स्विकारला. तसेच तक्रारदारास शासकीय सेवेतून कार्यमुक्त केले. त्यामुळे राजीनामा रद्द करण्याचा तक्रारदाराचा विनंती अर्ज नामंजूर केला. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ५.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९६३/०२,**

**श्री. मदन मोहन मिश्रा,**
**१९/३, नरहर सदन, तळमजला,**
**एस.व्ही.रोड,जवाहन नगर, गोरेगाव(प.),**
**मुंबई-४०००६२** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.)**
**सहाय्यक पालिका आयुक्त पी/दक्षिण वार्ड यांचे कार्यालय,**
**मीठानगर म्युनिसिपल स्कूल बिल्डिंग,मीठानगर,**
**गोरेगाव(प.), मुंबई-४०००६२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.मदन मोहन मिश्रा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२३.७.०७ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

९जानेवारी,१९९५ पासून १ सप्टेंबर,२००६ पर्यंत कलम ४८८ नुसार किती नोटीसा जारी केल्या, निष्कासनाचे किती आदेश पारीत केले, किती निष्कासन कारवाई झाल्या, किती सुनावणी आदेश प्रलंबित आहेत व प्रलंबित आदेशावर काय कारवाई झाली, जवान नगर या विभागात एकूण ४५० इमारती आहेत त्या सर्व नियमाप्रमाणे बांधल्या आहेत का? संबंधीत जमिनीबाबत काय कारवाई करण्यात आली? इमारतीमध्ये असलेले गॅरेज नियमाप्रमाणे आहे किंवा त्याचा दुरुपयोग केला जात आहे, नसेल तर काय कारवाई करण्यात आली? जैन मंदिर बद्दल काय कारवाई करण्यात आली नाही, महानगरपालिकेचे नगरसेवक दिलीप पटेल यांच्यावर का कारवाई केली नाही याबाबत माहिती मागीतली होती.

तक्रारदाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही. तक्रारदाराने विशिष्ट स्वरुपाच्या माहितीची मागणी करावी असे गैरतक्रारदाराने दि.९.८.२००७ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले.

यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००८/२९७/०२ व अपील क्र.२००८/९८५/०२ ही दाखल केली होती. त्यावर आयोगाने आदेश पारित केले. त्यानंतर तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर तक्रार प्रकरणी मी असे आदेश देतो की, जैन मंदिरासंबंधी कलम ३५१ अनुसार दिलेल्या नोटीसची प्रत गैरतक्रारदाराने तक्रारदारास हे आदेश प्राप्त झल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक २.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९५४/०२,**

**श्री. पी.एस.गोपीनाथन,**
**३०४,रचना-II, बापूसाहेब जुवेकर मार्ग,**
**भांडूप(पूर्व), मुंबई-४०००४२. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरिक्षक,**
**जुने जकात घर,शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-२३ ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.पी.एस.गोपीनाथन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१२.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१०.९.०९ रोजी अर्ज करुन त्यांचा दस्त क्रमांक बबम-१/३९५६/९३ हा तत्कालीन दुय्यम निबंधक, मुंबई यांचे कार्यालयात नोंदणीसाठी दि.७.१२.१९९३ रोजी दाखल केला होता, याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे बबम-१/३९५६/९३ हा तत्कालीन दुय्यम निबंधक, मुंबई यांचेकडे कार्यालयात नोंदणीसाठी दाखल केला होता. परंतू सदर दस्त हा मुल्यांकन होऊन कमी भरलेली मुद्रांक शुल्क व नोंदणी फी तसेच दंड वसूलीसाठी प्रलंबित होता. सदर वसूलीची कार्यवाही दि.३.४.२०१० रोजी पूर्ण झाल्यानंतर त्याच दिवशी दि.३०.४.२०१० रोजी या दस्ताची नोंदणी पूर्ण करण्यात आली. सदर दस्ताची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर तक्रारदार यांना दस्ताची व सूची क्र.२ ची प्रमाणित प्रत विहित शुल्क घेऊन देण्यात आली आहे असा गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ४.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९५७/०२,**

**डॉ. श्री. मनोज कारंडे,**
**१,ज्योत्स्ना प्रकाश,सिंडीकेट बँकेच्या समोर,**
**स्टेशन रोड,गोरेगाव(पूर्व),**
**मुंबई-४०००६३.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका के/पश्चिम वॉर्ड ऑफीस,**
**१ला मजला,आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(पश्चिम), मुंबई-४०००५०.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार डॉ.श्री. मनोज कारंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन जे.पी.रोड अंधेरी(प.) मुंबई येथील सी.टी.सर्व्हे क्रमांक १९५(पार्ट) सर्व्हे क्र.१०६अे, डी.एन.नगर के-३/के-४ येथील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/१९२०/०२ दाखल केले होते. तक्रारदाराने संबंधीत कागदपत्राची पहाणी करुन एकूण १२ मुद्यांवर माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती ३० दिवसाचे आत पुरवावी असे आयोगाने दि.२६.२.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली. कांही मुद्यांवर गैरतक्रारदारान माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तसेच माहिती निःशुल्करित्या मागीतली.

तक्रारदारास गैरतक्रारदाराने संबंधीत फाईल निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन दिली होती. तक्रारदाराने निरिक्षणाच्यावेळी निवड केलेली उपलब्ध माहिती तक्रारदारास गैरतक्रारदाराने पुरविली असल्याचे तसेच सदर माहिती निःशुल्करित्या पुरविली असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन एकदा तक्रारदारास निःशुल्करित्या उपलब्ध माहिती पुरविली आहे. कागदपत्रांवर जी माहिती उपलब्ध नाही अशी कांही माहिती मिळविण्याच्या प्रयत्नात तक्रारदार आहेत असे दिसते. अधिनियमातील तरतुदीनुसार गैरतक्रारदाराने विहित शुल्क आकारुन उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ४.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/२८८/०२,**

**श्री. निखील गांधी,**
**१८५-ए,श्रीशिवम को.ऑप.हौ.सो.लि.,**
**फ्लॅट क्र.ए/७,३रा मजला, एस.व्ही.रोड,**
**विले पार्ले(प.), मुंबई-४०००५६.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,**
**डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार,कोऑपरेटीव्ह बोर्ड(३),**
**रुम नं.६९, गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. निखील गांधी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२१.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन श्री.शिवम सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य श्री.एम.एन.भट आणि श्रीमती मीनल शाह या सदस्यांविरुध्द केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली हाती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयागाकडे क्र.२००९/२८८/०२ ही तक्रार दाखल केली होती. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.९.९.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०१ अनरुसार गैरतक्रारदाराने आदेश पारित केले आहेत. याबाबत तक्रारदारास कळविण्यात आले असल्याचे गैरतक्रारदार तथा उपनिबंधक सहकारी संस्था के-पश्चिम श्री.राजेंद्र वीर आणि श्री.प्रसाद ओक यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले.सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली आहे या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ३.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९६०/०२,**

**श्री. पी.पी.चिलमुलवार,**
**३०२,रामेश्वर भवन, पोखरण रोड नं.१,**
**समता नगर, ठाणे(प.), पिन-४००६०६. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(पोल-१०),**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. पी.पी.चिलमुलवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२१.८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन तक्रारदाराने लिपिक म्हणून १५ वर्षे शासन सेवा केली होती. निवृत्तीवेतन मिळावे म्हणून त्यांनी सन १९७८,१९८५ व २००० मध्ये अर्ज केले, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत समाधानकारक माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने दि.२६.१.०७ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१५.२.०७ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नाही म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

प्रथम अपीलावरील सुनावणीच्या दरम्यान तक्रारदाराने असे मुद्दे उपस्थित केले की, त्यांच्या प्रकरणासंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा नियम-४ अन्वये (एखाद्या कर्मचा-यास वाजवी तोशीश पडत असल्यास ती दूर करण्याची तरतूद)जी तरतूद करण्यात आली आहे तीचा फायदा त्यांना मिळावा. असा फायदा श्री.पी.एम.चव्हाण,सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्यासंदर्भात देण्यात आला आहे. त्यांनी पुढे असाही मुद्दा उपस्थित केला की, ओ.पी.मौर्य प्रकरणात अलाहाबाद न्यायालयाने असे मत दिले आहे की, राजीनामा ही स्वेच्छा सेवानिवृत्तीच आहे. त्यामुळे राजीनामा दिलेल्या कर्मचा-यास सेवानिवृत्तीविषयक लाभापासून वंचित ठेवता येणार नाही. या मुद्याबरोबर त्यांनी कार्यासन पोल-१० च्या संबंधीत नस्तीचे पूर्णतः अवलोकन केले व तद्नंतर त्यांनी समाधान व्यक्त करतांना असे मत व्यक्त केले की, गृह विभागाने तक्रारदाराची बाजू पूर्णतः मांडलेली असून त्या अनुषंगाने नस्तीचे अवलोकन करता, आता तक्रारदाराचा गृह विभागाबद्दल तसेच माहिती अधिकारी, कार्यासन पोल-१० यांच्याबद्दल कोणताही दुराग्रह नाही. गृह विभागाने केलेल्या कार्यवाहीबद्दल तक्रारदार पूर्ण समाधानी आहे.तक्रारदाराची नस्ती पुनश्च वित्त विभागास पाठवितांना वरील दोन मुद्यांचा उहापोह आवश्य करावा अशी विनंती केली.

वरील विवेचन लक्षात घेता तक्रारदारास संबंधीत फाईल गैरतक्रारदाराने निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन दिली होती. तक्रारदारास निवडक कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यात आल्या असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९६१/०२,**

**श्री. संजय पांडूरंग कोटी,**
**रुम नं.बी-६४७, बेठलेगाम चाळ,**
**शिवाजी को.ऑप.हौ.सो.,खांबादेवी रोड,**
**धारावी, मुंबई-४०००१७. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,**
**४था मजला, ४९खेरवाडी,अलीयावर जंग मार्ग,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. संजय कोटी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.६.१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.५.७.२००८ रोजी अर्ज करुन एस.एच.जोंधळे,डोंबिवली(पूर्व)ठाणे या पॉलीटेक्नीक कॉलेजबाबत एकूण ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सिव्हील इंजिनिअरींग करीता प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी,उर्वरीत वर्षाची विद्यार्थ्यांकडून फी वसूल करण्याचे संस्थेला दिलेले अधिकारपत्र, परिपत्रकाची साक्षांकित प्रत इत्यादी माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती देणेबाबत कार्यालयाचे पत्र क्र.१०/एनजीसी/म.अ./२००८/४०५, दि.१.८.२००८ अन्वये सहसंचालक,तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय, मुंबई यांना देण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी सदर माहिती तक्रारदाराने सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचेशी संपर्क साधून त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे गैरतक्रारदाराने दि.६.८.०८च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने दि.२०.१०.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांनी तक्रारदाराचा अपील अर्ज महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे दि.८.७.०८ च्या पत्रान्वये हस्तांतरीत करुन तक्रारदारास अवगत केले.तसेच माहिती प्रापत करुन घेण्याकरीता त्यांचेशी परस्पर संपर्क साधावा असे तक्रारदारास कळविले. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदारान तक्रारदारास माहितीच्या अधिकारातील अर्ज त्यांचे कार्यालयाशी संबंधीत नसल्याने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाकडे नियमानुसार पुढील कारवाईकरीता हस्तांतरित केला व त्याबाबत तक्रारदारास अवगत केले. यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)ची पूर्तता करण्यात आली आहे. गैरतक्रारदाराने अर्जावर तक्रारदारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**      **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३.६.२०१०**      **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क.२०१०/९३२/०२,

श्री. रमेश मधुकर साळवे,
विक्रोळी स्टेशन रोड,हरियाली व्हिलेज,
फणसेकर चाळ मास्टर पॅलेस गल्लीत,
विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. ..... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, मुलुंड,
टोपीवाला कॉलेज समोर,मुलुंड(प.),
मुंबई-४०००८०. ..... उत्तरवादी

## विवेचन

तक्रारदार श्री. रमेश साळवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१२.३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन टागोर नगर, विक्रोळी(पूर्व) येथील नाला रुंदीकरणाची पात्र व अपात्र तसेच अनिर्णीत झालेल्या प्रकल्पग्रसतांची यादी सहीनिशी दि.२१.११.०८ रोजी प्रसिध्द केली. प्रसिध्द केलेल्या यादीची नक्कल प्रत व अपात्र केलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या कागदपत्रांच्या साक्षांकित नक्कल प्रतीची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास उडवाउडवीची उत्तरे देऊन फसगत करणे व चुकीची अर्धवट माहिती व अनावश्यक माहिती तक्रारदाराच्या माथी मारण्याचा प्रयत्न करत आहेत. तक्रारदारावर दबाव तंत्राचा वापर अवलंबून तक्रारदाराचे मानसिक खच्चीकरण करीत असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली.

गैरतक्रारदार तथा उपजिल्हाधिकारी श्री.शिवाजीराव दावभट हे स्वतः तक्रारदारावर अधिकारपदाचा गैरवापरदकरुन तक्रारदाराचे मनोबल खच्चीकरण करणे व तक्रारदार करत असलेल्या कार्यात अडथळा निर्माण करणे,तक्रारदाराकडून होत असलेल्या चौकशीला हेतुपुरस्सर खुंटी करणे असा खोडसाळपणा करतात, त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करावी असे तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादनकेले. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही असेही तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादनकेले. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २०१०/४४३०/०२

श्री. महावीर प्रसाद सैनी,
हॉटेल प्रेसिडेंट, महाराष्ट्र नगर,
वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. .... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण(एस.आर.ए.),
गृहनिर्माण भवन,५वा मजला,
वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.

जन माहिती अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण(एस.आर.ए.),

**गृहनिर्माण भवन,५वा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

## विवेचन

अपीलकार श्री. महावीर प्रसाद सैनी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.४.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१.२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र नगर,आंबेडकर नगर सी.टी.एस.-६२९ येथील प्रस्तावित योजनेत सहभाग घेतलेल्या पाच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ बाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे क्रमांक २००८/१६८४/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी आवश्यक ते आदेश ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन पारीत करावेत असे दि.३१.१.०९ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते व अपील रिमांड केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १ जून,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पाच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२बाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री.संजय रो.निर्मल यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४३९६/०२**

**श्री. अर्जूनलाल एम.छाब्रीया,**
**बेला व्हीस्टा, फ्लॅट नं. १५,**
**३रा मजला, लेक व एल.आय.सी.ऑफीसच्या समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**

**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अर्जूनलाल छाब्रीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.११.२००९ रोजी अर्ज करुन ओशिवरा पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि.च्या कलम ४९८-अ,४०६ अन्वये श्री.सय्यद मजीब उर रहमान व इतर ६ यांचेविरुध्द नोंदविण्यात आलेल्या गुन्हा क्र.३१२/०९ च्या एफ.आय.आर.ची प्रत व यामध्ये केलेल्या कारवाईच्या तपशिलाची मागणी केली होती. माहितीचा विषय जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,ओशिवरा पोलीस स्टेशन, मुंबई यांचेशी संबंधीत असल्यामुळे अपीलकाराचा अर्ज पुढील कारवाईकरीता पाठविला व तसे अपीलकारास कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागीतली होती. सहाय्यक पोलीस आयुक्त व माहिती अधिकारी,पश्चिम नियंत्रण कक्ष, बांद्रा(प.),मुंबई यांनी अपीलकारास समाधानकारक माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन दि.२५.१.२०१० रोजी तसे आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १ जून,२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन ओशिवरा पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्हा क्र.३१२/०९ बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने लेखी अहवाल सादर केला. सदर प्रकरण पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-९, बांद्रा(प.),मुंबई यांच्याशी संबंधीत होते असे प्रतिपादन केले. अपीलकारास अर्जातील मुद्यावर खुलासेवार माहिती पुरविली असल्याचे पत्र जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,पश्चिम नियंत्रण कक्ष, बांद्रा(प.) यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर अहवालाचे अवलोकन केले असता अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याची प्रथम अपीलीय अधिका-यांनी पोचपावती आयोगास सादर केली. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांकः२.६.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९६९/०२,**

**श्री. शिवानंद आर.अंकोलेकर,**
**ए-८,एम.आय.डी.सी.,फ्लॅटेड फॅक्टरी,**
**एल.बी.एस.मार्ग, वागळे इस्टेट,**
**ठाणे(प.)-४००६०४. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(विधी),**
**एम.आय.डी.सी.,उद्योग सारथी,महाकाली केव्हज रोड,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०० ०९३. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.शिवानंद अंकोलेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.८.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्ररदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.७.०८ रोजी अर्ज करुन श्री.टी.के.यादव,तत्कालीन कार्यकारी अभियंता महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळ,डोंबिवली यांनी यचिका क्र.६१८/१९९२ मध्ये दाखल केलेल्या शपथपत्राची प्रत मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली.सदरहु प्रकरणाचे संदर्भात नस्तीची पहाणी कार्यालयीन दप्तरात केली. परंतु सदरहू प्रकरणातील मागणी केलेले शपथपत्र उपलब्ध नसल्याचे आढळून आले. त्यामुळे तक्रारदारास माहिती पुरविता आली नसल्याचे प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने प्रतिपादन

केले. सदर माहिती उपलब्ध होणेकरीता सर्वतोपरी प्रयत्न करण्यात यावेत व एक महिन्याच्या कालावधीत विधी विभागातील श्री.एस.एन. कोरे माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(विधी) यांनी तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा तसा अहवाल सादर करावा असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.६.५.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. राज्य माहिती आयोगाकडील तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली तसेच टपालातून तक्रारदारास माहिती पाठविली असता ती त्यांनी स्विकारली नाही असे आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगासमक्ष तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ५.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९५६/०२,**

**श्री. प्रविण महादेव दळी(Dali),**
**अे/६०३, मालती को.ऑप.हौ.सो.,**
**मिठानगर,म.गांधी रस्ता, गोरेगाव(प.),**
**मुंबई-४०००६२.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(१४-स),**
**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.प्रविण महादेव दळी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.६.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१३.४.०९ रोजी अर्ज करुन दि.७.११.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००८/३३८४/०२ दाखल केले होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती १५

दिवसाचे आत पुरवावी असे आयोगाने दि.२३.१०.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव श्री.चौधरी यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ७.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५३३/०२,**

**डॉ.श्री. एन. सेकर,**
**ई-११/१२, श्रावस्ती को.औप.हौ.सो.,**
**गोरेगाव-मुलुंड लिंक रोड(युग धर्मा टॉवरच्या समोर),**
**ऑफ लिंक रोड, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट रजिस्ट्रार(ॲडमिनिस्टेशन),**
**इन्स्टिटयुट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी,नथाला पारिख मार्ग,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार डॉ.एन.सेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.१२.०८ रोजी अर्ज करुन तक्रारदाराच्या प्रोफेसर पदावरील पदोन्नतीबाबत एकूण ८ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दि.६.१.०९ च्या पत्रान्वये तक्रारदारास मुद्देनिहाय माहिती दिली. पदोन्नती समितीच्या अहवालाची प्रत दिली नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे तक्रारदारास कळविले. यामुळे तक्रारदाराने दि.२३.१.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी तक्रारदारास गैरतक्रारदाराने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन

अपील फाईल करण्यात येत असल्याचे दि.२४.२.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराच्या दि.१६.३.०९ च्या तक्रारीवरील सुनावणीचे पत्र तक्रारदारास दि.१९.५.०१० रोजी पाठविले असता तक्रार मागे घेत असल्याचे तक्रारदाराने यापूर्वीच पत्र पाठविले असून सदर पत्र गैरतक्रारदाराने दि.२८.४.२०१० च्या पत्रासोबत आयोगास सादर केले. यावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली तक्रार मागे घेतली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक ७.६.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९८३/०२,**

**श्री.सच्चिदानंद चं.राजपूरकर,**
**द्वारा- परिवहन आयुक्त कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत,४था मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा समुपदेशक,**
**महिलांसाठी आधार केंद्र,स्वाधार,**
**केशव गोरे स्मारक ट्रस्ट,**
**स्मृती आरे रोड,गोरेगाव(प.), मुंबई४४०००६२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.सच्चिदानंद राजपूरकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१३.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.११.९.०७ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)आरे दुग्ध वसाहतीमधून माझे विरोधात तक्रार अर्ज आला आहे का त्याची प्रत

२)पत्नीच्या तक्रारीनंतर आपल्या संस्थेच्या काही समुपदेशिका/समाजसेविका/पदाधिकारी माझे निवासस्थानी प्रत्यक्ष येऊन त्यांनी भेट देऊन गेल्यावर त्यांनी केलेल्या चौकशीची व त्याबाबत नोंदविलेला अभिप्राय,कार्यवाहीच्या निष्कर्षासह माहितीची प्रत देण्यात यावी.

३)सदर तक्रार अर्जावर आपण प्रत्यक्ष केलेल्या कार्यवाहीचा लेखी तपशील देण्यात यावा.

४)सदर प्रकरण आपण स्वत:हून बंद केले की पत्नीने तक्रार अर्ज मागे घेतला? आपण प्रकरण बंद केले असेल तर कुठल्या आधारावर बंद केले? किंवा पत्नीने तक्रार अर्ज मागे घेतला असे तर कोणत्या कारणास्तव अर्ज मागे घेतला याचा संपूर्ण तपशील देण्यात यावा.

स्वाधाराला येणा-या प्रत्येक समस्याग्रस्त व्यक्तीची समस्या गोपनीय ठेवलेली असते म्हणून माहिती देऊ शकत नाही असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१३.९.०७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन खालीलप्रमाणे प्रतिपादन केले.

संस्थेकडे आलेले निवेदन तसेच समुपदेशकांनी केलेल्या नोंदी किंवा बाजूनी दाखल केलेली कागदपत्रे ही अत्यंत वैयक्तिक स्वरुपाची असून संस्थेवर असलेल्या विश्वासातून दाखल केलेली असतात. सदरची सर्व माहिती व कागदपत्रे ही अत्यंत वैयक्तिक व गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे संस्था त्याच्या प्रती देऊ शकत नाही. कारण महिलेने नोंदविलेली समस्या व त्यासंबंधीची कागदपत्रे ही तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गोपनीय ठेवणे महत्वाचे असते. तसेच अशा कागदपत्रांचा पुरावा म्हणून उपयोग करणे गैर असते कारण कौटुंबिक न्यायालयाच्या कायद्यान्वये समुपदेशकाच्या समक्ष झालेल्या सर्व गोष्टी व कागदपत्रे ही कायद्यान्वये गोपनीय ठेवली जातात व त्याचा उपयोग पुरावा म्हणून करु शकत नाही परंतू जर मे.कोर्टाने संस्थेकडील कागदपत्रे मागीतली असल्यास समुपदेशक स्वत: मे.कोर्टात जावून सदर संदर्भातील कागदपत्राच्या सत्यप्रती मे.कोर्टाच्या ताब्यात दिली जातात.

सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेली माहिती पूर्णपणे वैयक्तिक स्वरुपाची आहे. सदर माहिती उघड केल्यामुळे श्रीम.सिमा राजपूरकर यांना इजा होण्याची शक्यता असल्याने, सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक ५.६.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९७०/०२,**

**श्री. एस.एम.देव,**
**सुदर्शन इंजिनिअरिंग कंपनी,**
**६०/६,स्वामी समर्थ अपार्टमेंट,तरुण भारत कॉम्प्लेक्स,**
**सहार रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००९.** **..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**उद्योगसारथी, मरोळ,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००९३.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. एस.एम.देव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२७.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन नागपूर,बुटीबोरी,महाड,डोंबिवली,लोटे परशुराम व शहाड ही पाच टेंडरची कामे यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर तयार करावयाची कलम ४ खालची माहिती प्रसिध्द करणे व त्याची कार्यवाही व अंमलबजावणी झालेली नाही याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९८८/०२,**

**श्री. उमरखान उस्मानखान,**
**बी.आय.टी.बिल्डिंग नं.६,**
**२रा माळा, खोली नं.२२, इमामवाडा,**
**मुंबई-४००००९.** **..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कार्यालय निरिक्षक,**
**सावंतवाडी नगर परिषद,**
**जि.सिंधूदूर्ग.**

**..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. उमरखान उस्मानखान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१४.११.०७ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)वर नमूद केलेल्या विस्तारास नगरपरिषद सावंतवाडीची परवानगी घेतली होती का?

२)परवानगी मिळण्यासाठी केलेल्या अर्जाचा दिनांक व अर्जदाराचे नांव व त्या अर्जाची प्रत

३)नगरपरिषद सावंतवाडी यांनी विस्तार बांधकामास परवानगी दिल्याच्या आदेशाचा क्रमांक,दिनांक व त्या आदेशाची प्रत.

४)बांधकामास परवानगी मागीतली नाही/दिलेली नाही असे असल्यास अनधिकृत बांधकामाविरुध्द कोणती कार्यवाही नगरपरिषद सावंतवाडीने केली व त्याची फलनिष्पत्ती काय?

तक्रारदाराने अर्जात सि.स.क्र./स.नं.वगैरे सविस्तर तपशील दिलेला नसल्याने कागदपत्राचा शोध घेता येत नाही असे गैरतक्रारदाराने तक्राराराস কळविले. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

अर्जात घर कोणत्या वार्डात आहे त्याला नगरपरिषदेने दिलेला घर क्रमांक कोणता आहे हे कळविले होते. एकाच वार्डात एकाच क्रमांकाची एकाहून अधिक घरे असत नाहीत. माहिती पुरविण्यासाठी अपीलकाराने दिलेली माहिती पुरेशी असतांना ती माहिती देण्यास टाळाटाळ करतात असा तक्रारदाराने तक्रारीत मुद्दा उपस्थित केला आहे. तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात अली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९८५/०२,**

**श्री. समीर व्ही. झव्हेरी,**
**१२७, मुंबादेवी रोड,**
**दया मंदिर बिल्डिंग, ३रा मजला, मुंबई-४००००३. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई, वार्ड ऑफीसर,**
**सी वार्ड ऑफीस,चंदनवाडी, मुंबई-४००००२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. समीर झवेरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.११.९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१०.८.०९ रोजी अर्ज करुन १२७ मुंबादेवी रोड, मुंबई येथील दया मंदिर बिल्डिंगच्या दोन्ही इमारतीच्या जागेतील कचरा साफ करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेतील कोण अधिकारी जबाबदार आहे, याबाबत एकूण ५ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी सुनावणीकरीता गैरतक्रारदार व तक्रारदार हजर होते. या प्रकरणी माहिती प्राप्त करण्यात तक्रारदारास कांहीही रस नव्हता. तक्रारीवरील सुनावणीकरीता जे अधिकारी हजर होते त्यांच्याविरुध्द कारवाई करावी असा तक्रारदाराने आग्रह धरला. तक्रारदाराच्या म्हणण्यानसार गैरतक्रारदाराविरुध्द कांही कारवाई करु शकत नाही. या प्रकरणी तक्रारदारासच माहिती प्राप्त करुन घेण्यात रस नसल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१००४/०२,**

**श्री. सुनिल मधुकर वारवारकर,**
**इ-५/बी-००७ हायवे पार्क,**
**ठाकूर संकूल, कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०२.** **..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**मिटीबाई महाविद्यालय,विलेपार्ले(प.),**
**मुंबई-४०००५६.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. सनिल वारवारकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.२.०९ रोजी अर्ज करुन मिठीबाई महाविद्यालय विलेपार्ले(पश्चीम)मुंबई येथील कार्यरत १)श्री.एम.एम.बेडेकर,कनिष्ठ लिपिक २)श्री.व्ही.के. गुप्ते, कनिष्ठ लिपिक ३)श्री.एस.ए.जाधव,हमाल ४)श्री.जी.एस.मोरे, ग्रंथालय विभाग ५)श्री.सी.एस.मेंगलो,रसायन विभाग यांना जानेवारी-१९९० ते डिसेंबर-१९९५ या कालावधीत मिळालेल्या वेतनापोटी वेतन पत्रावर केलेल्या सहयांची छायांकित प्रत मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम ८(१)(जे)अनुसार गैरतक्रारदाराने नाकारली.यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२५.३.०९ रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रारदाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदाराने मागणी केलेली त्रयस्थ पक्षाची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नसल्याच्या कारणावरुन उक्त अधिनियमातील ८(१)(जे) अनुसार नाकारली आहे. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर तक्रारदारास दिले आहे. यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६५९/०२,**

**श्री. अब्दुल गफूर का.हुणशाळ व महावीर प्रसाद सैनी,**
**हॉटेल प्रेसिडेंट,महाराष्ट्र नगर,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**स्लम रिहॅबीलीटेशन ॲथॉरिटी(एस.आर.ए.),**
**गृहनिर्माण भवन, ५वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. अब्दूल गफूर हुणशाळ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२४.४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.६२१ येथील महाराष्ट्र नगर,आंबेडकर नगरच्या पुनर्विकासाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्रमांक २००९/१९१४/०२ हे दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१७.२.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदार हजर होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता श्री.संजय रोहिदास निर्मल यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९०/०२,**

**श्री. प्रफुल्ल जी नरवणकर,**
**४०१, यशवंत को.ऑप.हौ.सो.लि.,**
**सर्वे नं.१६१-ए, फ्लॅट नं.४, जूहू वर्सोवा लिंक रोड,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.** **..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १०वा मजला,**
**सरकारी वसाहत,बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. प्रफुल्ल नरवणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.४.७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.७.५.२००८ रोजी अर्ज करुन यशवंत सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. माहितीपोटी टपाल खर्चासह एकूण ५३४+२५=५५९ भरणेबाबत दि.१९.४.०८ च्या पत्रान्वये गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले.तसेच मागणी केलेल्या माहितीच्या छायाप्रती काढण्यासाठी निधी उपलब्ध

झाल्यावर रु.५५९/- शुल्क भरणा केल्यावर माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी तक्रारदारास कळविले. तक्रारदाराने शुल्क रु.७५०/- भरल्यानंतरही मागीतलेली माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदार तथा तहसिलदार यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. तसेच माहिती प्राप्त झाल्याबाबत तक्रारदारास विचारुन खात्री करण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ७.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९३/०२,**

**श्री. सुभाषचंद्र आर मुंदरगी,**
**एम-२०२, अशोक नगर बिल्डिंग नं.४,को.ऑप.हौ.सो.,**
**एल.टी.रोड,वजीरा नाका, बोरीवली(प.),मुंबई-४०००९१. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, आर विभाग,**
**वडाळा(पूर्व), मुंबई-३७. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. सुभाषचंद्र मुंदरगी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.५.५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.२.२००९ रोजी अर्ज करुन अशोकनगर बिल्डिंग क्र.४ एन विंग, सहकारी गृहनिर्माण संस्था,एल.टी.रोड, वझीरा नाका, बोरीवली(प.), मुंबई या संस्थेच्या नोंदणी संदर्भातील माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास टपालातून निःशुल्करित्या माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९१/०२,**

**श्री. सुस्मिता सुरेंद्र साळुंके,**
**सहकार सदन चाळ, १/१, असल्फा व्हिलेज,लिंक रोड,**
**महेश्वर मंदिर चौक, घाटकोपर, मुंबई-८४.** **..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**श्रीमती रंगुबाई ज्युन्नरे इंग्लिश मिडीयम स्कूल,**
**काटे गल्ली, द्वारका, नाशिक-४२२ ०११.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्रीमती सुस्मिता साळुंके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.७.२००९ रोजी अर्ज करुन श्रीमती रंगुबाई ज्युन्नरे इंग्लीश मिडीयम स्कूल, काटे गल्ली,द्वारका, नाशिक या शाळेत शिकत असलेल्या प्रेम सुरेंद्र साळुंके नावाच्या मुलाचे अंदाजे वय ३.५/४ वर्षे असे आहे, त्या मुलाचे संपूर्ण नांव,त्याच्या वडिलांचे संपूर्ण नांव,आईचे संपूर्ण नांव, त्याची जन्म तारीख व जन्माचा दाखला, जन्माचे ठिकाण इत्यादी माहिती मागीतली हाती. तक्रारदाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतली होती. म्हणून गैरतक्रारदाराने श्री.सुरेंद्र साळुंके यांना लेखी विचारणा केली. सदरची माहिती तक्रारदारास पुरविण्यास श्री.साळुंके यांनी हरकत घेतली असल्याने माहिती पुरविता येत नसल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२७.८.०९च्या पत्रान्वये कळविले. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२१.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराचे पती श्री.सुरेंद्र पांडुरंग साळुंके यांनी दुसरे लग्न केलेले असून त्या लग्नापासून त्यांना दोन अपत्ये झालेली आहेत. पहिला मुलगा(प्रेम सुरेंद्र साळुंके) हा अंदाजे वय ३.५/४वर्षे इतके असून शाळेत शिकतो आहे. न्यायालयात पुरावा सादर करण्याकरीता मुलाच्या जन्माच्या दाखल्याची तक्रारदारास गरज आहे असा तक्रारदाराने तक्रारीत मुद्दा उपस्थित केला आहे.

त्रयस्थ पक्षाने तक्रारदारास माहिती पुरविण्यास हरकत घेतली असल्याच्या कारणावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती नाकारता येणार नाही. सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने मागणीनुसार आवश्यक ती माहिती पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास मागणीनुसार आवश्यक ती माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ७.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९५/०२,**

**श्री. सुरेश शिवलकर,**
**प्रतिक्षा नगर, बिल्डिंग नंबर४,**
**सायन, मुंबई-४०००२२. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,**
**संक्रमण शिबीर विभाग, गृहनिर्माण भवन,वांद्रे भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.सुरेश शिवलकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१७.६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२५.३.२००९ रोजी अर्ज करुन प्रतिक्षा नगर,सायन संक्रमण शिबीर मधील जुनी इमारत क्र.४ मधील खोली क्रमांक ३५५,३४८ बाबत माहिती मागीतली होती. खोली कोणाच्या नावावर,खोलीमध्ये कोण व्यक्ती राहात आहे,खोलीचे वितरणाची प्रत इत्यादी माहिती मागीतली होती. खोली वितरणासंबंधी माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदार/गैरतक्रारदार कोणीही हजर नव्हते. तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी केली असता माहितीच्या अधिकारानुसार तक्रारदाराने दि.२५.३.०९ च्या अर्जान्वये खोली वितरणासंबंधी अनुषंगिक मागितलेली माहिती तक्रारदारास पुरविण्यात आल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९४/०२,**

**श्री. शंकर केळुसकर,**
**५०/अ विभाग, रुम नं.२१७१,दिपमाला को.ऑप.हौ.सो.,**
**वर्तक नगर,ठाणे(प.), पिन-४००६०६.** **..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**टि-विभाग, मुंबई,ए.सी.सी.रोड,**
**मुलुंड(प.),मुंबई-८०** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.शंकर केळुसकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२९.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते.गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.१२.२००८ रोजी अर्ज करुन मुलुंड सहकार विश्व, सी/१७ ही सदनिका अपीलकाराचे वडिल श्री.नरहरी शंकर केळुसकर यांच्या २६.७.२००७ रोजीच्या मृत्यूनंतर आई, श्रीमती विजया नरहरी केळुसकर यांच्या नावे करण्यात आली, त्यावेळी त्यांनी सादर केलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती. तक्रारदाराने मागणी केलेली कागदपत्र उपनिबंधक सहकारी संस्था, टी विभाग कार्यालयात उपलब्ध नाहीत असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले. तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराच्या आई श्रीमती विजया नरहरी केळूसकर यांच्या नावे मुलुंड सहकार विश्व सी/१७ ही सदनिका हस्तांतरित केली. सदर सदनिका कोणत्या कागदपत्राच्या आधारे हस्तांतरित केली याबाबतच्या कागदपत्राची तक्रारदाराने मागणी केली आहे. सदर कागदपत्राच्या प्रती गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास पुरवाव्यात. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई (रामानंद तिवारी)
दिनांक ७.६.२०१० राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९४/०२,**

**श्री. श्रीनिवास चेरी,**
**डी/२७, ६वा मजला, वाशी गांव,**
**चेंबूर, मुंबई-४०००७४.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए.,**
**बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. श्रीनिवास चेरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१०.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते.गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२८.११.२००८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

अ)आणिक पांजरपोळ लिंक रोडचे काम मे.मधुकॉन प्रोजेक्टस लिमिटेड, हैदराबाद यांना सुमारे १५० कोटी रुपयांना देण्यात आले होते. परंतू त्यांनी मुदतीत फक्त ९ ते १० कोटी रुपयांचेच काम केले होते. त्यामुळे त्यांचे सदरचे काम त्यावेळचे कमिशनर श्री.टि.चंद्रशेखर यांनी रद्द केले होते व नवीन टेंडर प्रक्रिया करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते हे खरे आहे का?

ब)असे आदेश असतांनाही श्री.चंद्रशेखर यांची बदली झाल्यानंतर त्याच कंपनीला म्हणजे मे.मधुकॉन प्रोजेक्टस लिमीटेड कंपनीला पुन्हा ते काम सुमारे ७० कोटी रुपये जादा देऊन करण्यास सांगण्यात अले आहे हे खरे आहे काय?

क)अशाप्रकारे ज्या कंपनीचे काम वेळात न केल्यामुळे रद्द करण्याचे आदेश देण्यात आले होते त्यांना पुन्हा दर वाढवून तेच काम देण्याची तरतूद नियम आहे काय?

गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२८.१.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. सदर माहिती तक्रारदाराने वैयक्तिकरित्या कार्यालयात उपस्थित राहून दि.३०.१.२००९ रोजी प्राप्त केली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगास पोचपावती सादर करुन तसे प्रतिपादन केले. तक्रारीचे अवलोकन केले असता तक्रारदाराने दि.३०.१.२००९ रोजी माहिती प्राप्त केली आहे आणि राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.२.०९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९९२/०२,**

**श्री. सुनिल अय्या,**
**ए/६०२, गोकूळ नगरी १,**
**ऑफ हायवे, कांदिवली(पूर्व), मुंबई-४००१०१. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**गोकूळ नगरी(A & B),को.ऑप.हौ.सो.लि.,**
**ऑफ.कांदिवली हायवे,कांदिवली(पूर्व),**
**मुंबई-४००१०१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. सुनिल अय्या यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२४.६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार करुन गोकुळ नगरी १(अे आणि बी) सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड हायवे कांदीवली(पूर्व) मुंबई या संस्थेने जन माहिती अधिकारी नियुक्त केलेला नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. जन माहिती अधिका-याची नेमणूक करण्याचा तक्रारीत मुख्य मुद्दा आहे. तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार किंवा गैरतक्रारदार दोन्ही हजर नव्हते. तक्रारीतील कागदपत्राची तपासणी केली असता गोकुळ नगरी सहकारी गृहनिर्माण संस्थेने उक्त अधिनियमातील कलम ४ प्रमाणे जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी पदनिर्देशित केले नसल्याबाबत तक्रारदाराचा मुख्य मुद्दा आहे. सदर सहकारी गृहनिर्माण संस्था “सार्वजनिक प्राधिकरण” नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत सदर संस्था येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९१७/०२**

**श्री.संतोष तुळशीदास कदम,**
**द्वारा- रमजान भटार चाळ,**
**चाळ नं.२६३/३, डॉ.आंबेडकर चौक,**
**तक्यावार्ड, कुर्ला(प.),मुंबई-४०००७०.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,१०वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसिलदार,**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,१०वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. संतोष कदम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.५.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.६.२००८ रोजी अर्ज करुन श्रीमती पार्वती सिताराम कदम यांनी "लोकशाही दिन" दिनांक १.१२.२००३ टोकन क्र.४ चा केलेला अर्ज, सदर अर्जाचा निकाल कशाप्रकारे लावला,निकाल काय दिला? श्रीम.पार्वती सिताराम कदम यांना काय निर्णयाचे पत्र दिले, त्याचप्रमाणे उपजिल्हाधिकारी(अतिक्रमण/निष्कासन) तथा सक्षम अधिकारी-कुर्ला यांचे कार्यालय, टोपीवाला कॉलेज बिल्डिंग, तळमजला,एस.एन.रोड, मुलुंड(प.), मुंबई-४०००८० यांचेकडे खात्यामार्फत कळविले किंवा नाही इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतलेली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१८.८.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास आवश्यक ती

माहिती तसेच आदेशाच्या प्रती पुरविण्यात याव्यात असे दि.२५.२.०९ रोजी आदेश पारित केले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्रीमती पार्वती सिताराम कदम यांनी “लोकशाही दिन”दि.१.१२.०३ टोकन क्र.४ च्या केलेल्या अर्जाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. “लोकशाही दिन”दि.१.१२.२००३ रोजी तक्रारदाराविरुध्द श्रीम.पार्वती कदम यांनी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रार अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आली. सदर तक्रार शोधूनही सापडत नाही असे गैरतक्रारदार तहसिलदार(अति.)कुर्ला, श्रीम.संगिता टकले तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(सा.प्र.)श्री.किशन जावळे यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच तक्रारदाराविरुध्द कांहीही कारवाई करण्यात आली नसल्याचे प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:८.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९५२/०२**

**श्रीमती तरुणा सुरेश मांगलानी,**
**बी-८०२,गोल्डन स्क्वेअर,सी.एस.टी.रोड,**
**मुंबई यनिव्हर्सिटी जवळ,**
**कालीना,सांताक्रुझ, मुंबई-४०००९८. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, ३रा मजला, खो.क्र.४०४, कलानगर,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसिलदार,**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,१०वा मजला, सरकारी वसाहत,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती तरुणा सुरेश मांगलानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.१२.२००९ रोजी अर्ज करुन गोल्डन स्क्वेअर संस्थेच्या पश्चीमेकडील बाजूस कालीना परिसरातील मोकळया जागेबाबत एकूण ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती. त्यानुसार कार्यालयाच्या संबंधीतांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी कली असता अपीलकाराने दर्शविलेली जागा न.भू.क्र.५६१० चे क्षेत्रफळ ८६४.०० चौ.मी.आहे. सदर जागा महाराष्ट्र शासनाचे विनियम १६ अंतर्गत कलिना गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था यांना प्राधिकरणाच्या धोरणानुसार वितरित केलेली आहे. याबाबत अपीलकारास दि.३१.३.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.७.५.२०१० च्या पत्रान्वये

कळविले. दरम्यान माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गोल्डन स्क्वेअर संस्थेच्या पश्चीमेकडील बाजूस कालीना परिसरात असलेल्या मोकळया जागेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.३.२०१० व दि.७.५.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९५४/०२**

**श्रीमती दिपाली दिलीप गडकर,**
**सी-४०४/४था मजला, श्री शांती निकेतन सह.गृ.संस्था,**
**प्लॉट -१२ अे, सेक्टर-८, खारघर,**
**ता.पनवेल, जि.रायगड. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती दिपाली गडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.८.२००९ रोजी अर्ज करुन सेवानिवृत्ती वेतन व त्यावरील लाभ ठरणा-या/प्रदान व्हावयाच्या रक्कमा विषयी एकूण ५ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. मुद्दा क्र.१ ते ५ यात अपीलकाराने केवळ विलंबाबत कारणे व खुलासा व्हावा/द्यावा असे नमूद केलेले आहे. कार्यालयीन नस्तीवर याबाबत कोणतीही कारणे/खुलासा उपलब्ध नाही. तरी नस्तीतील नेमकी हवी असलेली माहिती मागावी ती त्वरीत देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.८.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथमअपीलीय अधिका-यांनी दि.१९.१२.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. जन

माहिती अधिका-यांनी अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे दि.५.१.२०१० रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर वस्तुस्थितीशी सुसंगत नाही म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवानिवृत्ती वेतन व त्यावरील लाभ ठरणा-या/प्रदान व्हावयाच्या रक्कमांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास सेवानिवृत्तीनंतर लगेच सेवानिवृत्ती लाभ मिळाले नाहीत. सेवानिवृत्ती लाभ मिळण्यास विलंब झाला. विलंबाने सेवानिवृत्ती लाभ प्राप्त झाल्याने त्यावर व्याज मिळण्याची अपीलकाराची मागणी आहे. याबाबत उत्तरवादीने अपीलकारास दि.१६.१.२०१०च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९४८/०२**

**श्री.विजय के.मंथेना,**
**७/३४, अब्दला मेन्शन,**
**हरियानावाला लेन, स्टेशन रोड,**
**कुर्ला(पश्चिम), मुंबई-४०००७०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बृहन्मुंबई विभाग,**
**धर्मादाय आयुक्त भवन,२रा माळा, ८३,डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बृहन्मुंबई विभाग,**
**धर्मादाय आयुक्त भवन,२रा माळा, ८३,डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-१८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विजय मंथेना यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००९ रोजी अर्ज करुन ग्लोबल हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर,न्यास नोंदणी क्र.ई-१२५७३(मुं)या न्यासासंदर्भात खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)ट्रस्टीचे रुग्णालयांत ७व्या मजल्यावर नवीन प्रस्थापित केलेल्या ह्रदयरुग्णांकरीता किती बेड्स(खाटा)आहेत, माहितीचा अधिकार कायदा कलम ४(१)(२)अंतर्गत कृपया खूलासा करावा. जेणेकरुन माझ्या माहितीत भर पडेल.

२)ट्रस्टीचे रुग्णालयांत ७व्या मजल्यावर नवीन प्रस्थापित केलेल्या ह्रदयरुग्णांकरीता ओ.पी.डी.सर्वसाधारण रुग्णांकरीता राखीव जागा आहे किंवा नाहीत कृपया माहितीचा अधिकार कायदा कलम ४(१) (२) अंतर्गत खुलासा करावा. जेणेकरुन माझ्या माहितीत भर पडेल.

३)ट्रस्टींचे रुग्णालय असल्याकारणाने हृदयरुग्णांकरीता कोणत्या प्रकारची शस्त्रक्रियेत व औषधात कोणात्या प्रकारची तरतूद करण्यात आली आहे किंवा नाही. कृपया मा.अ.कायदा कलम ४(१)(२)अंतर्गत खुलासा करावा. जेणेकरुन माझ्या माहितीत भर पडेल.

४)ट्रस्टींच्या रुग्णालयातील सल्लागार समितीने हृदयरुग्णांकडून व सर्वसाधारण रुग्णांकडून किती प्रमाणात रक्कम आकारायची असे समितीच्या बैठकीत ठभ्राव ठरवण्यांत आले किंवा नाही. कृपया मा.अ. कायदा कलम ४ (१)(२)अंतर्गत खुलासा करावा. जेणेकरुन माझ्या माहितीत भर पडेल.

५)सल्लागार समितीने ठराव ठरवण्यांत आलेल्याची मा.अ.कायदा कलम२(क) व २(स) अंतर्गत कृपया अभिलेख द्यावे.

६)ट्रस्टी रुग्णालयांतील सल्लागार समितीची बैठक दि.२२.६.२००७ रोजी पर्यंतचे अभिलेख मला प्राप्त झाले आहेत. त्यानंतरच्या झालेल्या बैठकीच्या प्रत किती बैठका झाल्या आहेत त्या सर्व बैठकीची फोटो प्रत कृपया मा.अ.कायदा कलम २(क) व २(स)अंतर्गत अभिलेख देण्यांत यावे.

अर्जात नमूद केलेली माहिती धर्मादाय रुग्णालयाकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.१.२.२०१०च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२०.२.२०१० रोजी आदेश पारित करुन अपील नामंजूर केले. यामुळे अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन ग्लोबल हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर या न्यासाबाबत एकूण ६ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९४४/०२**

**श्री. रितेश हरिष पवार,**
**४७३/२, चिंचाली,**
**श्री.गुरुदत्त प्रासादिक भजनी मंडळ सभागृहाजवळ,**
**घणसोली, नवी मुंबई.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. रितेश पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने प्रकल्पग्रस्तांची नोकरभरती जेष्ठतेच्या आधारे न करता स्पर्धापरिक्षेद्वारे करावी असा निर्णय दिला. त्या निर्णयाच्या विरोधात कुणी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले काय, केले असल्यास अपीलकर्त्यांचे नांव, पत्ता इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.४.२.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने प्रकल्पग्रस्तांची नोकर भरती जेष्ठतेच्या आधारे न करता स्पर्धा परीक्षेद्वारे करावी असा निर्णय दिला त्या निर्णयाच्या विरोधात कुणी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले काय याबाबत माहिती मागीतली होती. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी प्रकल्पग्रस्तांची पदे स्पर्धा परीक्षेद्वारा भरण्यासंबंधी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपील केल्याची बाब कार्यालयास अवगत नसल्याचे अपीलकारास कळविले असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर उत्तरवादीने समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१०.६.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९५५/०२**

**श्री. अजित पांडूरंग वालावयकर,**
**१०१, संघवी मॅजेस्टीक, मनमाला टँक रोड,**
**माहीम, मुंबई-४०००१६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक आयुक्त -बी.एम.सी. जी/नॉर्थ वार्ड ऑफीस,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,प्लाझा सिनेमाच्या मागे,**
**दादर(प.), मुंबई-४०००२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**सहाय्यक आयुक्त -बी.एम.सी. जी/नॉर्थ वार्ड ऑफीस,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग,प्लाझा सिनेमाच्या मागे,**
**दादर(प.), मुंबई-४०००२८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजित वालावयकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.१.२०१० रोजी अर्ज करुन गंगाविहार रेस्टॉरंटच्या मालकाने पदपथावर अतिक्रमण करुन खुर्च्या टेबल ठेवून ग्राहकांना अन्न पदार्थ पुरवित असल्याबाबत दि.१७.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली होती, सदर तक्रारीवरील केलेल्या कारवाई संबंधी एकूण १२ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.१६.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२०.३.०१० रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गंगाविहार रेस्टॉरंटच्या मालकाने पदपथावर केलेल्या अतिक्रमणाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. सदर अपीलावरील सुनावणीकरीता नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५,०००/- इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९४९/०२**

**श्री. अलोक मोहनलाल बागला,**
**८४, जन्मभूमी मार्ग, ३रा मजला,**
**कॅफे बहारच्या वर, मुंबई-४००००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त(म.न.पा.),एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**२रा मजला, डॉ.बी.ए.रोड,**
**परेल, मुंबई-४०००१२.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी(आरोग्य),**
**सहाय्यक पालिका आयुक्त(म.न.पा.),एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**२रा मजला, डॉ.बी.ए.रोड,**
**परेल, मुंबई-४०००१२.**

**..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अलोक बागला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.८.२००९ रोजी अर्ज करुन जे.जे.हॉस्पीटलच्या परिसरात सन २००८-०९ या वर्षी सेलूलर टॉवर उभारण्यास परवानगी का नाकारण्यात आली यासंबंधी हॉस्पीटलच्या परिसरात सेलूलर टॉवर उभारण्यास रेडीएशनचा काय परिणाम होईल याकरीता अभ्यास करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती एफ/दक्षिण आरोग्य विभागाशी संबंधीत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.३१.८.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१७.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जे.जे. हॉस्पीटल परिसरात सेलूलर टॉवर उभारण्यास परवानगी का नाकारण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी, मुंबई महानगरपालिका यांनी अपीलकारास आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४३७६/०२**

**डॉ.श्री. रमेश डोईफोडे,**
**टीबीसी-८०, गुजराती मनपा शाळेसमोर,**
**ठक्कर बाप्पा कॉलनी, चेंबूर,**
**मुंबई-४०००७१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक महापालिका आयुक्त,एम /पश्चिम विभाग,**
**एम विभाग कार्यालय इमारत,शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.करनिर्धारक व संकलक,**
**सहाय्यक महापालिका आयुक्त,एम /पश्चिम विभाग,**
**एम विभाग कार्यालय इमारत,शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार डॉ.श्री. रमेश डोईफोडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.८.२००९ रोजी अर्ज करुन मालमत्ता क्र.१४९७(४डी) लेखा क्रमांक ११-१०९-०२-८ बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२३.९.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती खोटी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२१.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सिटी सर्व्हे प्रमाणे, प्रॉपर्टी कार्ड प्रमाणे क्र.१४९७(४डी) मालमत्तेचे क्षेत्रफळ ३३ चौरस यार्ड आहे परंतू सहाय्यक करनिर्धारक व सकलक यांच्या खात्यातील दि.२.११.०५ च्या सर्व्हे रिपोर्टप्रमाणे सदर मालमत्तेचे क्षेत्रफळ जास्त दाखविले आहे. म्हणजेच माहिती खोटी आहे असे अपीलकाराने प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी असे स्पष्ट केले की, जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमिनीच्या क्षेत्रफळाचे रेकॉर्ड असते व सहा.करनिर्धारक व संकलक खात्याकडे बांधकाम झालेल्या इमारतीच्या चटई क्षेत्रफळाचे रेकॉर्ड असते. दोन्ही माहितीत तफावत

असे शकते म्हणून माहिती खोटी आहे असे म्हणणे योग्य नाही. परंतू जन माहिती अधिकारी,सहाय्यक करनिर्धारक व संकलक यांनी असे सांगितले की, माहिती अधिकारांतर्गत नमूद केलेली मालमत्ता क्र.१४९७(४डी) लेखा क्र. ११-१०९-०२-८ बाबत या कार्यालयात जो अभिलेख उपलब्ध आहे त्यानुसार सदर माहिती आपणास देण्यात आलेली आहे. त्यामुळे दिलेली माहिती खरी आहे व ती खोटी असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून दि.२३.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मालमत्ता क्र.१४९७(४डी) लेखा क्र. ११-१०९-०२-८ बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास सदर प्रकरणी माहिती पुरविली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९२७/०२**

**श्री. रामशंकर नावकार,**
**त्रिकाल सोसायटी,**
**बिल्डिंग नं.३१०/४०३, पंतनगर,**
**घाटकोपर(पूर्व), ९०फूट रोड,मुंबई-४०००७५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप-प्रमुख अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**उप-प्रमुख अभियंता यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,पूर्व उपनगरे,**
**राज लेगसीच्या जवळ,एल.बी.एस.मार्ग,**
**विक्रोळी(प.), मुंबई-४०००८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**उप-प्रमुख अभियंता यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,पूर्व उपनगरे,**
**राज लेगसीच्या जवळ,एल.बी.एस.मार्ग,**
**विक्रोळी(प.), मुंबई-४०००८३. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामशंकर नावकार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.१२.२००९, १२.१२.२००९ व ११.१.२०१० रोजी अर्ज करुन श्री.विरेंद्र वोरा एक्सल विकासक यांनी फसवणूक केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.विरेंद्र वोरा एक्सल विकासक यांनी फसवणूक केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. श्री.विरेंद्र वोरा विकासक आणि अपीलकार श्री.श्रीराम शंकर नावकार यांच्यात झालेल्या करारानुसार अपीलकारास पहिल्या मजल्यावर सदनिका द्यायला पाहिजे होती. परंतू विकासकाने कराराचे उल्लंघन करुन चौथ्या मजल्यावर अपीलकारास सदनिका दिली. पहिला मजला कमर्शियल केला. करारानुसार १ ते ७ मजले रहिवाशांकरीता आहेत. मजल्याच्या फेरफारानुसार अपीलकाराचे नुकसान झाले, मानसिक त्रास झाला. अपीलकार बी.ई.एस.टी.मधून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या हृदयाचे दि.१०.१.१९९७ रोजी ऑपरेशन झाले आहे असे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती विलंबाने दिली असल्याचे अपीलकाराने प्रतिपादन केले. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून४ आठवडयाचे आत आयोगाकडे जन माहिती अधिका-यांनी लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:११.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९६४/०२**

**श्री. गुलाम मोहम्मद अब्दुल अजीज बनानी,**
**रुम नं.८११/१/२, कलेक्टर चाळ,**
**यु.पी.रेस्टॉरंटच्या पाठीमागे, चिराग नगर,**
**मच्छी मार्केट, घाटकोपर(प.), मुंबई-८६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पालीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-६ यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,**
**चेंबूर, मुंबई. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गुलाम मोहम्मद अब्दूल अजीज बनानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.१२.२००९ रोजी अर्ज करुन अपीलकाराने कार्यालयात दिलेल्या अर्जावर पोलीसांचा अहवाल,विरोधकाचे प्रश्न,अपीलकारांचे प्रश्न या संदर्भात जी कागदपत्र आहेत त्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. तसेच अर्जावर कोणती कारवाई करण्यात आली याबाबत माहिती मागीतली होती.

अर्जाची चौकशी करुन अहवाल पोलीस उप आयुक्त, परि.७ मुंबई यांचे कार्यालयात जा.क्र.५३९९/०८ दि.१९.५.२००८ रोजी सादर करण्यात आलेला आहे. अपीलकाराने केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून न आल्याने परिमंडळ-७ कार्यालयाचे स्तरावर तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.१२.०९च्या पत्रान्वये कळविले. पोलीसवाले जाणूनबूजून माहिती देत नाहीत. त्रास देत आहेत. समाधानकारक उत्तर देत नाहीत. राजकीय दबावाखाली पोलीस स्टेशन काम करत असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१८.१.१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे दि.१८.२.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराने कार्यालयात दिलेल्या अर्जावरील पोलीसांचा अहवाल,अर्जावर केलेली कारवाई याबाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. चिरागनगर,घाटकोपर(प.), मुंबई येथील आझाद बेकरीच्या मागे मदरसा बालवाडी आहे. सदर मदरसा बालवाडी इंग्लीश हायस्कूल मध्ये रुपांतरीत करण्याचा नवजवान इतिहादूल मुस्लीम कमिटी प्रयत्न करीत आहे. याबाबत अपीलकाराने पोलीसात तक्रार केली. यामुळे अपीलकारास धमकी दिली जात आहे. यामुळे जिवाला धोका आहे अशी अपीलकाराची तक्रार आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक घाटकोपर पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून कार्यालयास माहिती प्राप्त झाली. अपीलकाराने केलेल्या तक्रारीत तथ्य आढळून आले नसल्याची जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती कळविली आहे. अपीलकाराचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असल्याचे पोलीस स्टेशनने अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः११.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९५९/०२**

**श्री. रमेश जिजाबा शिंदे,**
**रा.मु.पो.शिरगांव(वरची वाडी-बोर्डींग हायस्कूलचे मागे),**
**ता.चिपळूण,जि.रत्नागिरी-४१५ ६०२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**चिपळूण नगर परिषद,चिपळूण,**
**मु.पो.ता.चिपळूण,**
**जि.रत्नागिरी-४१५६०५.**

**जन माहिती अधिकारी तथा फीटर,**
**वाहन विभाग, चिपळूण नगर परिषद,**
**चिपळूण,जि.रत्नागिरी-४१५ ६०५. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रमेश शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)दि.७.११.२००९ रोजी संगित अवघा रंग एकची झाला या नाटकाचा प्रयोग इंदिरा गांधी सांस्कृतीक केंद्रामध्ये झाला आहे. या नाटकाच्या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक केंद्र आगाऊ रक्कम पार्टीकडून स्विकारुन आरक्षित केले होते काय? केले असल्यास आरक्षित रक्कमेच्या पावतीची सहीसूद नक्कल प्रत मिळावी.

२)नाटकाच्या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक केंद्राचा वापर केल्याने त्याचे भाडे भरले असल्यास त्या रकमेच्या पावतीची सहिसूद नक्कल मिळावी.

३)नगर परिषदेच्या मालकीची एकूण वाहने किती आहेत? प्रकार अवजड वाहने सहाचाकी व चार चाकी, हलकी वाहने चाल चाकी(अधिकारी व कर्मचारी वापराकरीता)-दोन चाकी- (मोटार सायकली इत्यादी)बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती.

अर्जामध्ये मागणी केलेली माहिती देणे इष्ट आहे. परंतू सदरची माहिती संकलीत करणेस ३ महिने कालावधी लागणार असल्या कारणामुळे माहिती उशिराने देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा फिटर वाहन विभाग चिपळूण नगर परिषद यांनी दि.१४.१२.२००९च्या पत्रान्वये

अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.३१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. १५ दिवसाचे आत माहिति पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही विहित कालावधीत माहिती मिळाली नाही यामळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९५७/०२**

**श्री. नारायण विठ्ठल शिंदे,**
**२२३,आदर्श रहिवाशी संघ,**
**वडाळा मार्केट मागे, कात्रक रोड,**
**वडाळा(प.), मुंबई-४०००३१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालीका आयुक्त यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका,एफ उत्तर विभाग,**
**९६,भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**सहाय्यक पालीका आयुक्त यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका,एफ उत्तर विभाग,**
**९६,भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. नारायण विठ्ठल शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.२.२०१० रोजी अर्ज करुन दि.२३.९.२००८ रोजी सौ.श्रध्दा जाधव नगरसेविका यांनी सहाय्यक आयुक्त एफ/नॉर्थ यांना तक्रार अर्ज केला होता त्या अर्जाच्या अनुषंगाने काय कारवाई करण्यात आली त्या संबंधीत टिप्पणीची प्रत, संबंधीत पत्रव्यवहार केलेल्या कार्यवाहीच्या तपशिलाची मागणी केली होती.

उच्चस्तरीय समितीच्या आदेशाप्रमाणे सदर प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करुन अहवाल उच्चस्तरीय समितीला सादर करण्यात आला आहे असे जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी(एफ/उत्तर)श्री.पी.एम.मोरे यांनी अपीलकारास दि.२६.२.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे दि.२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२५.३.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि.२३.९.०८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली आहे. तपासणी अहवाल उच्चस्तरीय समितीस सादर केला आहे. अहवालाची प्रत अपीलकारास देण्यात आली आहे असे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. तपासणी अहवाल चुकीचा असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. माहितीच्या अधिकारानुसार उपलब्ध असलेली माहिती पुरवावयाची आहे. उत्तरवादीने माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी आयोग काही करु शकत नाही. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३०/०२**

**श्री. संतोष मारुती गाडेकर,**
**टिळक मार्ग, म्युनिसिपल शाळा, टिळक रोड,**
**घाटकोपर, मुंबई-४०००७७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका,एन विभाग कार्यालय,**
**२रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका,एन विभाग कार्यालय,**
**२रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७७. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. संतोष मारुती गाडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.४.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील माळी-नि-रखवालदार पदावरील कर्मचा-यांनी सेवा अंतर्गत करावयाच्या कामाची वेळ, सेवानियमावलीनुसार त्यांना प्रशासकीय नियमान्वये अनुज्ञेय असणा-या मानीव सट्टयांबद्दल माहिती मिळणेबाबत.

अपीलकाराने वरील विषयाबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत आवश्यक ती माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदरबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याने व अर्जदाराची नेमणूक शिक्षण अधिकारी(हिंदू कॉलनी) यांच्या खात्याकडून झालेली असल्याने माहितीचा अर्ज त्या खात्यास पाठविण्याची कारवाई करावी व संबंधीतांस उत्तर द्यावे असे नमूद करुन दि.२१.१.०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपील

निकालात काढले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन शिक्षण विभागातील माळी-नि-रखवालदार पदावरील कर्मचा-यानी सेवा अंतर्गत करावयाच्या कामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमक्ष अपीलकारास माहिती पुरविली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः११.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३२/०२**

**श्री. विष्णू शंकर पेडणेकर,**
**जे.एफ.मिस्किटा चाळ, खोली नं.१६,**
**फा.प्लॉट नं.३३९, श्रद्धानंद रोड,के वार्ड,**
**विलेपार्ले(पूव्र), मुंबई-४०००५७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**बृहनमुंबई महानगरपालिका(इमारत प्रस्ताव),**
**पश्चिम उपनगर,१ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**बृहनमुंबई महानगरपालिका(इमारत प्रस्ताव),**
**पश्चिम उपनगर,१ला मजला, आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विष्णू शंकर पेडणेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

सी.टी.एस.नं.१८३९(प्लॉट नं.३३९) या जागेवर निल-आशीश नावाची इमारत बांधली असून त्या इमारतीवर प्लॉट नं.३३५ व ३३९ असे नंबर टाकले आहेत. तरी त्या इमारतीचा प्लॅन व नकाशा तसेच वरील सी.टी.एस.नं.१८३९ या जागेची विक्री झाल्यानंतर त्या जमिनीचा पडलेला प्लॉट नं.३३९ ज्याने खरेदी केला त्या मालकाचे नाव व पत्ता याची माहिती मला मिळावी अशी नम्र विनंती.

अर्जात इमारतीच्या भूभागाचा न.भु.क्र.दिलेले होते. परंतु कार्यालयातील सर्व्हे विभागाकडे उपलब्ध असलेल्या नोंदीनुसार सदरहू न.भु.क्र.वर कोणत्याही इमारत प्रस्तावाची नोंद नाही. त्यामुळे काहीही माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.१२.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२५.३.०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सहाय्यक जन

माहिती अधिका-यांनी जागेवर जाऊन फाईलचा क्रमांक प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करावा. इमारतीचा फाईल क्रमांक प्राप्त झाल्यावर कार्यालयात इमारत फाईलचा शोध घ्यावा असे सहाय्यक जन माहिती अधिका-यांना प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सी.टी.एस.नं.१८३९(प्लॉट नं.३३९) या जमिनीच्या वर्तमानीत मालकाचे नाव तसेच ३३५ प्लॉटच्या जमिनीच्या मालकाचे नांव व इतर माहितीच्या प्रती तसेच निल आशीश या इमारतीच्या प्लॅनची प्रत इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने सदर प्रकरणी आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी व अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:११.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३३/०२**

**श्री. आनंद दगडू इंगळे,**
**के.डब्ल्य.पी.आय.,म्युनिसिपल कॉलनी,**
**दादाभाई क्रॉस रोड, टेप व्हिलेज,**
**अंधेरी(प.),मुंबई-४०००५८. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासकीय सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरण,**
**हायपीक अपार्टमेंट,जुनी कोर्ट इमारत,एस.व्ही.रोड,**
**वांद्रे(प.), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय सहाय्यक अधिकारी,**
**बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरण,**
**हायपीक अपार्टमेंट,जुनी कोर्ट इमारत,एस.व्ही.रोड,**
**वांद्रे(प.), मुंबई-४०००५०. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आनंद दगडू इंगळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.४.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

क्र.१)केस क्रमांक ०९/१० व पत्र क्रमांक बीडीएलएसए/बीडीएलएसए:१४/१० तसेच पत्र क्रमांक बीडीएलएसए/बीडीएलएसए १४.१०.०९ नुसार श्री.सुरेश शांताराम चव्हाण यांनी आपल्या बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरणात मयत सख्या भावाचे (देवदास शांताराम चव्हाण यांचे)राहते घर आनंद दगडू इंगळे यांनी बळकावल्या संबंधात तक्रार केली असून श्री.सुरेश शांतारामउ चव्हाण यांनी देवरास शांताराम चव्हाण यांचे वारसदार म्हणून आपल्या प्राधिकरणात जी कागदपत्रे सादर केली त्या कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या झेरॉक्स पती तसेच सविस्तर माहिती मिळण्याबाबत.

क्र.२)श्री.सुरेश शांताराम चव्हाण यांनी आपल्या बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरणात श्री.आनंद दगडू इंगळे यांच्या विरुध्द मयत सख्या भावाचे(देवदास शांताराम चव्हाण यांचे)राहते घर बळकावल्या संबंधात तक्रार केली असून श्री.सुरेश शांताराम चव्हाण यांनी आपल्या

बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरणात मयत देवदास शांताराम चव्हाण यांचे राहते घर श्री.आनंद दगडू इंगळे यांनी बळकावल्या असल्याबाबतची जी कागदपत्रे सादर केली तसेच आपल्या प्राधिकरणाने ज्या कागदपत्रांच्या आधारावर आनंद दगडू इंगळे यांनी मयत देवदास शांताराम चव्हाण यांचे राहते घर बळकावले असे ठरवले आहे त्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रती तसेच सविस्तर माहिती मिळण्याबाबत.

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली तसेच माहिती पुरविण्याकरीता अवाजवी रक्कम घेतल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.सुरेश शांताराम चव्हाण यांनी प्राधिकरणात मयत सख्या भावाचे राहते घर बळकावल्यासंबंधात जी कागदपत्रे सादर केली त्या कागदपत्राची मागणी केली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, श्री.सुरेश चव्हाण यांच्याकडून ज्या अधिका-यांनी कागदपत्र स्विकारली आहेत,सदर कागदपत्राच्या झेरॉक्स पती, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवाव्यात.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः११.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३४/०२**

**श्री. निखिल एन.सायता,**
**वल्लभ टेरेस, फ्लॅट क्र.१२,**
**५०५,सरदार वल्लभभाई पटेल मार्ग,**
**ऑपेरा हाऊस, मुंबई-४००००२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**वाहतुक पोलीस मुख्यालय,८७, सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई-४०००३०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(दक्षिण),**
**वाहतुक पोलीस मुख्यालय,८७, सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी, मुंबई-४०००३०. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निखील सायता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.१.२०१० रोजी अर्ज करुन वाहने चुकीच्या पध्दतीने ओढून नेतांना वाहनाची हानी झाल्याबाबत किती तक्रारी आलेल्या आहेत, याबाबत केलेल्या कारवाईची माहिती इत्यादी ६ मुद्यावर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.५.२.२०१० रोजी पत्र पाठवून एकण ८ पृष्ठे पानांकरीता रु.१६/- रोखीने भरणा करुन माहिती घेऊन जाण्याकरीता कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित रहावे असे जन माहिती अधिका-यांनी दि.५.२.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलय दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन वाहने Towing करुन नेतांना वाहनाचे नुकसान होते. वाहने डॅमेज होतात याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली  होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. परंतू संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराची मागणी आहे या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर अपीलकारास सर्व संबंधीत कागदपत्र निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः११.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३७/०२**

**श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट,**
**जी.एम.राणे बिल्डिंग व खंबाटा पठाण चाळ,**
**डॉ.इ.मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपप्रमुख अभियंता(इ.प्र.)शहर-I,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वार्ड ऑफीस,**
**३रा मजला, १०वा संखाली रोड,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वार्ड ऑफीस,**
**३रा मजला, १०वा संखाली रोड,**
**भायखळा, मुंबई-४००००८ ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. चंद्रकांत मर्चंट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१२.२००९ रोजी अर्ज करुन खैबर प्रॉपर्टी,लोअर परेल विभाग सी.एस.क्रमांक ११२/११३ प्लॉट क्र.१५३ या विकासकाने इमारत प्रस्ताव विभागास दाखल केलेल्या दोन धारिणींच्या कालावधीच्या संबंधाने लिखीत माहिती अभिलेखावरुन मिळावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती लिखीत स्वरुपात न देता तपासणीच्या घोळात टाकून माहिती लपविल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.४.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२४.२.२०१० रोजी आदेश पारित केले.त्यानंतर EB८३०२/GIS-A, EB८३०३/GIS-A या दोन्ही धारिणीचा प्रारंभीक दिनांक व कालावधी उपलब्ध कागदपत्रावरुन अपीलकारास कळवावा असे दि.२४.२.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, EB८३०२/GIS-A, EB८३०३/GIS-A या दोन्ही धारिणीचा प्रारंभीक दिनांक व कालावधीसंबंधी माहिती मागीतली होती. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली सविस्तर माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत निःशुल्करित्या पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:११.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३८/०२**

**श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट,**
**जी.एम.राणे बिल्डिंग व खंबाटा पठाण चाळ,**
**डॉ.इ.मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना.म. जोशी मार्ग,**
**मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(जलकामे),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना.म. जोशी मार्ग,**
**मुंबई-४०००१३. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. चंद्रकांत मर्चंट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.१०.२००९ रोजी अर्ज करुन लोअर परेल विभागातल खैबर प्रॉपर्टीच्या प्लॉट क्र.१५३ सी.एस.क्र.११३,११२, वरळी, मुंबई-१८ येथील जल जोडणी संबंधाने खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

१)उपरोक्त प्रॉपर्टीच्या प्रोजेक्ट संबंधाने जल जोडणी करण्यात आल्याने त्यासंबंधी जल विभागाकडून देण्यात येणारी पाणीपट्टीची चालु महिन्याची बिलाची प्रत देणे.

२) जल जोडणीची अनामत रक्कम देणेसाठी मुद्रांक शुल्क स्थित करारपत्र करण्यात आले, त्या करारपत्राची रंगीत झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन तात्काळ देणे.

३) जलजोडणीसाठीचे मालकाचे संमती पत्र रंगीत झेरॉक्स प्रतीत देणे.

४)उपरोक्त प्रोजेक्ट संबंधाने बीएमसी ॲक्ट २७०A नुसार एच.इ. विभागाने सुपूर्द केलेल्या प्रमाणपत्राची प्रत तात्काळ देणे

५)ऑक्यूपेशन परमिशन संबंध्ांने जल अभिलेख नोंदणीची सर्व कागदपत्रे तात्काळ देणे.

जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.२६.११.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सुनावणी दरम्यान नमूद केलेल्या बाबीच्या अनुषंगाने, सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने उपलब्ध दप्तराची पडताळणी करुन आदेश पारित झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास विनाशुल्क माहिती पुरवावी असे जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही वारंवार हेलपाटे घालून फी नाकारणे या बेबंदशाळीमुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जल जोडणी संबंधाने अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.६.०१० रोजी दुपारी ३.०० वाजता सर्व संबंधीत कागदपत्र निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावीत.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१४.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९३५/०२**

**श्री. आर.बी. दांडीवाला,**
**७०,डॉ.व्ही.बी. गांधी मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०००२३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,९वा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबइ्र-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**कुर्ला कार्यालय, टोपीवाला कॉलेज कंनऊंड,**
**१ला मजला, सरोजिनी नायडू मार्ग,**
**मुलुंड(प.), मुंबई-४०००८०.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. आर.बी. दांडीवाला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.८.२००९ रोजी अर्ज करुन मौजे कुर्ला येथील वाडीया इस्टेट कंपाऊंडमध्ये तलाठी सजा कुर्ला, अ,ब,क,तलाठी सजा मोटीली व तलाठी सजा असल्फा ही कार्यालये कार्यरत आहेत.तीन्ही कार्यालये स्थलांतरीत करण्याबाबत अपीलकाराने सुचविलेले आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने सुचविलेल्या जागांची खालीलप्रमाणे माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.९.०९च्या पत्रान्वये कळविली.

१) १)कुर्ला-पूर्व येथील इंदिरा नगर येथे बांधण्यात आलेले तलाठी ऑफीस
२)रमाबाई नगर,घाटकोपर येथे असलेले मोकळे आर.टी.ओ. ऑफीस
३)चेंबूर कँप तलाठी ऑफीस

परंतू वरीलपैकी क्र.१कुर्ला(पूर्व)येथील इंदिरा गांधी नगर येथील तलाठी ऑफीस चावडीचे अंतर्गत क्षेत्र अंदाजे ८फूट X १२ फूट असून या ठिकाणी तीन सज्यांचे तलाठी व त्यांचे रेकॉर्ड राहू शकणार नाहीत.

२) रमाबाई नगर घाटकोपर येथे असलेले मोकळे आर.टी.ओ.ऑफीसची जागा आर.टी.ओ.च्या मालकीची असून सदर ऑफीसचे दरवाजे खिडक्या सुस्थितीत नसून त्या ठिकाणी कार्यालय स्थलांतरीत करता येणार नाही.

३) तसेच चेंबूर कँप ही जागा पुनर्वसन शाखेच्या अखत्यारीत असून त्या ठिकाणी दोन खोल्यांमध्ये तलाठी सजा चेंबूर महसूल व तुर्भे असे तीन तलाठी व सर्कल ऑफीसेस यांची कार्यालये कार्यरत असून त्या ठिकाणी ११ गांवचे रेकॉर्ड व एक रुममध्ये पुनर्वसन शाखेचे कार्यालय आहे व तसेच दोन रुम मा.अप्पर तहसिलदार बिनशेती यांचे ताब्यात असून त्यांचे कार्यालय एका रुममध्ये व दुस-या रुममध्ये कार्यालयातील कागदपत्राचा रेकॉर्ड असल्यामुळे या ठिकाणी कार्यालय स्थलांतरीत करता येऊ शकणार नाही.

यामुळे समाधान झले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२३.१२.०९ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तलाठी कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबत सूचना करुन केलल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकाराशी संबंधीत नसल्याने अपीलकाराचे प्रथम अपील,प्रथम अपीलीय अधिका-यांनी निकालात काढले आहे. तलाठी कार्यालय कोणत्या जागेत कोठे असावे, तलाठी कार्यालय स्थलांतरीत करण्याची बाब माहितीच्या अधिकार कक्षेत मोडत नाही. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथ्म अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९२९/०२**

**श्री. संजय सावंत,**
**४०२,क्लासिक को.ऑप.हौ.सो.,अमृतवन कॉंम्प्लेक्स,**
**दिंडोशी डेपो समोर, यशोधन स्कूल जवळ,**
**गोरेगांव(पूर्व), मुंबई-४०००६३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विकास योजना अंमलबजावणी कक्ष,**
**ठाणे महानगरपालिका,शहर विभाग,**
**महानगर पालिका भवन,डॉ.अल्मेडा रोड,चंदनवाडी,**
**पांचपाखाडी,ठाणे-४००६०२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
**विकास योजना अंमलबजावणी कक्ष,**
**ठाणे महानगरपालिका,शहर विभाग,**
**महानगर पालिका भवन,डॉ.अल्मेडा रोड,चंदनवाडी,**
**पांचपाखाडी,ठाणे-४००६०२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. संजय सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१२.२००९ रोजी अर्ज करुन मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९८६ नुसार एम.आर.टी.एस. व कारशेड संबंधीत फेरबदलासंबंधीचे नस्तीची छायांकित प्रत पुरविण्याची मागणी केली होती. प्रस्तावाचे नस्ती कार्यालयाकडे उपलब्ध आहेत. सदर नस्तीचे अवलोकन करता येईल असे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता विकास योजना अंमलबजावणी कक्ष ठाणे महानगरपालिका,ठाणे यांनी अपीलकारास दि.२९.१२.०९च्या पत्रान्वये कळविले. माहिती अधिका-यांनी नमूद केलेल्या ४ पैकी ३ नस्ती नगर अभियंत्यांकडे आहेत. त्यामुळे त्यांचे अवलोकन करता आले नाही या कारणावरुन अपीलकाराने दिनांक १३.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी

सुनावणी आयोजित केली नही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एम.आर.टी.एस. व कारशेड संबंधीत फेरबदलासंबंधीचे नस्तीची छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध नस्ती निरिक्षणाकरीता दिली होती. सदर प्रकरणासंबंधीच्या ३ नस्त्या अपीलकारास निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन दिल्या नाहीत. यामुळे अपीलकारास नस्त्यांचे निरिक्षण करता आले नाही असे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सर्व संबंधीत नस्त्या अपीलकारास निरिक्षणाकरीता दि.३०.६.२०१० पूर्वी उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१४.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९४२/०२**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी(राव),**
**जे.२२०,अन्सा साकी विहार रोड,**
**साकीनाका, अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०००५९. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय(इमारत प्रस्ताव),**
**पूर्व उपनगरे,बृहन्मुंबई महानगर पालिका,राज लिगसी जवळ,पंपल मिल कंपाऊंड,**
**एल.बी.एस.मार्ग,विक्रोळी(प.),**
**मुंबई-४०००८३.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय(इमारत प्रस्ताव),**
**पूर्व उपनगरे,बृहन्मुंबई महानगर पालिका,राज लिगसी जवळ,पंपल मिल कंपाऊंड,**
**एल.बी.एस.मार्ग,विक्रोळी(प.),**
**मुंबई-४०००८३. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आर.पी.यजुर्वेदी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१.२०१० रोजी अर्ज करुन १) सी.टी.एस.क्र.२१०,पंचरत्न सहकारी गृहनिर्माण संस्था एन.एस.रोड,असल्फा घाटकोपर २)सी.टी.एस.क्र.२०९/अ,ओपन प्लॉट,असल्फा घाटकोपर या इमारत बांधकाम प्रस्तावासंबंधीच्या मंजूरीबाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथ्म अपीलीय अधिका-याकडे दि.८.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गृहनिर्माण संस्थेच्या बांधकाम प्रस्तावास मंजूरीबाबतची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलकारास निःशुल्करित्या टपालातून माहिती पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१४.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९४७/०२**

**श्री. विजय के. मंथेना,**
**७/३४, अब्दुला मेन्शन,**
**हरियानावाला लेन, स्टेशन रोड,**
**कुर्ला(पश्चिम), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग,धर्मादाय आयुक्त भवन,२रा माळा,**
**८३ डॉ.ॲनी बेझंट रोड,वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग,धर्मादाय आयुक्त भवन,२रा माळा,**
**८३ डॉ.ॲनी बेझंट रोड,वरळी, मुंबई-४०००१८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विजय मंथेना यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००९ रोजी अर्ज करुन ग्लोबल हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर (ब्रह्मकुमारिज)ओमशांती,४८ स्वस्तीक सोसायटी एन.एस.मार्ग क्र.३, जुहू स्किम विलेपार्ले(पश्चिम), मुंबई बी.एस.ई.एस. रुग्णालयाबाबत एकूण १७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. अपीलकाराने अर्जात नमूद केलेली माहिती कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नसल्याने, अशी माहिती संकलीत केली जात नसल्याने देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.१२.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२०.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकर्त्याने मागीतलेली माहिती कार्यालयाशी संबंधीत नसल्याने अपीलकर्त्यास सदर माहिती देता येणे शक्य नाही. त्यामुळे सदरचे अपीलात कोणतेही तथ्य आढळून येत नाही. म्हणून

प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२०.२.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील नामंजूर केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन बी.एस.ई.एस.रुग्णालयाबाबत एकूण १७ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध नाही. यामुळे जन माहिती अधिका-याने अपीलकारास त्याच्या अर्जावर दि.१५.१२.०९च्या पत्रान्वये समर्पक उत्तर दिले आहे. प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी उचित आदेश पारित केले आहेत. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९६६/०२**

**श्री. बाळू दत्तू कांबळे,**
**श्रद्धा ट्रेडर्स, इ.क्र.६४, विक्रोळी(पूर्व),**
**कन्नमवार नगर-२, विक्रोळी(पूर्व),**
**मुंबई-४०००८३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कर निर्धारक व संकलक,**
**निवडणूक कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**रुम नं.२८,तळमजला, जुनी इमारत, महापालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.निवडणूक व नगरशुल्क अधिकारी,**
**निवडणूक कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**रुम नं.२८,तळमजला, जुनी इमारत, महापालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. बाळू दत्तू कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)वर्ष १९९७, महानगर पालिका प्रभाग क्र.२०६, यादी भाग क्र.६६ यातील पहिले पान व पान क्र.२५६ ते २६१.

२)वर्ष २००२, महाराष्ट्र पालिका प्रभाग क्र.२११ यादी भाग क्र.६६ यातील पहिले पान व पान क्र.७०३ ते ७१४.

३)वर्ष १९९२ महानगर पालिका विभाग क्र.२०७ यादी भाग क्र.२२ यातील सर्व पानांच्या प्रती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.१०.२००९ रोजी पत्र पाठवून जनतेसाठी सन १९६०,१९६७,१९७२,१९७८,१९८५,१९९२,१९९७,२००२ व २००७ सालातील निवडणूकीसाठी तयार केलेल्या मतदान याद्या उपलब्ध आहेत, कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी

११.०० ते २.०० या वेळेत हजर राहून प्रत्यक्ष तपासणी करुन उतारे प्राप्त करुन घेता येतात,कार्यालयात प्रत्यक्ष येऊन हवी ती माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दि.३०.१०.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. एकूण रु.७०/- इतकी फी भरल्यानंतर अपीलकारास हवी असलेली माहिती देण्यात येईल असे दि.१४.१२.०९ च्या पत्रान्वये कळविले त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मतदार यादीतील उता-याच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे व्हावे म्हणून सर्व संबंधीत कागदपत्राचे प्रथम निरिक्षण करण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संधी उपलब्ध करुन दिली होती. अपीलकार कार्यालयाकडे फीरकलेच नाहीत. माहितीपोटी रु.७०/- इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी कळवूनही अपीलकाराने शुल्क भरले नाही. माहिती प्राप्त करुन घेतली नाही. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविण्याचे दृष्टीने सहकार्य दाखवले असल्याचे दिसते. परंतू अपीलकाराने कागदपत्राचे निरिक्षण कले नाही. माहिती पोटी शुल्क भरले नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१४.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९६७/०२**

**श्री. प्रभुदास ध.भावसार,**
**शर्मा चाळ, २/२ रामनगर, एम.डी.रोड,**
**कांदीवली(पूर्व), मुंबई-४००१०१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**८३, धर्मादाय आयुक्त भवन,**
**बृहन्मुंबई विभाग, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**८३, धर्मादाय आयुक्त भवन,**
**बृहन्मुंबई विभाग, डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रभुदास भावसार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन अपीलकाराच्या दि.१८.९.०९रोजीच्या तक्रार अर्जावर काय कायदेशिर कारवाई करण्यात आली त्याबाबत संपूर्ण लेखी स्वरुपाची माहिती आणि कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.८.३.०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपूर्ण कागदपत्र आणि चुकीची माहिती देण्यात आली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराच्या दि.१८.९.०९च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी चौकशी अहवालाची संबंधीत कागदपत्र अपीलकारास पुरविण्यात आली आहेत. तरी यामुळे अपीलकाराचे समाधान होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक श्री.सरोदे यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. उत्तरवादीने पुरविलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान होत नसेल तर माहितीच्या अधिकारात काही करता येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१४.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९७०/०२**

**श्री. सुधीर यशवंत सुर्वे,**
**एक्सप्लनेड मेन्शन, रुम नं.९८,**
**दुसरा मजला, काळा घोडा,**
**फोर्ट, मुंबई५ ४०००२३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहाय्यक पालीका आयुक्त यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, ३ रा मजला, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,**
**आझाद रोड, गुंडावली, अंधेरी(पूर्व),मुंबई-४०००६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालीका आयुक्त यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, ३ रा मजला, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,**
**आझाद रोड, गुंडावली, अंधेरी(पूर्व),मुंबई-४०००६९. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुधीर सुर्वे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

मोहम्मद अमिर शेख नावाच्या व्यक्तीने मोगरापाडा मस्जिद गल्ली, भाईदास भूता चाळ, डॉ.इक्बाल खान यांच्या दवाखान्यासमोर, मोगरापाडा,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९ या पत्त्यावर असलेल्या स्वतःच्या खोलीवर अनधिकृतरित्या तीन मजली रुमचे बांधकाम केले आहे त्याची तक्रार आम्ही आमच्या संघटनेच्या लेटरहेडवर दि.१३.११.२००९ रोजी आपल्या कार्यालयात केली आहे. परंतू आजपर्यंत आपण आमच्या लेखी तक्रारीवर कारवाई का केली नाही याचे आम्हाला लेखी उत्तर आपल्या कार्यालयामार्फत लवकरात लवकर द्यावे.

हवी असलेली माहिती ही खुलाशात्मक व स्पष्टीकरणात्मक स्वरुपातील असल्यामुळे अशी माहिती माहितीच्या अधिकारात देता येत नाही असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ. व का.) के/पूर्व विभाग श्री.म.भा.साळवे यांनी अपीलकारास दि.१३.१.०१० च्या पत्रन्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे

प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नि:शुल्करित्या आवश्यक ती माहिती आठ दिवसाचे आत पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.८.२.०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मोहम्मद अमिर शेख यांनी भाईदास भुता चाळीत केलेल्या अनधीकृत बांधकामाबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कार्यपध्दती सुरु झाली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९६९/०२**

**श्रीमती रेखा ह. यादव,**
**रुम नं.९, जगन्नाथ यादव चाळ,**
**ताहिरा कंपाऊंड, गुंफा रोड, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक पालिका आयुक्त कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३रा मजला,के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,**
**आझाद रोड, गुंडावली,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालिका आयुक्त कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**३रा मजला,के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,**
**आझाद रोड, गुंडावली,अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००६९. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती रेखा यादव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे दि.२४.८.०९ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने केलेल्या तक्रारीनुसार श्री.घनश्याम साधू यादव, हनुमान के.यादव चाळ, जिजामाता पंप हाऊस, अंधेरी(पूर्व), मुंबई-९३ येथे केलेली अनधीकृत बांधकामे कार्यालयामार्फत दि.१८.६.०९ रोजी निष्कासित करण्यात आली आहेत असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.) के/पूर्व विभाग यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२.१.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराच्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती ७ दिवसाचे आत अपीलकारास निःशुल्करित्या पुरवावी असे दि.२९.१.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि.२४.८.०९ रोजी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. या प्रकरणी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास निरिक्षणाकरीता दि.११.६.०१० रोजी दुपारी १२.०० वाजता सर्व संबंधीत कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर अपीलकारास हव्या असलेल्या निवडक कागदपत्रांच्या छायाप्रती पुरवाव्यात अशा द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यास आयोगाने सूचना दिल्या आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९७३/०२**

**श्री.जयवंत आप्पा दरवेस,**
**नाहूर विवेकानंद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**३/बी/३४ सर्वोदय नगर, जैन मंदिर रोड,**
**मुलूंड(प.), मुंबई-४०००८०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,**
**मुंबई मंडळ, उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जयवंत आप्पा दरवेस यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१२.०९ रोजी अर्ज करुन नाहूर विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज चालविणारे व्यवस्थापकीय समितीचे पदाधिकारी(कार्यकारी मंडळ) हे गेली ४ वर्षापासून संस्थेचे कामकाज चालवितांना महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत उपविधी यांच्या तरतुदीनुसार चालवित नसून मनमानी पध्दतीने कामकाज चालवित असल्याने संस्थेच्या पैशांचा गैरवापर होतो. संस्थेच्या कामकाजाबद्दल व पदाधिका-यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल त्यांच्याविरुध्द सदस्यांनी पाठविलेली पत्रे व तक्रार अर्जाची पोच दिली जात नाही. लेखी दिलेल्या तक्रार अर्ज व पत्रे यांना लेखी उत्तर पाठवून सदस्यांच्या समस्या व तक्रारीचे निवारण केले जात नाही. यामुळे पदाधिका-यांबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झाले. संस्थेच्या नियोजित पुनर्विकास प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथमअपीलीय अधिका-याकडे दि.१०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय

अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून आल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.११.३.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नाहूर विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या कामकाजाबाबत तक्रार करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०मधील कलम ३२ अनुसार सदर प्रकरणी अपीलकाराने उपनिबंधक यांचेकडे संपर्क साधावा असा अपीलकारास आयोगाचा सल्ला देण्यात येत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९७४/०२**

**श्री.जयवंत आप्पा दरवेस,**
**नाहूर विवेकानंद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**३/बी/३४ सर्वोदय नगर, जैन मंदिर रोड,**
**मुलूंड(प.), मुंबई-४०००८०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,**
**मुंबई मंडळ, उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.जयवंत आप्पा दरवेस यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.१२.०९ रोजी अर्ज करुन नाहूर विवेकानंद गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांचे पत्र, तक्रार अर्ज व संस्थेच्या पदाधिका-यांविरोधात गठीत केलेल्या चौकशी समितीची संपूर्ण कागदपत्र व अंतिम अहवालाच्या निष्कर्षाच्या कागदपत्रच्या साक्षांकित छायाप्रती तसेच सदस्यांनी पाठविलेली पत्रे,तक्रार अर्ज यांना उपनिबंधकांनी पाठविलेल्या उत्तराच्या व केलेल्या पत्रव्यवहाराच्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.११.३.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नाहूर विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांचे पत्र,तक्रार अर्ज व संस्थेच्या पदाधिका-यांविरोधात गठीत केलेल्या चौकशी समितीचे संपूर्ण कागदपत्र व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास मागणीनुसार माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सर्व संबंधीत कागदपत्र दि.१४.७.२०१० रोजी निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर अपीलकाराने मागणी केलेल्या निवडक कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०१७/०२**

**श्री. अप्पा केकाणे,**
**३/२३, सिध्दार्थ नगर ५,प्रबोधन क्रिडा भवनासमोर,**
**गोरेगांव(प.), मुंबई-४००१०४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी मि.व्य.-२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-४,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अप्पा केकाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.११.०८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

श्री.महेश भिकाजी धुरी यांनी गाळा क्रमांक २७/२११, जुने सिध्दार्थ नगर-१,पत्रा शेड, गोरेगाव(प.), मुंबई-४००१०४ यांचे नावे म्हाडा विनिमय १९८१,विनिमय क्र.२५ नुसार बदलून घेण्यासाठी दि.१९.९.०८ रोजी अर्ज केलेला आहे त्यावर घेतलेल्या निर्णयाची माहिती मला मिळावी ही विनंती.

जुने सिध्दार्थ नगर, पत्राचाळ या वसाहतीतील गाळा क्र.२७/२११ (विनियम १९८१ विनियम क्र.२५) या गाळयाच्या नियमितीकरणासाठी कार्यवाही सुरु आहे असे जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-४ मुंबई मंडळ यांनी दि.१७.१.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२४.१२.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. गाळा नियमित करुन

मिळण्यासंबंधीचे आदेश मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गाळा नियमित करुन देणेबाबत माहिती मागीतली होती. श्री.महेश धुरी, गाळा क्र.२७/२११ जुने सिध्दार्थ नगर-१ गोरेगाव(प.), मुंबई-४०००१४ हा गाळा त्यांचे नावे म्हाडा विनियम १९८१ विनियम क्रमांक २५ अन्वये नियमित करुन मिळण्यासंबंधीचे आदेश मिळालेले नाहीत असा अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. श्री.महेश धुरीच्या नावाने गाळा क्र.२७/२११ नियमित करुन दिलेला नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास सदर प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती कळवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०१८/०२**

**श्री. अप्पा केकाणे,**
**३/२३, सिध्दार्थ नगर ५,प्रबोधन क्रिडा भवनासमोर,**
**गोरेगांव(प.), मुंबई-४००१०४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी मि.व्य.-२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-४,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अप्पा केकाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.१२.०७ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

माझा माहितीचा अधिकार अर्ज, दि.१२.१.०७ अन्वये डॉ.किशोर व्ही.आडवाणकर यांनी त्यांचा अर्ज दि.११.१२.०६ अन्वये त्यांचे नावे असलेला गाळा क्रमांक २९/२३५ मोतीलालनगर-१ गोरेगांव(प.), मुंबई-४००१०४ हा रहिवाशी वापराचे ऐवजी डॉक्टरांचे क्लिनीक/दवाखाना या वाणिज्य कारणाकरीता वापर करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे. त्यांनी आवश्यक ते सेवा शुल्क, अन्य देय रकमांचा भरणा केलेला आहे. कागदपत्रे देखील सादर केलेली आहेत. तसा वापर करण्यासंबंधी आपण त्यांना दिलेल्या आदेश पत्राच्या प्रतीची छायांकित प्रत मला मिळावी अथवा कांही अडचण असल्यास त्याची माहिती मला मिळावी अशी विनंती आहे.

गाळा क्रमांक २९/२३५ मोतीलाल नगर-१ या गाळयाचा रहिवाशी वापराचे ऐवजी डॉक्टरांचे क्लिनीक दवाखाना या वाणिज्य कारणाकरीता वापर करण्याचा प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक(४) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी अपीलकारास दि.२९.१.०८ च्या पत्रानवये कळविले.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.१.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिति पुरविण्याबाबत आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मोतीलालनगर क्र.१,गाळा क्रमांक २९/२३५, गोरेगांव(प.), मुंबई-४००१०४ हा गाळा रहिवाशी वापर करण्याऐवजी वाणिज्य वापर करण्यास परवानगी मिळण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविली नाही. निवासी गाळयाचा निवासी ऐवजी (वाणिज्य)अनिवासी वापर करण्यास परवानगी मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी. सदर प्रकरणी उत्तरवादीने विहित कालावधीत अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९७२/०२**

**श्री. दत्ताराम कृष्णा ठोंबरे,**
**३४/एल.जी.१, शिवेश अपार्टमेंट,**
**शिवगंगा नगर,बालाजी मंदिरामागे,**
**अंबरनाथ(पूर्व), जि.ठाणे-४२१५०१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सं.गा.(पश्चिम विभाग),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, २रा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-सं.गा.(पश्चिम विभाग),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, २रा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दत्ताराम ठोंबरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.०९ रोजी अर्ज करुन कुलाबा संक्रमण शिबिर येथील १९/४ खोली क्र.४(२६५)कुलाबा, मुंबई या खोलीबाबत सन १९९४ पासून श्री.विश्वनाथ कृष्णा ठोंबरे(मृत)व त्यांचे कुटुंब व अपीलकार यांच्यामध्ये दिवाणी न्यायालय मुंबई येथे केस चालू होती.(केस क्र.५९०५/९४) या केसचा निकाल दि.६.४.२००९ रोजी लागला असून न्यायालयाने श्री.विश्वनाथ ठोंबरे आणि त्यांचे कुटुंब यांचा दावा फेटाळून लावला आहे. तरी सदर प्रकरणी म्हाडाने आत्तापर्यंत श्री.विश्वनाथ ठोंबरे यांच्या कुटुंबियांविरुध्द काय कारवाई केली याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दि.९.३.०१० रोजी सादर केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी विहित मुदतीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश दिले नाहीत. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कुलाबा संक्रमण शिबीर येथील क्रमांक १९/४ खोली क्र.४(२६५)बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**मुंबई**
**दिनांक:१५.६.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०२०/०२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ,रुम क्रमांक २,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,परि.-३,**
**मध्य नियंत्रण कक्ष,भायखळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,भायखळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामशंकर सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.३.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

धारावी पो.ठाणे मधील दि.९.४.०९ रोजीचे दैनंदिनी नोंद संबंधीत माहिती.सदर विषयानुसार नोदवहीत नमूद रामशंकर अ.सरोज यांनी सदर गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांस नमूद गुन्हयानुसार अटक करण्यात आली असून त्यात त्यांना न्याय हक्कांची जाणीव करुन देऊन असे नमूद असून गुन्हयाची अपीलकाराच्या कबुली जबाबाची साक्षांकित प्रत आणि अपीलकाराच्या न्याय हक्काची जाणीव करुन दिली याबाबत पुराव्याची साक्षांकित प्रत मिळण्याबाबत.

अपीलकाराविरुध्द दिनांक ९.४.०९रोजी दाखल गुन्हयाचे धारावी पोलीस ठाणेमधील दैनंदिन नोंदवहीमधील गुन्हा नोंद संबंधीत दैनंदिनीच्या प्रती अभिलेखावर उपलब्ध आहेत. त्याची साक्षांकित माहिती सोबत पाठविण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी दि.२९.१.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१५.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. धारावी पोलीस ठाणे यांचा जा.क्रमांक २६९७/१० दिनांक २१.४.२०१० अन्वये अहवाल प्राप्त झाला. सदर अहवाल जन माहिती अधिका-यांनी दि.२२.४.२०१० च्या पत्रानुसार अपीलकारास

उपलब्ध करुन दिला.यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन धारावी पोलीस ठाणे मधील दि.९.४.०९ रोजीचे दैनंदिनी नोंद संबंधीत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्धअसलेली माहिती अपीलकारास पुरविली आहे असे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास उपलब्ध माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०१२/०२**

**श्री. राजेंद्र अर्जून चव्हाण,**
**१,सुभद्रा अर्जून चव्हाण चाळ,**
**आर.बी. कदम मार्ग, भटवाडी,**
**घाटकोपर(पश्चिम), मुंबई-४०००८४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. राजेंद्र चव्हाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.१२.२००९ रोजी अर्ज करुन सी.टी.एस.क्रमांक ५१, सर्व्हे क्रमांक २७,गोवर्धन सोसायटी,भटवाडी,घाटकोपर-५/८४ न्यू मॅक ग्रुप एस.आर.ए.बिल्डिर्स अँड डेव्हलपर्स च्या एस.आर.ए.प्रोजेक्ट बद्दल सविस्तर माहिती मागीतली होती. एस.आर.ए.प्रोजेक्ट संबंधीत सर्व कागदपत्र साक्षांकित करुन सहिनीशी प्रत्येक पान साक्षांकित करुन देण्याची मागणी केली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती ही मोठया स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख व सामुग्रीचे निरिक्षण करावे. त्यानंतर अपीलकाराने निवड केलेली माहिती विहित शुल्क भरुन प्राप्त करु शकता असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.१.२०१० च्या पत्रान्वये कळविले यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नाही. यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एस.आर.ए.प्रोजेक्ट बद्दल सविस्तर माहिती मागीतली होती. या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सर्व संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करुन हव्या असलेल्या कागदपत्रांची माहिती पुरविण्यात येईल असे कळविले होते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मूळ माहिती (Basic Information) निःशुल्करित्या पुरवावी. अपीलकार जर कार्यालयात संबंधीत कागदपत्राच्या निरिक्षणाकरीता उपस्थित राहिले व त्यांनी कागदपत्रचे निरिक्षण करुन निवडक कागदपत्राची मागणी केली तर अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४९/०२**

**श्री. सतिश फरिदा चव्हाण,**
**द्वारा- डी/३, देवरत्न नगर ४०४,**
**४था माळा, चुनाभट्टी, मुंबई. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,१०वा मजला,**
**सरकारी वसाहत, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर भूमापन अधिकारी बोरीवली यांचे कार्यालय,**
**तहसिलदार व नगर भूमापन अधिकारी कार्यालय इमारत,**
**४था मजला, डॉ.न.रा. कराडे मार्ग,एस.व्ही.रोड,**
**शिपोली जंक्शन,बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सतिश चव्हाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.६.१.२०१० रोजी अर्ज करुन नगर भूमापन कांदिवली येथील न.भू.१२८ अ/६६ ते अ-७७ बाबत क्षेत्र दुरुस्ती करण्यात आली आहे त्याबाबत कार्यालयीन टिप्पणी/परिरक्षण भूमापन टिप्पणी/क्षेत्रदुरुस्ती अहवाल/२००७ मधील एम.आर.क्र.२००९ मधील एम.आर.क्रमांकचा मोजणी नकाशा त्यात झालेली दुरुस्ती प्रमाणे जिल्हाधिकारी यांचकडील आदेश,मोजणी नकाशा, मिळकत पत्रिका इत्यादीच्या छायाप्रती व इतर अनुषंगिक एकूण ८ मुद्यावर माहिती मागीतली होती.जन माहिती अधिका-यांनी पत्राद्वारे मोघम उत्तर दिले. अपीलकार समक्ष हजर असतांना माहिती न देता वैयक्तिक माहिती विचारुन अपमानित होईल अशी भाषा वापरुन माहिती देण्यास जन माहिती अधिकारी विलंब करीत असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दिनांक २८.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२९.३.२०१० रोजी

आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत कागदपत्र निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावेत. अपीलकाराने कार्यालयात हजर राहून संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करावे. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हव्या असलेल्या निवडक कागदपत्राच्या छायाप्रती १५ दिवसाचे आत पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१६.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५००६/०२**

**श्री. विरेश सुरेश महिंद्रकर,**
**पवन कुटीर, ३०३,**
**व्हिनस रोड, उल्हासनगर-४,**
**जिल्हा-ठाणे .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग(नवि-१२),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगर विकास विभाग(नवि-१२),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विरेश महिंद्रकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन उल्हासनगर कँप ४ स्थित सिटीएस क्र.२०६८५ व सीटीएस क्र.२०७०५ मधील मोकळया जागेवर मंजूर विकास आराखडयाप्रमाणे रस्त्यासाठी आरक्षित भूखंडाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संदर्भातील नस्तीचा कार्यासनात शोध घेण्यात येत असून अद्याप सदरची माहिती उपलब्ध झालेली नाही. सदरची माहिती उपलब्ध होताच अपीलकारास पाठविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उल्हासनगर कँप-४ स्थित सी.टी.एस.क्र.२०६८५ व सीटीएस क्र.२०७०५ मधील

मोकळया जागेवर मंजूर विकास आराखडयाप्रमाणे रस्त्यासाठी आरक्षित भूखंडाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्दा क्रमांक २ ते ५ या ४मुद्यांबाबत माहिती पुरविली नसल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उल्हासनगर महानगरपालिकेतील जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जातील मुद्दा क्रमांक २ ते ५ बाबतची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१६.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७१५/०२,**

**श्री. रमेश बा.पटेल,**
**रुम नं.१०,दुसरा मजला,**
**विजय अपार्ट मेंट को.ऑप.हौ.सो.विराट नगर,**
**पी.पी.मार्ग, विराट मित्र मंडळ कार्यालयासमोर,**
**विरार(प.), ता.वसई,जि,ठाणे-४०१३०३. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक(पणन),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. रमेश पटेल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२०.१०.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.२.०९ रोजी अर्ज करुन बांद्रा येथील रंगशारदा सभागृहात दि.१९.५.०९ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीमध्ये अल्पगट उत्पन्न,मध्यगट उत्पन्न,उच्च गट उत्पन्न यांच्या योजना कोड क्रमांक मधील सर्व अनुसूचित जमाती आरक्षण गटामधील प्रतिक्षाधीन उमेदवार आणि यशस्वी लाभार्थी उमेदवारांची योजना कोड क्रमांक २१६ ची संपूर्ण नावे आणि पत्ते याची माहिती व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपुरी माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/३५७०/०२ दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१६.१२.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या दि.१६.१२.०९ च्या आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरवावी. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही, आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. याकरीता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन या प्रमादाबद्दल गैरतक्रारदाराविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५,०००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई का सुरुकरण्यात येऊ नये याबद्दल हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०१०/०२,**

**श्री. साधू खान,**
**६० फीट रोड, पी.एम.जी.पी. कॉलनी,**
**बिल्डिंग नं.८/३,रुम नं.११५,**
**प्लॉट नं.५०१, धारावी डेपो,**
**मुंबई-४०००१७.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**जी/उत्तर विभाग कार्यालय,हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर(पश्चिम), मुंबई-४०००१७.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. साधू खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.९.३.२०१० रोजी अर्ज करुन तक्रारदार श्री.मुन्ना खान पी.एम.जी. कॉलनी धारावी, मुंबई यांचे मुन्ना हेअर कटींग सलून,६० फुटी रोड,धारावी हे दुकान सन १९९० साली मुंबई महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणाच्या कामात निष्कासित केले होते. सदर दुकानाच्या बदल्यात त्यांना आजतागायत पुनर्वसन अनिवासी गाळा मिळाला नाही. त्यांच्या अस्तीत्वात नसलेल्या दुकानाबाबत ओळखपत्र मिळणेसाठीचा नवीन गणनाफॉर्म ओळखपत्र मोहिम २००१ अंतर्गत नोंद करुन घ्यावा अशी तक्रारदाराची तक्रार आहे. तक्रारदार स्वतः नमूद करतात की, सन १९९० ला त्यांची जागा निष्कासित केली. १९९० ला तक्रारदाराचे झोपडे पर्यायी जागा न देता तोडले असेल तर ते झोपडे तेव्हा अनधिकृत असण्याची शक्यता आहे. परंतू तत्कालीन परिस्थितीचे आकलन होत नाही असे सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग यांचे अभिप्राय तक्रारीतील कागदपत्रवरुन दिसून येतात. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने

तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

झोपडीच्या फोटोपासकरीता तक्रारदाराचे नावाची नोंद केली जात नाही अशी तक्रारदाराची मुख्य तक्रार असल्याचे तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारदाराची झोपडी सन १९९० मध्ये मुंबई महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणात निष्कासित केली आहे. सध्या झोपडी अस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत तक्रारदारास फोटोपास मिळवून देण्याकरीता आयोगाकडून कांही मदत करता येत नाही. अशा परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१६.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०१२/०२,**

**श्री. मुन्ना खान,**
**मुन्ना हेअर कटींग सलून,**
**६० फीट रोड,पी.एम.जी.पी.कॉलनी,**
**बिल्डिंग नं.सी/३, रुम नं.११५,**
**धारावी डेपोजवळ, मुंबई-१७.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण निवारण अधिकारी,**
**उप-जिल्हाधिकारी(अति./निष्का.)धारावी विभाग,**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, फोर्ट, मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. मुन्ना खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२१.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.१२.२००९ रोजी अर्ज करुन दि.१७.११.०९ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दि.९.१.२०१० च्या पत्रान्वये तक्रारदारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

“शासन निर्णय गवसू १२२०/प्र.क्र.२०४(१)झोपसू-१ दि.११.१०.२००१ नुसार सर्वेक्षण समयी अस्तीत्वात असलेल्या झोपडीत झोपडपट्टीवासी रहात असला पाहिजे या शासनाचे धोरणानुसार तक्रारदाराची झोपडी अस्तित्वात नसल्यामुळे तक्रारदाराची विनंती केल्या प्रमाणे झोपडीचे सर्वेक्षण करुन गणना फॉर्म भरता येत नाही.”यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

नवीन गणना फॉर्म मिळाला नसल्याबाबत तक्रारदाराची तक्रार आहे. तक्रारदाराचे धारावी येथील ६० फुटी रस्त्यात सलुनचे दुकान होते. सदरचे दुकान रस्ता रुंदीकरणात सन १९९० मध्ये निष्कासित करण्यात आले. पर्यायी जागा देण्यात आली नाही असे तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारदाराची झोपडी ब-याच कालावधीपासून अस्तित्वात नाही. अशा तक्रारीसंबंधी आयोगासमोर माहितीच्या अधिकारात अपील चालवित येणार नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१६.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९९८/०२**

**श्री. हुसेन इस्माईल चित्तलवाला,**
**३१६-३१८,एम.एस.अली रोड,**
**कांता बिल्डिंग, ए ब्लॉक,४था माळा,**
**मुंबई-४०००07.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ(म्हाडाचा घटक),**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(दुवपु-२),**
**गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हुसेन इस्माईल चित्तलवाला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.१.२०१० रोजी अर्ज करुन कांता बिल्डिंग नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भूसंपादन करावयाच्या प्रस्तावाबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास अधिनियम १९७६ मधील कलम ९३(५) अनुसार अधिसूचना निर्गमित करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी खालीलप्रमाणे अपीलकारास माहिती कळविली.

इमारत क्रमांक ३१६-३२० कांता बिल्डिंग या इमारतीसह व त्यावरील कांता बिल्डिंग नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी भूसंपादन करावयाच्या प्रस्तावाबाबत दि.३१.५.०७ रोजी निष्कर्ष काढून स्विकारले आहेत. सदर निष्कर्षानंतर दि.५.६.०७ रोजी शुध्दीपत्रक काढून विषयांकित मालमत्तेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुमती याचिका क्र.५३०२/१९९२ यामध्ये निर्गमित होणारे अंतिम आदेशास अधिन राहून प्रस्ताव स्विकारण्यात आलेला आहे. सदर आदेश अंतिम आहे असे गृहीत धरु नये असे शुध्दीपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

उपरोक्त विशेष अनुमती याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१.५.१९९६ च्या अंतरीम आदेशानुसार भूसंपादनाच्या प्रस्तावामध्ये अंतिम आदेश निर्गमित करु नये असे आदेश असल्याने भूसंपादनाच्या प्रस्तावामध्ये ९३(५) ची अधिसूचना शासनाकडून निर्गमित करण्यात येत नाही. सदर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे अंतिम निकाल निर्गमित झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सदर प्रकरणी निर्गमित केलेल्या अधिसूचनेची प्रत मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने अर्जात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियम १९७६ मधील कलम ९३(५)अनुसार अधिसूचनाच प्रसिध्द करण्यात आली नव्हती असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९९९/०२**

**श्री. सुरेश पी.गोखले,**
**१/८/६०२, लाभ-दर्शन-१,**
**सबवे जवळ, दहिसर(पूर्व),**
**मुंबई-४०००६८.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था-३ यांचे कार्यालय,गृहनिर्माण भवन,कक्ष क्र.६९,**
**तळमजला, वांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**आर विभाग, मुंबई,**
**३१६, अे-१ बिल्डिंग, वडाळा ट्रक टर्मिनल,**
**वडाळा(पूर्व), मुंबई-४०००३७.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुरेश गोखले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.१२.२००९ रोजी अर्ज करुन अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१.१.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक सहकारी संस्था, आर विभाग मुंबई यांचे कार्यालयाने संस्थेवर केलेल्या कारवाईबाबत अथवा करीत असलेल्या कारवाईबाबत अपीलकारास कळवावे असे दि.२८.१.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संस्थेकडून उत्तर प्राप्त झाले किंवा नाही याबाबत जन माहिती अधिका-यांनी हेआदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१६.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५००४/०२**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, गोकूळ डॉ.पेडणेकर बिल्डिंग,**
**स.म. मार्ग, कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. निशांत घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.२.२०१० रोजी अर्ज करुन मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या कार्यकक्षेतील नेहरुनगर विधानसभा मतदार क्षेत्रात स्थानिक आमदार श्री.नवाब मलिक यांच्या प्रयासाने बांधण्यात आलेल्या पिक-अप शेडबाबत सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२८.४.२०१० रोजी आदेश पारित केले. चुकीची,खोटी दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नेहरुनगर विधानसभा मतदार क्षेत्रातील पिक-अप शेडबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१६.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४६९७/०२**

**श्री. श्रीकांत राजाराम बेलवलकर,**
**अे/, राजाराम म्हात्रे चाळ,**
**रामकुवर ठाकूर मार्ग,**
**दहिसर (पूर्व), मुंबई-४०००६८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता,**
**आर/मध्य यांचे कार्यालय,२रा मजला, महापालिका मंडई इमारत,**
**स्वामी विवेकानंद मार्ग, बोरीवली(पश्चिम),**
**मुंबई-४०००९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**आर/मध्य यांचे कार्यालय,२रा मजला, महापालिका मंडई इमारत,**
**स्वामी विवेकानंद मार्ग, बोरीवली(पश्चिम),**
**मुंबई-४०००९२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. श्रीकांत राजाराम बेलवलकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.९.२००९ रोजी अर्ज करुन सुकुरवाडी,एम.जी.रोड,बोरीवली(पूर्व) येथील अनधिकृत बांधकामाविषयी माहिती मागवली होती. परंतु जन माहिती अधिका-यांनी सदर माहितीबाबत संबंधित त्रयस्थ व्यक्तींनी हरकत घेतल्यामुळे माहिती देण्यास नकार दिला होता. सदर प्रकरणी अर्जदाराने प्रथमअपीलीय अधिका-याकडे अपील दाखल केले असता प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अर्जदारोन मागीतलेली माहिती सत्वर तसेच नि:शुल्क उपलब्ध करुन देण्याबाबत दि.१८.११.२००९ रोजी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्या दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असता अपीलकारास दि.८.१२.०९ च्या पत्रान्वये संबंधित कागदपत्रे/माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन दिली असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी कागदपत्र प्राप्त झाली परंतु माहिती मिळाली नसल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले.सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे कागदपत्र प्राप्त झाली म्हणजेच अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असे या प्रकरणी दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१७.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९९१/०२**

**श्री. अरविंद वसंत शिंदे,**
**एच १४/८,म्युनिसिपल कॉलनी,**
**बर्वेनगर,घाटकोपर(प.),**
**मुंबइ-४०००८४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**कार्यकारी अभियंता एन विशेष यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,तिसरा मजला,**
**जवाहर रोड,घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**कार्यकारी अभियंता एन विशेष यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,तिसरा मजला,**
**जवाहर रोड,घाटकोपर(पूर्व),**
**मुंबई-४०००७७.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अरविंद शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन एम.जी.रोड,घाटकोपर(पू.), मुंबई-४०००७७ येथील श्री.अमर हिंगवाला यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत श्रीम.रेणूका रामदास शेजवळ यांनी सह.आयुक्त,एन/विभाग यांचेकडे दि.२४.१२.०९ रोजी तक्रार केली होती. अर्जात नमूद केलेल्या कारवाईची माहिती न देता माहिती लपविण्याचा प्रयत्न केल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. महिती दिली

नसल्याच्या कारणावरुन व्यथीत होउान अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.अमर हिंगवाला यांनी हिंगवाला तबेल्याजवळ रु.२५ कोटीचे अनधिकृत बांधकाम केले आहे. सदर बांधकामाला कार्यालयामार्फत परवानगी देण्यात आली नसल्याचे सहा.आयुक्त यांनी माहितीपत्राद्वारे कळविले आहे. त्या बांधकामाबाबत कारवाई करण्याबाबत श्रीम.शेजवळ यांनी तक्रार केली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. संबंधीत कागदपत्रे निरिक्षण करण्याची ३० दिवसाच्या आत अपीलकारास संधी उपलब्ध केली. सध्या फाईल सहाय्यक आयुक्त बृहनमुंबई महानगरपालिका यांचेकडे गेली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.)श्री.श.अ.हकीम यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**मुंबई**
**दिनांक:१७.६.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९६१/०२**

**श्री. गुलाम मोहम्मद अब्दुल अजीज बनानी,**
**रुम नं.८११/१/२, कलेक्टर चाळ,**
**यु.पी.रेस्टॉरंटच्या पाठीमागे, चिराग नगर,**
**मच्छी मार्केट, घाटकोपर(प.), मुंबई-४०००८६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-९ यांचे कार्यालय,**
**हिल रोड,बांद्रा(पश्चिम)**
**मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पश्चिम नियंत्रण कक्ष,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गुलाम मोहम्मद अब्दूल अजीज बनानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१.२०१० रोजी अर्ज करुन नसीम खान व त्यांच्या गुंडांनी व नातेवाईकांनी अपीलकारास जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी अपीलकाराने जे अर्ज दिले होते त्यानुसार सदर लोकांवर कोणती कारवाई झाली याबाबतची संपूर्ण माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास ४८ तासात मागीतलेली माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१२.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नसीमखान व त्यांच्या गुंडांनी, नातेवाईकांनी अपीलकारास जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता त्यावेळी अपीलकाराने केलेल्या अर्जावरील कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी तक्रार अर्जाची चौकशी पोलीस उप निरिक्षक श्री.भाट हे करीत आहेत. सदर तक्रार अर्जाबाबत चौकशी पूर्ण होताच तक्रारदार यांना माहिती पुरविण्यात येईल. अपीलकारास थोडयाच कालावधीत माहिती पुरविण्यात येणार असल्याचे कळविले असल्याचा वरीष्ठ पोलीस निरिक्षक, साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई श्री.समाधान धनेधर यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी तपास पूर्ण झाल्यानंतर अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९४६/०२**

**श्री. वसंत रायाप्पा चव्हाण,**
**द्वारा सीटाडेल एनक्लेव,बिल्डिंग नं.डी-३,**
**ब्लॉक नं.२०३,२रा माळा,बी.टी.कवाडे रोड,**
**मुंढवा, पुणे -४११०३६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरिक्षक,**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी,**
**कक्ष अधिकारी,गृह विभाग,पोल-१३,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. वसंत चव्हाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.८.२००९ रोजी अर्ज करुन दि.२२.१.२००९ च्या अर्जाच्या सद्यस्थितीबाबत माहिती मागीतली हाती. अपीलकाराचा दि.२२.१.०९ चा मूळ अर्ज दि.३१.१.०९ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सक्षम अधिकारी असल्याने त्यांचेकडे पुढील कारवाईकरीता पाठविण्यात आला असल्याने त्यांचेशी संपर्क साधावा असे उत्तरवादीने अपीलकारास दि.१०.९.०९च्या पत्रान्वये कळविले.

अपीलकाराने मा.लालुप्रसाद यादव,तत्कालीन रेल्वे मंत्री,भारत सरकार यांना भा.दं.वि.कलम २१७ व २१८ सह.फौ.प्र.स.कलम १९७ प्रमाणे खटला दाखल करण्याबाबत परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. अपीलकाराचे विनंतीप्रमाणे कारवाई करण्याचे झाल्यास केंद्रीय गृह विभाग, नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणे क्रमप्राप्त आहे असे जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी पोलीस महासंचालक, मुंबई श्री.किरण उपासनी यांनी दि.२३.९.०९ च्या

पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.७.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१.१२.०९ रोजी आदेश पारित केले.

सदर अपीलावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि.२२.१.०९ च्या अर्जाच्या सद्यस्थितीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की,जन माहिती अधिकारी,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकारास उचित उत्तर द्यावे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१७.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०१०/०२**

**श्री. वसंत दगडू इंगळे,**
**के.डब्ल्यू.पी.आय.म्युनिसिपल कॉलनी,**
**दादाभाई क्रॉस रोड,टेप व्हिलेज,अंधेरी(पश्चिम),**
**मुंबई-४०००५८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासकीय सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरण,**
**हायपीक अपार्टमेंट,जुने कोर्ट इमारत,**
**एस.व्ही.रोड, वांद्रे(पश्चिम), मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरण,**
**हायपीक अपार्टमेंट,जुने कोर्ट इमारत,**
**एस.व्ही.रोड, वांद्रे(पश्चिम), मुंबई-४०००५०.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आनंद इंगळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.४.२०१० रोजी अर्ज करुन श्री.सुरेश शांताराम चव्हाण यांनी बृहनमुंबई जिल्हा/उपनगर विधी सेवा प्राधिकरणात मयत सख्या भावाचे (कै.देवदास शांताराम चव्हाण यांचे)राहते घर आनंद दगडू इंगळे यांनी बळकावल्या संबंधात तक्रार केली, श्री.सुरेश चव्हाण यांनी कै.देवदास चव्हाण यांचे वारसदार म्हणून प्राधिकरणात जी कागदपत्रे सादर केली त्या कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रतीची मागणी केली होती. अपूर्ण माहिती तसेच माहिती पुरविण्यास रक्कम घेतल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.९.४.२०१० रोजी म्हणजे ३० दिवसाचा विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने केलेले प्रथम अपील प्राधिकरणाचे सचिव यांचेपुढे चालू शकत नाही. कारण प्राधिकरणाचे सचिव हे जन माहिती

अधिकारी असून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.५.५.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मयत सख्या भावाचे अपीलकाराने बळकावलेले घरासंबंधी अनुषंगिक माहिती मागीतलली होती. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता उपस्थित नव्हते. उत्तरवादी द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर होते. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०१३/०२**

**श्री. मो.असीफ अंसारी,**
**जन आधार सेवा समिती,उ.मु.जि.मालाड,**
**रुम नं.१,कुतुबुद्दिन चाळ,अपना नगर,आकुर्ली रोड,**
**कांदिवली(पूर्व), मुंबई-४०० १०१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(पश्चिम),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(पश्चिम),**
**मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मो.असीफ अंसारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.३.२०१० रोजी अर्ज करुन सार्वजनिक शौचालयावर केलेलेअवैध अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत तक्रार केली होती. अवैध बांधकाम निष्कासित केले नाही तर सदर बांधकाम कोणाही व्यक्तीच्या अंगावर पडले तर याची जिम्मेदारी कोणाची याची माहिती मागीतली होती.

विभागातील संबंधीत अधिका-यांनी जागेची पहाणी केली असता पहिल्या मजल्याचे बांधकाम नवीन स्वरुपाचे नसल्याचे आढळले तरी खात्याकडून बांधकामाविषयीचे जुने कागदपत्र पडताळणीसाठी सदर बांधकामाच्या मालकांना पत्रवजा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने बांधकाम मालकाने कार्यालयात जुने कागदपत्रक सादर केले. तसेच त्यांनी सादर केलेले करनिर्धारण पत्र हे संबंधीत खात्याकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आलेले आहे आणि पुढील

कार्यवाही ही संबंधीत खात्याकडून पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यावर करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२०.४.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास हवी असलेली माहिती १० दिवसाचे आत पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सार्वजनिक शौचालयावर रुमचे केलेले अवैध/अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत तक्रार दिली होती. या तक्रारीवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, सार्वजनिक शौचालयावर केलेल्या अवैध/अनधिकृत बांधकामाकवरुध्श्द जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत कारवाई करावी. केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास कळवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/३५३३/०२**

**श्री. दिलीप नानावटी,**
**रत्ना-३२, जयहिंद सोसायटी,एन.एस.आर.डी.-II,**
**जे.व्ही.पी.डी.स्कीम,**
**विले पार्ले(प.), मुंबई-४०००४९ .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा डॉ. बालाभाई नानावटी हॉस्पीटल,**
**एस.व्ही.रोड,विले पार्ले(पश्चिम),**
**मुंबई-४०००५६. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दिलीप नानावटी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.३.२००९ रोजी अर्ज करुन बालाभाई नानावटी हॉस्पीटलकडे अर्जासोबत विवरणपत्र जोडून सदर विवरणपत्रात सांख्यिकी स्वरुपाची सोनाग्राफी,एंजीओग्राफी,सी.टी.स्कॅन,रेडीओलॉजी,पॅथॉलॉजी अशा विविध विभागाबाबत माहिती मागीतली होती. तसेच हॉस्पीटलमध्ये गरीब रुग्णांकरीता किती कॉट निःशुल्करित्या आहेत,हॉस्पीटलचे एकूण उत्पन्न किती,विश्वस्त मंडळास प्रत्येकी किती वतन मिळते, डॉक्टरांना किती कमिशन मिळते इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती.

सदर हॉस्पीटल उक्त अधिनियमानुसार सार्वजनिक प्राधिकरण नाही.यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सदर विश्वस्त मंडळ येत नाही. यामुळे अपीलकाराचा अर्ज थेट रद्द करण्यात येत आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक हातोळकर यांनी अपीलकारास दि.५.५.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी यांच्यावतीने त्यांचे वकील हजर होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी डॉ.बालाभाई नानावटी हॉस्पीटलच्या वतीने बाजू मांडण्याकरीता नेमणूक

केलेल्या वकीलाचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन विश्वस्त मंडळाची माहिती मागीतली आहे. विश्वस्त मंडळ(Trust)माहितीच्या अधिकार कक्षेत मोडत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१७.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५००५/०२**

**ॲड.श्री. पी.आर.शर्मा,**
**बी-२०४, ओम श्री साई श्रद्धा को.ऑप.हौ.सो.लि.,**
**धोबी घाट, एस.के. नगर, बोरीवली(पूर्व),**
**मुंबई-४००००. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा असिस्टंट म्युनिसिपल कमिशनर,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, सी वार्ड,**
**बी.एम.सी. ऑफीस, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक(लायसेन्स),**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, सी वार्ड,**
**बी.एम.सी. ऑफीस, मुंबई. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार ॲड.श्री. पी.आर.शर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.११.२००९ रोजी अर्ज करुन वील्सन जीमखाना ग्राऊंड, मरीन ड्राईव्ह, मुंबई येथील मेसर्स ॲडव्हान्स ॲडव्हरटायझरच्या जाहिरात मालकाच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.१३.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी संबंधीत फाईलचा जाणीवपूर्वक शोध घ्यावा असे नमूद करुन दि.३.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते,जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या

वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जाहिरात फलकाच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकराणी संबंधीत कागदपत्राचा जाणीवपूर्वक शोध घेऊन अपीलकारास माहिती पुरवावयाची आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यानंतर तात्काळ माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१६.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०३२/०२**

**श्री. मणिलाल रतनशी गडा,**
**मे-परी डिझाईन स्टुडीओ,**
**दु.क्र.२, तळ मजला, वृंदावन भवन,**
**२५३, काळबादेवी रोड, मुंबई-४००००२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस आयुक्त आर्थिक गुन्हे शाखा,**
**पोलीस आयुक्त मुंबई यांचे कार्यालय,**
**आर्थिक गुन्हे,गुन्हे अन्वेषण विभाग,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पोलीस आयुक्त मुंबई यांचे कार्यालय,**
**आर्थिक गुन्हे,गुन्हे अन्वेषण विभाग,**
**मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मणिलाल गडा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.१२.२००९ रोजी अर्ज करुन O.W.No.११२३/इओडब्ल्यू युनिट-II/आरएनआर/०९,दि.२७.७.०९ राजी पोलीस सहाय्यक निरिक्षक यांनी पाठविलेल्या अहवालानुसार श्री.मणिलाल गडा यांच्यावर काय कारवाई केली त्याची माहिती,अपीलकारावर कुठल्या कलमाखाली कारवाई करण्यात आली त्याची संपूर्ण माहिती, कारवाई केली नसल्यास का करण्यात आली नाही याबाबत माहिती मागीतली होती. लोकमान्य टिळक नगर पोलीस ठाणे गु.र.क्र.११९/०९, आर्थिक गुन्हे शाखा गु.र.क्र.३५/०९ कलम ४६५,४६७, ४६८, ४७१, ४२०, १२०(ब) प्रमाणे नोंद असलेल्या गुन्हयाची माहिती मागीतली आहे. गुन्हयाचा तपास विभागातर्फे चालू असल्याने मागीतलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम ८(१)(ज) अन्वये नाकारण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी दि.६.१.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२८.१.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते,जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गु.र.क्र.११९/०९, आर्थिक गुन्हे शाखा गु.र.क्र.३५/०९ कलम ४६५,४६७, ४६८, ४७१, ४२०, १२०(ब) प्रमाणे नोंद असलेल्या गुन्हयाची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, तपासणीबाबतची अपीलकारास माहिती कळवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः१७.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४०/०२**

**श्री. संतोष जिवाजी दळवी,**
**२/२८,बी.डी.डी.चाळ, १ला मजला,**
**ना.म. जोशी मार्ग,डिलाईल रोड,**
**मुंबई-४०००१३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव(परिक्षा),**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, ३रा मजला,**
**म.गांधी मार्ग, हुतात्मा चौक,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, ३रा मजला,**
**म.गांधी मार्ग, हुतात्मा चौक,**
**मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. संतोष जिवाजी दळवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१.२०१० रोजी अर्ज करुन पोलीस उप निरिक्षक विभागीय मर्यादित मुख्य स्पर्धा परीक्षा-२००६ मधील (विषयाचा संकेतांक ०७८) या दोन्ही पेपरच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.१.०९ च्या पत्रान्वये खालीलप्राणे माहिती पुरविली.

उपरोक्त विषयावरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपल्या दि.६.१.२०१० च्या अर्जान्वये आपण मागितलेल्या माहितीबाबत आपणास कळविण्यात येते की, सदर परीक्षेच्या पेपर क्रमांक १ ची उत्तरपत्रिका कार्बनलेस उत्तरपत्रिका असून उत्तरपत्रिकेची कार्बनलेस प्रत उमेदवारांना परीक्षेनंतर देण्यात आलेली आहे. त्यामुळे उमेदवारांकडे त्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत उपलब्ध आहे. विधी विषयाच्या पेपर क्र.२ बाबत उमेदवारांना उत्तरपुस्तिकेची

प्रत/मुखपृष्ठ देण्याची बाब उमेदवारांच्या व्यक्तिश: माहितीशी संबंधीत असल्याने तसेच माहिती देण्यास कोणतेही जनहित नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम नियम क्र.८(१)(e)नुसार उत्तरपुस्तिकेची प्रत देता येणे शक्य नाही. प्रस्तुत प्रकरणी त्यांचे लक्ष राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या अपील क्र.२००७/१२३७/०२, दिनांक ६.८.२००७ च्या आदेशाकडे(श्री.बाळकृष्ण महादेव इंगळे)वेधण्यात यावे. प्रत सोबत जोडली आहे. तसेच आपल्या दिनांक २४.११.२००९ रोजीच्या फेरपडताळणीच्या अर्जावर कार्यवाही सुरु असून ती पूर्ण होताच आपणास कळविण्यात येईल.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.६.४.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकाडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पोलीस उपनिरिक्षक विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा-२००६ च्या उत्तरपत्रीकेच्या छायाप्रतीची मागणी केली होती. मराठी,इंग्रजी, सामान्य अध्यायन मध्ये १३२ गूण दाखविण्यात आले. संपूर्ण विधी पेपर सोडवूनही त्यामध्ये ४१ गूण प्राप्त झाल्याचे दर्शविण्यात आले. तेथे नक्कीच जास्त गूण हवे होते. त्यावेळी त्या पेपरमध्ये अपीलकाराचे काय चुकले याची तपासणी करण्यासाठी उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी केली होती. सदर प्रकरणी उपलब्ध माहिती अपीलकारास जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिका-यांनी पुरविलेली आहे. उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येत नसल्याबाबत उत्तरवादीने अपीलकारास समर्पक उत्तर दिले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०५०/०२**

**श्री. ग्लोरीया जिराड मोरेस,**
**७२-जी, मोरेस मेन्शन,१ला मजला,**
**रुम नं.४, पॅली ग्रँडे चर्च रोड,**
**मरोळ, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००५९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा ॲसेसर आणि कलेक्टर,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, निवडणूक कार्यालय,**
**रुम नं.२८, तळ मजला, म्युनिसिपल मुख्य कार्यालय इमारत,**
**महापालिका मार्ग, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, निवडणूक कार्यालय,**
**रुम नं.२८, तळ मजला, म्युनिसिपल मुख्य कार्यालय इमारत,**
**महापालिका मार्ग, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती ग्लोरीया मोरेस यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.१.२०१० रोजी अर्ज करुन श्रीमती मेरी फर्नांडीस यांनी ऑक्टांबर २००५ मध्ये मुंबई महानगरपालिकेची पोटनिवडणूक वार्ड क्र.९५ अंधेरी(पूर्व) येथून लढविली. त्यांचे निवडणूक चिन्ह पतंग असे होते. त्यांनी सादर केलेल्या शपथपत्राची प्रत मागीतली होती. श्रीम.मेरी फर्नांडीस यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती. त्यांनी सादर केलेले शपथपत्र कार्यालयात सापडत नाही. त्यामुळे त्याची प्रत दता यत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.८.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने प्रथम अपील विहित मुदतीत दाखल केले नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्रीम.मेरी फर्नांडीस यांनी मुंबई महानगरपालिकेची ऑक्टोबर-२००५ मधील पोटनिवडणूक लढविली होती, त्यावेळी त्यांनी सादर केलेल्या शपथपत्राची प्रत मागीतली होती. सदर कागदपत्र सापडत नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी जाणीवपूर्वक (Diligent) संबंधीत कागदपत्राचा शोध घ्यावा आणि अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती ३० दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१९.६.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/२१६४/०२**

**श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट,**
**राणे बिल्डिंग व खंबाटा पठाण चाळ,**
**डॉ.ई मोझेस रोड, वरळी,**
**मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,जी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**ना.म.जोशी मार्ग, मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.कर निर्धारक व संकलक,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नबांधणी मंडळ,**
**म.न.पा.,एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.आंबेडकर रोड, परेल, मुंबई-४०००१८. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.चंद्रकांत अमृतलाल मर्चंट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.९.२००८ रोजी अर्ज करुन लोअर परेल विभागातील सी.एस.११२/१३, प्लॉट १५३ एफ जीएस-१०७१-३-अे च्या प्रॉपर्टी संबंधाने, कॉंट्रॅक्ट-ॲबस्ट्रॅक्ट संबंधाने सखोल खातेनिहाय माहिती, वास्तू क्रमांक १५३ एफ च्या अनुषंगाने ॲबस्ट्रॅक्ट १९९५ संबंधी सखोल माहिती मागीतली हाती. जन माहिती अधिका-यांनी दि.१७.१०.०८ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१७.११.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. उपलब्ध माहितीप्रमाणे ॲबस्ट्रॅक्ट देण्याबद्दल पत्र पाठविले असून वैयक्तिक नावे नसल्याने त्यांनी देऊ केलेली माहिती बरोबर आहे. पक्षकाराने माहिती घेण्यास नकार दिला. आवश्यक शुल्कही भरले नाही. यास्तव प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपील दि.१८.१२.०८ रोजी आदेश पारित करुन निकाली काढले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन लोअर परेल विभागातील सी.एस.११२/११३, प्लॉट १५३ एफजीएस-१०७१-३अे च्या प्रापर्टी संबंधाने अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण विभागाशी संबंधीत नसून मुंबई इमारती व पुर्नबांधणी मंडळ कार्यकारी अभियंता यांचेशी संबंधीत आहे. परंतू कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नबांधणी मंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रे(पूर्व), मुंबई हे द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर राहिले नाहीत. अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द रु.३५,०००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१९.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४१/०२**

**श्री. सुधांशू वसंत जोशी,**
**२/१२, पुंडलिक स्मृती, छेडा रोड,**
**नेहरु नगर, डोंबिवली(पूर्व),-४२१२०१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,**
**धर्मादाय आयुक्त भवन, ३रा मजला,**
**८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**दाय आयुक्त भवन, ३रा मजला,**
**८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुधांशू जोशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.७.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० या अंतर्गत राज्य शासनाकडे नोंदणीकृत झालेली मागील ५ वर्षातील धर्मनिहाय(एकूण मंदिरे,मदरसे,दर्गे,मशिदी,चर्च,बौध्द विहार व अन्य)प्रार्थनास्थळांची प्रत्येक वर्षानुसार आकडेवारी हवी आहे.

२)संपूर्ण यादी नाव(व्यक्ती वा संस्था),नोंदणीचा दिनांक व ठिकाणउयांसह हवी आहे.

३)वरील प्रार्थनास्थळांना मागील ५ वर्षात राज्य शासन, केंद्र शासन यांच्यातर्फे भूखंड वा निधी या स्वरुपात देणगी देण्यात आली आहे का? असल्यास किती,केव्हा, त्याचा दिनांक व ठिकाण यांसह तपशीलवार माहिती हवी आहे.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य वरळी,मुंबई यांच्या कार्यकक्षेत येते. म्हणून अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज उचित कार्यवाहीकरीता धर्मादाय आयुक्त, वरळी, मुंबई यांचेकडे पाठविला. तसेच सदर माहितीकरीता त्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई- श्री.प्रकाश जोशी यांनी दि.१८.७.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. माहिती मिळाली

नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलही धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेकडे पाठविले व त्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे उत्तरवादीने अपीलकारास कळविले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संपूर्ण राज्यातील आहे व ती कार्यालयात उपलब्ध नाही याकरीता अपीलकार राज्यातील जिल्हयात स्वतंत्र अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात असे जन माहिती अधिकारी, धर्मादाय आयुक्त यांनी दि.३०.५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी दोन्ही अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० या अंतर्गत शासनाकडे नोंदणीकृत झालेल्या मागील ५ वर्षातील धर्मनिहाय प्रार्थनास्थळांची प्रत्येक वर्षानुसार आकडेवारीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०३३/०२**

**श्री. मच्छिंद्र एन.कराळकर,**
**बी,हझराबाई हाऊस, रुम नं.५,**
**इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले(प.),**
**मुंबई-४०००५६ .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २रा मजला,स. व प. तरणतलावाजवळ,**
**एम.जी.छेद रस्ता क्र.२, कांदिवली(पश्चिम), मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, २रा मजला,स. व प. तरणतलावाजवळ,**
**एम.जी.छेद रस्ता क्र.२, कांदिवली(पश्चिम), मुंबई-४०००६७. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मच्छिंद्र कराळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.१०.२००९ रोजी अर्ज करुन हॉटेल सुरुची शुध्द शाकाहरी अनंत अपार्टमेंट, ठाकूर कॉंप्लेक्स, कर्नाक पार्क समोर, कांदिवली(पूर्व), मुंबई, डीलीकॅसी, शुध्द शाकाहरी, अभिलाशा रिलायन्स पॉवर एनर्जी समोर, एस.व्ही.रोड, कांदिवली(प.),मुंबई-४०००६७ या हॉटेल मालकाकडून सक्तीने ठेवावयाच्या मोकळया जागेच्या अनधिकृतपणे वापराबाबत एकूण १७ मुद्यावर माहिती मागीतली होती. निरिक्षण अहवाल आणि कार्यवाही अहवाल जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविला नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी असे प्रतिपादन केले की, दि.१४.११.०९च्या पत्रासोबत अपीलकारास पाठविण्यात आलेल्या मुद्देसूद उत्तरामध्ये ८ जुलै,२००९, १७ जुलै,२००९ या दोन निरिक्षण अहवालाचा समावेश करण्यात आला आहे. त्याच्या प्रती अपीलकाराने रु.२०/- इतके शुल्क भरुन दि.२७.११.०९ रोजी प्राप्त केल्या आहेत. अपीलकारास जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी

आवश्यक ती माहिती पुरविलेली असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन हॉटेल मालकाकडून सक्तीने ठेवावयाच्या मोकळया जागेचा गैरवापर होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर,२००९ या महिन्याचे निरिक्षण अहवालाच्या प्रती अपीलकारास ३० दिवसाचे आत पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१९.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०३६/०२**

**श्री. सुधीर सु.विश्वकर्मा,**
**मुत्तका शेट्टी निवास,बेहराम बाग पटेल वाडी,**
**वीरा देसाई मार्ग, जोगेश्वरी(प.),**
**मुंबई-४००१०२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त के/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**अंधेरी बेस्ट बस डेपोसमोर, पालीराम पथ, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
**सहाय्यक पालिका आयुक्त के/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**अंधेरी बेस्ट बस डेपोसमोर, पालीराम पथ, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुधीर सु.विश्वकर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.१०.२००८ रोजी अर्ज करुन वृंदावन वेज रेस्टॉरंट, मुन्शी नगर, भवन्स कॉलेज, अंधेरी(प.),मुंबई-४०००५८ च्या मालकाने शटरच्या बाहेर मोकळया जागेमध्ये १२ टेबल लावले आहेत, वरती शेड लावले आहे. हे अधिकृत आहे की अनधिकृत, याची परवानगी घेतली आहे की नाही याबाबत सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास सात दिवसाचे आत माहिती द्यावी. विहित कालावधीत अपीलकारास माहिती का देण्यात आली नाही याचे स्पष्टीकरण सहाय्यक आयुक्त यांचेकडे सादर करावे असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१७.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही

जन माहिती अधिका-यांनी कांही माहिती दिली नाही. मागणीप्रमाणे माहिती द्यावी व भरपाई करुन द्यावी या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन शेडच्या बाहेर मोकळया जागेत अनधिकृतरित्या शेड लावले असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही, प्रथम अपीलीय अधिका-याच्या आदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास ७ दिवसाचे आत माहिती पुरविण्याबाबत पथम अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशाचे पालन का करण्यात आले नाही याबाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०२७/०२**

**श्री. शेलार जगन्नाथ सूर्यभान,**
**श्री अपार्टमेंट, एफ.सी.आय.रोड,**
**मनमाड,ता.नांदगांव, जि.नाशिक-४२३१०४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक),**
**जिल्हा परिषद, नाशिक,**
**जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा मख्याध्यापिका/कार्यवाह,**
**मध्य रेल्वे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,**
**मनमाड,ता.नांदगांव,जि.नाशिक,**
**पिन-४२३१०४. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. जगन्नाथ शेलार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.२.२०१० रोजी अर्ज करुन इयत्ता ९वी,११वी साठी प्रश्नपत्रिका काढण्याची सूचना दि.२३.१२.२००९ रोजी आली व इयत्ता १०वी इंग्रजी माध्यमासाठी १८ जानेवारी,२०१० रोजी सूचना आली असा भेद का? ज्याच्याकडून चूक झालेली आहे त्यांच्यावर काय कारवाई केली याबाबत माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मध्य रेल्वे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मनमाड,ता.नांदगांव, जि.नाशिक यांनी अपीलकारास दि.३.३.२०१०च्या पत्रान्वये सविस्तर माहिती पुरविली. चुकीची/अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.उत्तर मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकउे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन इयत्ता ९वी,११वी ची व इयत्ता १० वी इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका काढण्यासंबंधीच्या भेदभावाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३.३.२०१०च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४५/०२**

**श्री. कवसर सुजातअली सय्यद,**
**खोली क्र.४, गल्ली नं.९,**
**संत ज्ञानेश्वर नगर, सेवालाल सेवा संघ,**
**साईबाबा मंदिरासमोर, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अभियांत्रिकी कक्ष,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. कवसर सुजात अली सय्यद यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.२.२०१० रोजी अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,५वा मजला, गृहनिर्माण भवन,बांद्रा(पूर्व), मुंबई-५१ यांचे सहाय्यक अभियंता एच/पूर्व यांच्याकडे आंबेडकर नगर, महाराष्ट्र नगर, सरकारी वसाहत, खेरवाडी, बांद्रा(पूर्व) महसूल, गाव वांद्रे, ता.अंधेरी नोंदणी आणि उपजिल्हा मुंबई शहर आणि उपनगरे या ठिकाणी आणि यांचे सिमेतील स्थिती सं.नं.३४१, हिस्सा क्र.१(भाग) आणि आत्ताचा सी.टी.एस.क्र.६२९(भाग)क्षेत्र३३,४४५ चौ.मि.याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. १५ दिवसात माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना सांगितले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तसेच अपीलकाराने माहिती प्राप्त करुन घेतली असल्याची पोच पावती आयोगाच्या निदर्शनास आणली. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः१९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४२/०२**

**श्री. विनोद अॅब्रोल,**
**प्लॉट क्र.३ अे, दुर्गानिवास,६२२,**
**खारपाली रोड, खार(पश्चिम),**
**मुंबई-४०००५२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३),**
**पश्चिम उपनगरे,मुंबई, गृहनिर्माण भवन,कक्ष क्र.६९,**
**तळ मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक(एच/पश्चिम विभाग),**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(३),**
**पश्चिम उपनगरे,मुंबई, गृहनिर्माण भवन,कक्ष क्र.६९,**
**तळ मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विनोद अॅब्रॉल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.२.२००९ रोजी अर्ज करुन दूर्गामोहन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीने ठेवलेल्या बंधपत्राबाबत, संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे अहवाल,दि.३१.३.२००८ व ३१.३.२००९ अखेरचे लेखापरिक्षण अहवालाच्या सत्यप्रती, संस्थेच्या दि.१.४.२००५ पासून आजतागायत व्यवस्थापक समिती,सभा,वार्षिक सर्वसाधारण सभा,इतिवृत्ताच्या प्रतीची मागणी केली होती.

अर्जातील मुद्दा क्र.१ बाबतची माहिती कार्यालयात समक्ष येऊन प्राप्त करुन घ्यावी, मुद्दा क्र.२ व ३ बाबतची माहिती ही संस्था स्तरावरील असल्याने अशी माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी.अपीलकारास माहिती देण्याबाबत संस्थेला निर्देश देण्यात येत आहेत. अपीलकारही संस्थेचे सभासद आहेत. अशी माहिती संस्थेकडून मागविण्याचा अपीलकारास अधिकार आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.१.२०१० च्या पत्रान्वये कळविले. त्यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.११.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. उपनिबंधक,सहकारी संस्था,एच(प.) विभाग, मुंबई

याकार्यालयाने अपीलकारास उत्तर दिले आहे. मुद्दा क्र.१ ची माहिती पुरविली आहे. उपनिबंधक सहकारी संस्था एच(प.)विभाग यांनी अपीलकारास मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२५.३.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

दुर्गामोहन सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अपीलकाराने माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मुद्दा क्र.A बाबतची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:१९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४२२९/०२**

**श्रीमती कल्पना मोहन राजपूत,**
**श्रीरामनगर,मारोती मंदिराजवळ,**
**शासकीय दूध डेअरी मागे,**
**जि.धुळे,पिन-४२४००१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन),**
**आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, दुसरा मजला,**
**फोर्ट, मुंबइ्र-४०००२३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, दुसरा मजला,**
**फोर्ट, मुंबइ्र-४०००२३. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती कल्पना राजपूत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.८.२००९ रोजी अर्ज करुन श्री.शांतीलाल दगा धनगर, तत्कालीन जवान-नि-वाहनचालकांचे संदर्भात माहिती मागीतली होती. श्री. शांतीलाल दगा धनगर हे राज्य उत्पादन शुल्क खात्यात धुळे जिल्हयात वाहन चालक पदावर कार्यरत होते. त्यानतर त्यांना त्या पदावरुन कमी कले. श्री.धनगर हे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात गेले. श्री.धनगर यांना सेवेत सामावून घेणेबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी आदेश दिले. परंतू कार्यालयाने आजपर्यंत नेमणूकीचे आदेश दिले नाहीत याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.९.०९ व दि.१३.११.०९च्या पत्रान्वये सविस्तर माहिती पुरविली आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२३.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेताअसे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.शांतीलाल दगा धनगर तत्कालीन जवान-नि-वाहनचालक यांना सेवेत सामावून घेणेबाबत मागणी केली होती. श्री.दगा यांना परत कामावर घ्यावे अशी अपीलकाराची मागणी आहे. श्री.दगा यांची दीर्घ सेवा लक्षात घेऊन त्यांना पुन्हा सेवेत घेणेबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी विभागास शिफारस केली आहे. त्यानंतरही विभागाने श्री.दगा यांना सेवेत घेतलेले नाही. दरम्यान तात्पुरत्या/अस्थायी सेवा नियमित न करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असल्याच्या कारणावरुन विभागाने मॅटच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नसल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर वस्तुस्थिती उत्तरवादीने अपीलकारास कळविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक:१९.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०१८/०२,**

**श्रीमती कल्पना मोहन राजपूत,**
**श्रीरामनगर,मारोती मंदिराजवळ,**
**शासकीय दूध डेअरी मागे,**
**जि.धुळे,पिन-४२४००१.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्रीमती कल्पना राजपूत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.६.२००९ रोजी अर्ज करुन धुळे जिल्हयातील श्री समर्थ पत संस्था, देवी पद्मावती पत संस्था, चंद्रकांत हरी बदे पत संस्था, धुळे इत्यादी पत संस्थांना सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांनी परवानगी दिली का? तक्रारदाराने रक्कम सदर पत संस्थांमध्ये मुदत ठेव म्हणून ठेवली, परंतु सदर ठेवीची मुदत संपूर्ण ३ वर्षे झाली तरीही ठेवीची रक्कम व त्यावरील व्याज मिळाले नाही याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/३७७४/०२ दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२.१२.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

या प्रकरणी मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने पत संस्थेमध्ये ठेवलेली मुदत ठेवीची रक्कम तक्रारदारास परत मिळण्यासाठी गैरतक्रारदाराने केलेल्या कारवाईची माहिती गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास कळवावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२१.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०१७/०२,**

**श्री. संदिप प्रकाश केदारे,**
**१७/१३६०, जुनी एम.एच.बी. कॉलनी,**
**गोराई रोड, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९१. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**अनुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय,**
**आकुर्ली रोड, कांदिवली(प.),**
**मुंबई-४००१०१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. संदिप केदारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२९.८.२००९ रोजी अर्ज करुन वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ श्रेणीतील कर्मचा-यांच्या नियमबाहय झालेल्या नेमणुकीबाबत तपशिल, सेवाजेष्ठता यादी, बिंदुनामावली सरळसेवा भरती, ५० बिंदू नामावली पदोन्नतीची प्रत, वेतननिश्चितीची दुय्यम प्रत, नेमणूकीचे पत्र इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/४४३२/०२ हे दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२२.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन दिली होती परंतू तक्रारदाराने माहिती स्विकारली नसल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडून पुरविण्यात येणारी माहिती स्विकारली नाही या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२१.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०२३/०२,**

**श्री. सुदेश रघुनाथ गायकवाड,**
**ओमकार चाळ, इंदिरा नगर,**
**जुना कब्रस्थानजवळ, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.भूव्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन,कलानगर, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. सुदेश गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३.६.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)इंदिरा नगरमध्ये एकूण रुम ९७२ आहेत. म्हाडाच्या टेबल सर्वे प्रमाणे झोपडीस्थित नकाशामध्ये ९७२ रुम दाखविले आहे. दुकान क्रमांक ९७३ व ९७४ महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या जागेमध्ये आहेत. ती दोन्ही दुकाने इंदिरानगरमध्ये दाखविली आहेत व झोपडीस्थित नकाशामध्ये त्याचा सर्व नंबर टाकण्यात आला आहे. परिशिष्ट दोनमध्ये ९८७ रुम दाखविल्या आहेत. १३ रुम वाढीव दाखविल्या आहेत. या १३ रुमची सविस्तर माहिती देणे.

२)एस.आर.ए. योजना राबविण्यासाठी म्हाडाने टेबल सर्वे केला तो कोणत्या वर्षी कोणत्या महिन्यात व कोणत्या दिवशी, एकदा टेबल सर्वे झाल्यानंतर किती वेळा सर्वे मागविण्यात आला.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.३.११.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदारास मागणीप्रमाणे टपालाने माहिती पाठविली. परंतू पाठविलेले पत्र परत आले. गैरतक्रारदाराने सदर पत्राची प्रत आयोगाच्या निदर्शनास आणली. यावरन सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२१.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०१९/०२,**

**श्री.महावीर नुनीवाल,**
**के-४/१२८, डी.एन.नगर,**
**नेपच्यल को.ऑप.हौ.सो.,**
**जे.पी.रोडच्या समोर, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.** **..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई महानगर पालिका यांचे कार्यालय(के/पश्चिम),**
**आर.के.पाटकर मार्ग,**
**बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. महावीर नुनीवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.८.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.९.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२९.५.२००८ रोजी अर्ज करुन आंबोली गांव अंधेरी के/पश्चिम विभाग,सी.टी.स.क्र.१९५(पार्ट) सर्व्हे क्र.१०६, अे बिल्डिंग क्र.के-३ आणि के-४ गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबत एकूण ११ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. मागणी केलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून तक्रारदाराने कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी १.३० या वेळेत कार्यालयात हजर राहून सर्व संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करावे. त्यानंतर तक्रारदारास हव्या असलेल्या निवडक कागदपत्रांच्या प्रती विहित शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे गैरतक्रारदाराने दि.२३.६.२०१० च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीतील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमोर लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की,तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली आहे. तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर होते. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२१.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९०/०२**

**श्री.युनुस एस.पटेल,**
**दिलशाद अपार्टमेंट,दुसरा मजला,फ्लॅट नं.५अे,**
**आग्रीपाडा,१०, मोटलीबाई स्ट्रीट, मुंबई-४०००११. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त ई विभग यांचे कार्यालय,(ई वार्ड),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,ई वार्ड म्युनिसिपल ऑफीस,**
**१०, शेख हफीजुद्दीन मार्ग, भायखळा(पश्चिम),**
**मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालिका आयुक्त ई विभग यांचे कार्यालय,(ई वार्ड),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,ई वार्ड म्युनिसिपल ऑफीस,**
**१०, शेख हफीजुद्दीन मार्ग, भायखळा(पश्चिम),**
**मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.युनुस पटेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.३.२००८ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्रमांक १०/१८७६ भायखळा विभाग,दिशा इमारतीच्या प्रस्तावित इमारतीच्या नकाशाची प्रत, मंजूर नकाशाची प्रत,इ.बी. क्रमांक आणि प्रस्तावित फाईलच्या प्रतीची मागणी केली होती. अपलकाराने मागीतलेल्या माहिती संबंधीची सी.एस.क्र.१०/१८७६,भायखळा विभाग ही फाईल अभिलेख कक्षात उपलब्ध नसल्याने माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.२.२०१० च्या पत्रानवये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. समाधानकारक माहिती पुरविली नाही यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्रमांक १०/१८७६ भायखळा विभाग दिशा ईमारतीच्या अवैध/अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास हव्या असलेल्या माहितीबाबतची धारिणी ही सन १९७२ची असून ती सापडत नसल्याने कार्यालयाने खात्यांतर्गत विभागांना तसेच इतर संबंधीत खात्यांना परिपत्रक काढून संबंधीत धारिणीचा शोध घेण्याकरीता, उपलब्ध असलेली कागदपत्रे/नकाशे कार्यालयास उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे. धारिणी सन १९७२ची असून वास्तुविशारदाचे नांव व पत्ता मिळत नसल्याने त्यांच्याशी पत्रव्यवहार करता आलेला नाही. अद्याप कार्यालयास कोठूनही कागदपत्र/नकाशे उपलब्ध झालेली नाहीत. अर्जदारास हव्या असलेल्या माहिती संबंधीची कागदपत्रे/नकाशे जर उपलब्ध झाली तर मिळालेली माहिती त्यांना पुरविण्यात येईल असा उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, दिशा इमारतीच्या ३-या व ४थ्या मजल्याच्या बांधकामाविषयी वैध/अवैध माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरवावी.अवैध बांधकामास जर नोटीस दिलेली असेल तर नोटीसीची प्रत घेऊन त्याप्रमाणे अपीलकारास कळवावे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२२.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६००३/०२**

**श्री. सखाराम अनंत मालाडकर,**
**एच.आ.जी.१/१, कोकण हौ.बोर्ड कॉलनी,**
**कल्याण(प.), बिर्ला कॉलेज समोर,**
**जि.ठाणे .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य बंदर अधिकारी,**
**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,**
**इंडियन मर्केंटाईल चेंबर्स, ३रा मजला,**
**रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी,**
**महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,**
**इंडियन मर्केंटाईल चेंबर्स, ३रा मजला,**
**रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट,**
**मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सखाराम अनंत मालाडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.१.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)तक्रार/झेड-४३५/२२३२ श्री.आनंद के.सरकारे, केतकी का.जोशी, हरेश आचरेकर यांना प्रवासी वाहतूक परवाना देण्यास विलंब माहिती

२)यापर्वी २८ लाभार्थींना वाहतूक परवाना दिला आहे याची परवान्याच्या क्रमांकासह यादी

३)मा.महाराष्ट्र मेरी टाईब बोर्डाचे उपाध्यक्ष यांनी सदर परवाने देण्यास तर्तता स्थगीती आदेश दिलेल्या आदेशाची प्रत

४)कायदा व सुव्यवस्था बिघडणारी कारणाची माहिती मिळावी

५)यापूर्वी २८ लाभार्थींना वाहतूक परवाना दिला त्यावेळच्या वस्तुनिष्ठ परिस्थितीची माहिती आणि तक्रारदार हे त्या वस्तुनिष्ठ परिस्थितीत नव्हते याबाबतची माहिती.

जन माहिती अधिका-यांनी दि.३.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास मुद्देनिहाय माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी समाधानकारक माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागीतलेल्या माहितीचे उत्तर पूर्वीच कार्यालयाने पाठविले आहे. सदर माहिती वरुन अपीलकाराच्या प्रश्नांचे निरसन झालेले नसल्याने अपीलकाराने पुन्हा माहितीची मागणी केली आहे. तरी अपीलकाराने सदरबाबत स्वतः कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी असे उत्तरवादीने अपीलकारास दि.२५.२.२०१०च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्रवासी वाहतुक परवाना दिल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली आहे. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२२.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६००२/०२**

**श्री. सखाराम अनंत मालाडकर,**
**एच.आ.जी.१/१, कोकण हौ.बोर्ड कॉलनी,**
**कल्याण(प.), बिर्ला कॉलेज समोर,**
**जि.ठाणे .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग(मावक-५),**
**मंत्रालय विस्तार भवन,**
**मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग(मावक-५),**
**मंत्रालय विस्तार भवन,**
**मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सखाराम अनंत मालाडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.२.२०१० रोजी अर्ज करुन अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इ.मा.व. व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना द्यावयाच्या जाती प्रमाणपत्र कार्यपध्दतीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.२.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथमअपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

जाती प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीबाबत शासन निर्णय दि.२८.१०.०५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यामधील अनुक्रमांक ४१ वर विमुक्त जाती,भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना केंद्र शासनाचे आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता त्यांना दोन वेगवेगळया नमुन्यात जाती प्रमाणपत्रे देण्याची तरतूद केली आहे. असे असता या वर्गातील व्यक्तींनी केंद्र शासनाचे आरक्षणासाठी इ.मा.व.प्रमाणपत्राची मागणी केली असता मागील ३ वर्षाच्या उत्पन्नाचा दाखला मागण्यात येतो. यामळे अडवणूक होते. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी स्वतंत्र क्रिमीलेअर दाखला द्यावा लागतोच मग जातीचे प्रमाणपत्र मिळविण्याकरीता३ वर्षाच्या उत्पन्नाचा दाखला का मागण्यात येतो याबाबत माहिती मागीतली होती. जातीचा दाखला काढतांना उत्पनाचा दाखला द्यावा असे असल्यास त्याची माहिती द्यावी अशी अपीलकाराची मागणी आहे.

केंद्र शासनाने तयार केलेल्या महाराष्ट्र राज्याशी संबंधीत असलेल्या इतर मागासवर्गीयांच्या(महाराष्ट्र राज्याच्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास वर्गातील ज्या जातींचा समावेश आहे अशा जाती) यादीत समाविष्ट असलेल्या जातीच्या व्यक्तींना केंद्र शासनाच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना उक्त शासन निर्णयासोबत दिला आहे. सदर प्रमाणपत्रामध्ये उमेदवार सधन व संपन्न गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने प्रमाणित करण्याबाबत नमूद केले आहे. याबाबत केंद्र शासनाचे आदेश आहेत असे उत्तरवादीन आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर उत्तरवादीने अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२२.६.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६००४/०२**

**कु.इंदिरा यादवजी गाला,**
**मनसुख भिखा पटेल चाळ,**
**संत तुकाराम मार्ग, काजूपाडा,**
**बोरीवली(पूर्व), मुंबई-४०००६६. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता,**
**आर/मध्य विभाग यांचे कार्यालय,बृहन्मुबई महानगरपालिका,**
**२रा मजला, महापालिका मंडई इमारत, स्वामी विवेकानंद मार्ग,**
**बोरीवली(पश्चिम), मुंबई-४०००९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**आर/मध्य विभाग यांचे कार्यालय,बृहन्मुबई महानगरपालिका,**
**२रा मजला, महापालिका मंडई इमारत, स्वामी विवेकानंद मार्ग,**
**बोरीवली(पश्चिम), मुंबई-४०००९२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार कु.इंदिरा गाला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.२.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)अनधिकृत बांधकाम केल्यासंदर्भात

२)दि.३०.१०.२००९ रोजी तक्रारी अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयासंबंधी कार्यवाहीच्या तपशीलाची माहिती देण्याची नम्र विनंती. तसेच घर उभारणीसाठी परवानगी घेण्याकरता त्यांनी सादर केलेला पुरावा याची माहिती व प्रत देण्यात यावी नम्र विनंती.

३) तसेच आपण कुठल्या नियमाखाली परवानगी दिली याची माहिती देणे.

४)तसेच कार्यवाही न करण्याचे किंवा अत्यंत विलंब होण्याची माहिती देण्याची नम्र विनंती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.२.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती पुरवली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे

दि.२२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली आहे असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१३.४.२०१० रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण तसेच दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथमअपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनधिकृत बांधकामाबाबत दि.३०.१०.२००९ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकारास जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.) आर/मध्य विभाग यांनी कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणीच्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.) आर/मध्य विभाग यांनी अर्जदारास माहिती दिल्याचे नमूद करुन आदेश पारित केले आहेत असे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या दि.३०.१०.०९च्या तक्रार अर्जावर उत्तरवादीने प्रथम काय कारवाई केली याबाबतची माहिती अपीलकारास १५ दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२२.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९६/०२**

**श्री.मिलींद नाथा घाडगे,**
**सी, १:९/३:१, सेक्टर २,**
**वाशी, नवी मुंबई-४००७०३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई(सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता तथा व्यवस्थापक,**
**मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,**
**वरळी, मुंबई-४०० ०१८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मिलिंद घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.७.२००९ रोजी अर्ज करुन वरळी बी.डी.डी.चाळ क्रमांक ५४ खोली क्रमांक ९ कोणाच्या नावावरती आहे, या ठिकाणी कोण रहिवाशी रहातात, केव्हापासून रहातात याची सन २००७ ते जुलै-२००९ या कालावधीची माहिती मागीतली होती. मुंबई विकास विभाग चाळ क्रमांक ५४ खोली क्रमांक ९ या खोलीची भाडेदारी दि.१०.९.०९ पासून श्री.विजय चंद्रकांत कांबळे यांचे नावे असून तत्पूर्वी सन २००७ मध्ये सदर खोलीची भाडेदारी श्रीम.लता विजय काटारे यांचे नावे होती असे जन माहिती अधिका-यांनी दि.२९.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.५.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती आठ दिवसात सशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. सत्य माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुंबई विकास विभाग चाळ क्रमांक ५४ मधील खोली क्रमांक ९ मधील भाडेदाराबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे वेळोवेळी माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक मुंबई विकास विभाग चाळी श्री.क.श.शिवदास यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मुंबई विकास विभाग चाळीतील चाळ क्र.५४ मधील खोली क्रमांक ९ चे हस्तांतरण कोणत्या कागदपत्राचे आधारे करण्यात आले याबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२२.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९३/०२**

**श्री. माधव भालचंद्र जोशी,**
**ए/६०३, कल्याण नगरी रचना सोसायटी,**
**डी.एस.के.प्रोजेक्ट, सांगले वाडी,**
**मु.पो.कल्याण(पश्चीम), जि.ठाणे-४२१३०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
**शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग यांचे कार्यालय,**
**जवाहर बालभवन, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस जवळ,**
**नेताजी सुभाष पथ, चर्नी रोड(प.),**

**जन माहिती अधिकारी,**
**शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग यांचे कार्यालय,**
**जवाहर बालभवन, गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस जवळ,**
**नेताजी सुभाष पथ, चर्नी रोड(प.).** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. माधव जोशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.१.२०१० रोजी अर्ज करुन शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांच्या विभागात असलेल्या शाळा व संस्थेच्या संदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माति आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांच्या विभागातील असलेल्या शाळा व संस्थेच्या संदर्भात अनुषंगिक माहिती मागीतली होती. मान्यता मिळविण्याकरीता विश्वस्थ मंडळाने कागदपत्र सादर केली आहेत. विश्वस्थ मंडळासंबंधी कागदपत्र जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरवावीत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**मुंबई**
**दिनांकः२२.६.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९५/०२**

**श्री. बळवंत बबन ढोकले,**
**वीर संभाजी नगर, एल.बी.एस.मार्ग,**
**टी.जी.१४० २/३, मुलुंड(प.),**
**मुंबई-४०००८०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. बळवंत ढोकले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन एल.ओ.आय. कोणत्या आधारावर देण्यात आला याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.२९.३.२०१० रोजी आदेश दिले. समाधानकारक माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत प्रस्तावातील नस्तीची पहाणी करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले होते. सभासदांचे संमतीची तपासणी व पात्रता विषयी संबंधीत बाबी परिशिष्ट-२ प्रमाणित करणा-या सक्षम प्राधिकारी यांच्या खात्याशी निगडीत आहे. त्याबाबत अपीलकारास संबंधीत सक्षम प्राधिकरणाशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेता येईल. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उपलब्ध असलेली मार्गदर्शिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा वित्त शाखेत नियत शुल्क भरुन उपलब्ध करुन घेऊ शकता असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास दि.२६.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी एल.ओ.आय. संबंधीची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांकः२२.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०७६/०२**

**श्री. विश्वास वसंत ताम्हणकर,**
**टागोर नगर चाळ क्रमांक १५६, खो.क्र.२५८५,**
**ग्रुप क्रमांक ५/ब, विक्रोळी(पूर्व),**
**मुंबई-४०००८३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी(मि.व्य.-२),**
**मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण,**
**म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक(३),**
**मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण,**
**म्हाडा, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. विश्वास वसंत ताम्हणकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.११.२००९ रोजी अर्ज करुन टागोर नगर,विक्रोळी(पूर्व) येथील एकूण २९६६ बैठया गाळयांपैकी कोणकोणते बैठे गाळे म्हाडाचे नियमानुसार तेथे रहात असलेल्या अधिकृत/अनधिकृत(घुसखोर) यांचे नावे करण्यात आलले आहेत, किती टक्के बैठे गाळे नावावर करण्यात आलेले नाहीत, कोणकोणत्या बैठयाचाळी अद्याप नावावर करण्यात आलेल्या नाहीत त्याची यादी इत्यादी एकूण १९ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

टागोर नगर, विक्रोळी येथील बैठया गाळयाबाबतच्या केसेस अद्याप अंतीम झालेल्या नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी टागोर नगर विक्रोळी येथील बैठे गाळयाबाबतच्या केसेस अद्याप अतिम झाल्या नसल्याबाबत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२२.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०७९/०२**

**श्री. संदेश दत्तात्रय पाटील,**
**हिरा कॉंप्लेक्स, २०३/डी. अंबिका नगर,**
**जोगेश्वरी(पूर्व),मुंबई-४०००६०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बॅंक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बॅंक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.संदेश दत्तात्रय पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.२.२०१० रोजी अर्ज करुन वैज्ञानिक अधिकारी अन्न व औषध प्रशासन, सामान्य राज्य सेवा परिक्षेत अनुभव असूननसुध्दा अपीलकाराचा अर्ज नाकारला गेला. यापरीक्षेत अनुभव ग्राहय मानलेले इतर पाच उमेरवारांचे अर्ज गुप्ततेच्या कारणाने अपीलकारास दिले नाही. तरी उमेदवाराचे व्यक्तीगत माहिती नसलेले अर्जाचे शेवटचे पान ज्यात फक्त उमेदवारांचा अनुभव दिला आहे ते पान देण्यात यावे अशी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

श्री.संदेश दत्तात्रय पाटील यांनी वैज्ञानिक अधिकारी, अन्न व औषध प्रशासन गट-ब या पदाकरीता आयोगाकडे अर्ज केला होता. श्री.पाटील यांच्याकडे विचाराधीन पदाच्या जाहीरातील नमूद केलेला आवश्यक अनुभव नसल्याने, आयोगाने त्यांना मुलाखतीस अपात्र ठरविले होते. त्यावर त्यांनी वेळोवेळी केलेल्या अभिवेदनासंदर्भात आयोगाने त्यांच्या अपात्रतेबाबत कारणे कळविली होती. एवढेच नव्हे तर श्री. पाटील यांनी आयोगाकडे वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागीतलेली सर्व माहिती एवढेच नव्हे तर मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती देखील त्यांना विहित वेळेत विनामुल्य पुरविण्यात आल्या होत्या.अपीलकार श्री.पाटील यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतली होती. त्रयस्थ व्यक्तीविषयी खाजगी व गोपनीय स्वरुपाची माहिती कळविणे शक्य नाही असे उत्तरवादीने अपीलकारास कळविले असल्याचे लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन उत्तरवादीने अर्जावर अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपीलकाराने त्यांचे गा-हाणे दूर करुन घेण्याकरीता योग्य त्या न्यायाधिकरणाकडे दाद मागावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२२.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९१/०२**

**श्री. सब्बीर हुसेन खान व गुलाम वारीश शेख,**
**रुम नं.२७७, गणपती चाळ, सोशन नगर,**
**सायन, सोशल नगर, धारावी, मुंबई-१७. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),**
**मुंबई-४०००२८.**

**जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ वसाहत अधिकारी,**
**सहाय्यक पालिका आयुक्त जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर(प.),**
**मुंबई-४०००२८. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सब्बीर खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन धारावी पुनर्वसन प्राधिकरणाच्यावतीने धारावी येथील झोपडपट्टी धारकांचे सर्वेक्षण मशाल संस्थेद्वारे करण्यात आले, मशाल सस्थेने केलेल्या झोपडपट्टी सर्वेक्षणाच्या सर्व फाईलच्या प्रतीची मागणी केली होती. मागीतलेली माहिती न देता दिशाभूल करण्यात आल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयाकडे पाठपुरावा करुन त्यांचेकडील प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार अपीलकारास अंतीम उत्तर देण्यात यावे असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.९.२.२०१० रोजी आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन धारावी येथील झोपडपट्टी धारकाचे सर्वेक्षणासंबंधीच्या सर्व फाईलच्या प्रतीची मागणी केली होती. मशाल संस्थेने झोपडपट्टी धारकांचे सर्वेक्षण करुन यादी तयार केली आहे. सदर यादी अद्याप अंतिम करण्यात आलेली नाही त्यामुळे अपीलकारास माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी श्री.एच.एन.अडे यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन उत्तरवादीने अर्जावर अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२३.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०८०/०२**

**श्री. विजय गणपती इंगवले,**
**नेपच्युल कलरस्केप ६०४,**
**लव्हेंडर दिनदयाल उपाध्याय मार्ग,**
**मुलुंड(पश्चिम), मुंबई-४०००८०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**वित्त विभाग(सेवा-९),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**वित्त विभाग(सेवा-९),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विजय इंगवले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१२.२००९ रोजी अर्ज करुन वेतन सुधारणा नियम २००९ च्या अनुषंगाने मोटार वाहन निरिक्षक यांची दि.२.१२.२००९ रोजीच्या स्थितीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१५.२.२०१० रोजी अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

राज्य वेतन सुधारणा समितीच्या(हकीम कमिटी)अहवालातील परिच्छेद ३.१७.१ मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक १.१.१९९६ नंतर ज्या पदांच्या वेतनश्रेणी पुन:सुधारीत करण्यात आल्या आहेत त्यापैकी काही पदांना विवक्षित सुधारीत वेतन संरचना लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या पदामध्ये परिवहन आयुक्तालयातील पदांचाही समावेश होतो. त्यांच्या प्रकरणी अहवालातील तक्ता ३.४ अन्वये शिफारस केलेली सुधारित वेतन संरचना शासनाने स्विकारली आहे आणि संबंधित पदांना दिनांक १.१.२००६ पासून सुधारित वेतन संरचना मंजूर केली आहे. याचा अर्थ परिवहन आयुक्तालयातील कर्मचा-यांच्या पाचव्या वेतन आयोगातील पुन:सुधारित

वेतनश्रेणीचा विचार करुनच त्यांना सुयोग्य अशी सुधारित वेतन संरचना दिनांक १.१.२००६ पासून मंजूर करण्यात आली आहे. सुधारित वेतनसंरचना दिनांक १.१.२००६ पासून अंमलात आल्यामुळे पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी पुनःसुधारण्याचे दिनांक १४.१२.२००८चे आदेश अधिक्रमित झाले आहेत. तसेच, दिनांक १४.१२.२००८च्या आदेशान्वये पाचव्या वेतन आयोगातील पुनःसुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष अशी सुधारित वेतन संरचना दिनांक १.१२.२००८ पासून मंजूर करण्यात आलेली नाही.

उत्तरवादीने पुरविलेली माहिती चुकीची व सदोष असल्याच्या कारणावरुनद अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन परिवहन विभागातील अधिका-यांचे श्रेणीवर्धन दि.१.१२.०८ पासून झाले असल्याने वेतन सुधारणा नियम २००९ च्या अनुषंगाने दि.२.१२.०८ रोजीची मोटार वाहन निरिक्षक, सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक(कनिष्ठ श्रेणी) सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक(वरिष्ठ श्रेणी) करवसूली अधिकारी यांचे पदनाम दर्जा पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगातील तरतुदीप्रमाणे वेतन बँड, ग्रेड वेतन यासंबंधीचा तक्ता काय आहे त्यासंबंधीच्या माहितीच्या प्रतीची मागणी केली होती. परिवहन विभागातील अधिका-यांच्या वेतनश्रेणीबाबत समितीसमोर यापूर्वी चर्चा झाली आहे. या प्रकरणा संबंधीची कारणे प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास कळविली आहे. यासंदर्भात माहितीच्या अधिकारात आणखी कांही करता येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२३.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/३७७३/०२**

**श्री. सुरेश धोंडू पावसकर,**
**अे/२३, धवल कॉम्प्लेक्स,**
**लिमयेवाडी, माळनाका, रत्नागिरी. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**धर्मादाय आयक्त यांचे कार्यालय,**
**८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयक्त यांचे कार्यालय,**
**८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सुरेश धोंडू पावसकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.२.२००९ रोजी अर्ज करुन रत्नागिरी जिल्हा राज्य शासकीय कर्मचारी सहकारी पत संस्थेकडील दि.१३.९.२००६ च्या पत्रान्वये करण्यात आलेल्या चौकशीसंबंधी सर्व कागदपत्राच्या प्रती, कोल्हापूर कार्यालयाकडे करण्यात आलेला पत्रव्यवहार आणि धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर विभाग यांचेकडून सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवलाची प्रत इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती पुरविली नाही.यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१३.४.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मादाय उप आयुक्त हे वैद्यकीय कारणास्तव रजेवर होते. त्यामुळे प्रथम अपीलावर विलंबाने दि.१४.७.०९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार गैरहजर होते. अपीलकारास मोफत माहिती देणेबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१४.७.०९ रोजी आदेश पारित केले. सदर प्रकरणी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. प्रथम अपीलीय अधिकारी रजेवर होते. त्यांचे बदली कोणी अधिकारी देण्यात आले नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२३.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/३४०९/०२**

**श्री. शशांक शिंदे,**
**१४७-१५१, शिंदे बिल्डिंग,**
**साने गुरुजी मार्ग, चिंचपोकळी,**
**मुंबई-४०००११. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
**मुंबई नगर भुमापन व भूमी अभिलेख(शहर),**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्र.सहा. अधीक्षक,**
**मुंबई नगर भुमापन व भूमी अभिलेख(शहर),**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शशांक शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.७.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.४.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

भायखळा विभागातील सर्वे क्र.२०५८ व २०६० हे भूखंड श्रीमती वत्सलाबाई गेनुजी शिंदे यांच्या नावे आहेत. कोर्टाचे निकाल पत्र व आपल्या विभागास लागणारी सर्व कागदपत्र आपल्याला दिल्यावर म्हाडाचे नाव रद्द करुन या दोनही भूखंडावर परत श्रीमती वत्सलाबाई शिंदे यांचे नांव लावण्यात आले आहे. सदर बदल अचूक झाला नसून त्यात काही त्रुटी आहेत. सदर बदल आपल्या रोखपाल व इतर सर्व विभागातही अजून अचुकरित्या झालेला नाही.

जन माहिती अधिका-याने मागणी केलेली माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी

दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली.आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन कायदेशिररित्या आवश्यक असलेली सर्व कागदपत्र व मूळ अधिकारिता दिल्यावरही अजून मूळ उता-यात व जिल्हाधिका-यांच्या अखत्यारितील सर्व कार्यालयात/विभागात भुखंड क्र.२०५८ व २०६० या मालमत्ता श्रीम.वत्सलाबाई गेनुजी शिंदे यांच्या नावे करण्यात आल्या नाहीत याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या मागणीप्रमाणे श्रीम.वत्सलाबाईंचे नाव मूळ उता-यात घेतले असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास कळविले असल्याचे आयोगासमोर द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती कळविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२३.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९८/०२**

**श्री. भूपेन टोकरशी गाला,**
**द्वारा- श्री.चुनीलाल लालजी आणि कं.,**
**८,इसरायल चाळ, ताडवाडी, माझगांव,**
**मुंबई-४०००१०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. भूपेन टोकरशी गाला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.१२.२००९ रोजी अर्ज करुन संस्थेच्या सादर प्रस्तावाच्या नस्तीमधील एल.ओ.आय. व आय.ओ.डी. फाईलची कागदपत्र मागीतली होती. योजनारुप असलेली आणि अपीलकाराने मागणी केलेली माहिती एकूण रु.१३८/-इतके शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी तसेच अपीलकाराने मागीतलेली माहिती मोठया स्वरुपाची असल्यामुळे अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राचे निरिक्षण करावे असेही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.४.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले. त्यानंतर अपूर्ण माहिती पुरविण्यात आली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने दि.३१.१२.०९च्या पत्रानुसार मागणी केलेली माहिती अपीलकारास दि.१५.२.०९ रोजी पुरविली. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशानुसार दि.१.४.२०१० रोजी आवश्यक असलेले दस्तऐवज अपीलकारास पुरविण्यात आले. अपीलकारास दस्तऐवज देऊन ते मिळाल्याची नोंद व स्वाक्षरी घेण्यात आली असा जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी उर्वरित माहिती तसेच विकासक आणि एम.टी.एन.एल. १०डी यांच्यामध्ये झालेल्या करारपत्रची प्रत आणि इतर संबंधीत कागदपत्राच्या प्रती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवाव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२३.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०८७/०२**

**श्रीमती शैलजा भा.सुभेदार,**
**अंबिका को.ऑप.हौ.सो.लि.,**
**बिल्डिंग नं.७, रुम नं.१७८,**
**सिध्दार्थ नगर नं.३, गोरेगांव(प.),**
**मुंबई-४००१०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,**
**उपनिबंधक(म्हाडा) यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी,**
**उपनिबंधक(म्हाडा) यांचे कार्यालय,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती शैलजा भा.सुभेदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन गोरेगाव अंबिका सहकारी गृहनिर्माण संस्था लि. गोरेगाव(प.) या संस्थेच्या इमारत विकसनासंबंधीत सभासदांनी सादर केलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित मुदतीत परविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गोरेगाव अंबिका सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या इमारत विकसनासंबंधी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सभासदांनी दि.२८.१२.२००६ रोजी सादर केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२३.६.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०८८/०२**

**श्री.दत्ताराम जनार्दन तांडेल,**
**संभाजी सेवा मंडळ, रुम नं.३९,**
**जवाहन नगर, संत गाडगे महाराज मार्ग,**
**गोळीबार रोड, खार(पू.),मुंबई-५५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,३रा माळा,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.भूव्यवस्थापक(अंधेरी),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,३रा माळा,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दत्ताराम तांडेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.१.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)मौजे बांद्रा(पूर्व) तहसिल अंधेरी जवाहन नगर, गोळीबार खार सांताक्रुज(पूर्व) येथील सर्व्हे नं.१२८, १२९, १३०, १३१, १४०, १४१, १४२, १४३, १४५, १४७, १५०,१५३,१५४, १५५, १५६, १७१, १७२, ३०८, ३०९, ३१४, ३१५, ३५५, ३५५अ,३५५ब, ३८७, ३८९,५८२ या सर्व्हे भुखंडापैकी कोणकोणता भूखंड सेन्सस एरीया स्लम घोषित झालेला आहे या संबंधित आपल्या कार्यालयात असलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या छायाप्रती तसेच वरील सर्व्हे भूखंडाविषयीचा संपूर्ण तपशिलवार माहितीच्या कागदपत्राच्या छायाप्रती साक्षांकित करुन देण्यात याव्यात.

२)वरील दिलेल्या भूखंडावर कोणत्या वर्षी रेन्ड घेतली व किती वर्षापर्यंत घेतली या विषयी आपल्या कार्यालयात जमा असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती देण्यात याव्यात.

जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मौजे बांद्रा(पूर्व) तहसिल अंधेरी येथील जवाहरनगर, खार सांताक्रुज(पूर्व) येथील कोणकोणता भूखंड ॲक्वायर केलेला आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास Property Cardची प्रत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२३.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०८९/०२**

**श्री. राजन रामचंद्र पटेल,**
**अबुबकर चाळ, रुम नं.३०९,**
**हनुमान हितवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**सी.टी.एस.नं.३०(पै), जवाहन नगर,**
**गोळीबार रोड, खार(पूर्व), मुंबई-४०००५५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह.मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ(म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन,३रा माळा,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह.भूव्यवस्थापक(अंधेरी),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,अंधेरी मुंबई मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,३रा माळा,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. राजन पटेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१०.२००९ व ९.११.२००९ रोजी अर्ज करुन प्रस्तावित हनुमान हीतवादक सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधी पात्र सभासदाची परिशिष्ट-II ची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्रस्तावित हनुमान हितवादक सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधी परिशिष्ट-II बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपीलकाराने अर्जात नमूद केलेल्या व्यक्तीसंबंधी परिशिष्ट II कोणत्या कागदपत्राच्या आधारे तयार करण्यात आले याबाबत अपीलकारास सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२३.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०६७/०२**

**श्री. पी.पी.नाईक,**
**गोराई सम्राट अशोक को.ऑप.हौ.सो.(मर्या.),**
**सदनिका क्र.४०२, प्लॉट नं.१०२,(आर.एस.सी.३७),**
**गोराई-२, बोरीवली(प.), मुंबई-४०००९१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपअनबंधक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**रुम नं.२१८,गृहनिर्माण भवन, वांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी(श्रेणी-१),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**रुम नं.२१८,गृहनिर्माण भवन, वांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०० ०५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. पी.पी.नाईक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.८.२००९ रोजी अर्ज करुन प्रशासक समितीचा सुरुवातीचा नियुक्तीचा कालावधी ६ महिन्याचा म्हणजे दि.९.११.०८ पर्यंत होता. त्याच्या समाप्तीनंतर देण्यात आलेलया प्रशासक समितीच्या मुदत वाढीच्या आदेशाची प्रमाणित प्रत व इतर एकूण ५ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१५.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस व विशेष सर्व साधारण सभेस मान्यता घेतल्याबाबत व प्रशासक मंडळास घेतलेल्या मुदतवाढीसंदर्भात कार्यालयाचे अभिलेख्यात अभिलेख आढळून न आल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.११.९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले आहे असे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**मुंबई**
**दिनांकः२४.६.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०११/०२**

**श्री. देवेंद्र हरिश्चंद्र मेढेकर,**
**३/४, चंद्रोदया को.ऑप.हौ.सो.चेंबूर-७१,**
**मुंबई-४०००७१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम विभाग कार्यालय,**
**शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ. व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम विभाग कार्यालय,**
**शरदभाऊ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. देवेंद मेढेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.२.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

घर सोडून श्रीमती सुशीला पोळ(३/३) ते श्री.राजेंद्र हसनाळे(८/१) या ७ घरादरम्यान नवीन टाकलेली मलनिःसारण वाहिनी तसेच ३/३ येथील मलनिःसारण वाहिनीवरील पाण्याची टाकी अधिकृत आहे का? असेल तर मलनिःसारण वाहिनी विषयी सोसायटीने तर पाण्याच्या टाकीविषयी श्रीमती पोळ यांनी सादर केलेला मान्यताप्राप्त नकाशा, परवानगीसंबंधी केलेला सर्व पत्रव्यवहार तसेच पालिकेने मंजूर केलेल्या संपूर्ण प्रस्तावाची प्रत छायांकित करुन देणे.

२)चंद्रोदय सोसायटीतीनी ३/४ मधील शेड अनधिकृत आहे का? ३/३ मधील पाण्याची टाकी अनधिकृत आहे का? असेल तर किती दिवसात कारवाई करणार? याबाबत आत्तापर्यंत किती तक्रारी करण्यात आल्या, ही कारवाई न करण्याचे कारण काय?

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३.२.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय सविस्तर माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी अपूरी व चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.८.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय

अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास माहिती पुरवावी असे दि.४.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतर शेडविषयी चुकीची व अपूरी माहिती तसेच मलनिःसारण वाहिनी आणि पाण्याच्या टाकीबाबत मागणी केलेले सर्व कागदपत्र साक्षांकित करुन मागीतलेली माहिती याबाबत लेखी काहीच माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.३.२०१० रोजी आदेश पारित केले आहेत. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षा) एम/विभाग यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन सदर प्रमादाबद्दल जन माहिती अधिका-यांविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२४.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०५९/०२**

**श्री. बोरसे जगदिप हिंमतराव,**
**द्वारा-श्री.गोस्वामी देवेंद्र अमृत**
**नंदादीप को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.सी-३३, रुम नं.१८, सेक्टर-१२,**
**गोखले हायस्कूलजवळ, खारघर,नवी मुंबई-४१०२१० .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्र.उपसंचालक,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, कामा हॉस्पीटलच्या बाजूला,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, कामा हॉस्पीटलच्या बाजूला,**
**मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. जगदिप बोरसे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१.२०१० रोजी अर्ज करुन जळगाव जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना प्राप्त झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या यादीची छायांकित प्रत प्रमाणित करुन मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी माहिती विहित कालावधीत पुरविली नाही, पुरविलेली माहिती विसंगत असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन तसे आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या यादीची छायांकित प्रत प्रमाणित करुन मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई-१ यांनी दि.२६.१०.०७च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

श्री.किशोर गोविंद निंबाळे यांचे नांव मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या यादीत नव्हते. परंतू श्री.किशोर गोविंद निंबाळे यांनी पद भरतीच्या संदर्भात वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त उमेदवार म्हणून विहित नमून्यात अर्ज केलेला असून अर्जासोबत त्यांनी विशेष भूसंपादन अधिकारी जळगांव यांचेकडून प्राप्त केलेला प्रकल्पग्रस्ताचा दाखला सादर केलेला आहे तसेच मुलाखत व प्रात्यक्षिक परिक्षेत त्यांचा निवड यादीत समावेश झाल्याने प्रकल्पग्रस्त उमेदवार म्हणून त्यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

सोबत श्री.किशोर गोविंद निंबाळे यांनी विहित नमुन्यात व विहित मुदतीत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचेकडे केलेल्या नमुन्यात अर्जाची तसेच त्यांची सादर केलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या दाखल्याची छायांकित प्रत जोडली आहे.

जन माहिती अधिकारी तथा निरिक्षक प्रादेशिक कार्यालय, मुंबई-५१ यांनी अपीलकारास दिलेली माहिती आणि संचालक(प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीत विसंगती असल्याचे अपीलकाराने दि.४.३.२०१० च्या अपील अर्जात नमूद केले आहे. जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडून प्राप्त झालेली प्रकल्पग्रस्त उमेदवारांची यादीची छायाप्रत प्रमाणित करुन मिळावी असे अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. वरील वस्तुस्थिती लक्षात घेऊन जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत सविस्तर खुलासा करावा, अपीलकारास कळवावे, प्रत आयोगाकडे सादर करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०६१/०२**

**श्री. अशोक शंकर परब,**
**खोली नं.१६, चट्टीयार चाळ, संभाजी चौक,**
**न्यू मिल रोड, कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(सी व डी विभाग),**
**सहाय्यक पालिका आयुक्त, सी विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मरीन लाईन्स(पूर्व), मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण)**
**सहाय्यक पालिका आयुक्त, सी विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मरीन लाईन्स(पूर्व), मुंबई-४०० ००२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अशोक परब यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)सी विभागात एकूण किती प्रभाग मोडतात?

२)एकूण किती कंत्राटदार कंपन्या सी विभागात कार्यरत आहेत? त्यांची नांवे व सेल्स टॅक्स नंबर सहीत

३) अर्थसंकल्पीय निधीतून करण्यात आलेल्या सार्वजनिक हितांच्या कामाची यादी(तीन लाख रुपयांच्या निधीवरील)

४)एस्टीमेट देण्या अगोदर करण्यात आलेल्या नियोजित कामांचा सर्व्हे अहवाल(Inventory Copy)

५) तीन लाखाच्या वर निधी वापरण्यात आलेल्या कामाची पाहणी विजिलन्स मार्फत करण्यात आली असल्यास त्यांचा रिपोर्ट(Tavo Report)

६) रेती, सिमेंटचे ग्रेड तपासण्यात आले असल्यास त्यांचा टेस्टींग रिपोर्ट

७) झालेल्या कामांचा प्रोग्रेस रिपोर्ट व फायनल रिपोर्ट टक्केवारीसह

८) एकूण किती निधी वापरण्यात आला त्याची माहिती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२.२.२०१०च्या पत्रान्वये विहित रक्कमेचा भरणा कार्यालयात केल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधी संपल्यानंतरही माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणीचेवेळी अपीलकारास माहिती पुरविण्याचे आदेश दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन परिरक्षण खात्यातील झालेल्या कामकाजाची माहिती मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे पोच पावतीची प्रत आयोगास सादर करुन तसे आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०६५/०२**

**श्री. दत्ताराम के. पेडामकर व इतर,**
**रुम नं.एम-२२३, मरीअम्मा नगर,**
**नेहरु प्लॅनेटोरीयमच्या मागे,**
**डॉ.ए.बी. रोड, वरळी, मुंबई-४०००१८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**१५वा मजला, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**१५वा मजला, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दत्ताराम के. पेडामकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१.२०१० रोजी अर्ज करुन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ३.११.०९ रोजी मेसर्स आक्षय स्थापत्य प्रायव्हेट लि. यांना पत्र लिहिले. मेसर्स आक्षय स्थापत्य यांनी दि.११.१०.०९ रोजीच्या पत्रान्वये सचिव, पर्यावरण विभाग यांना उत्तर पाठविले, सदर पत्राची साक्षांकित प्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. माहिती नाकारण्यात आली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मेसर्स स्थापत्य यांनी लिहिलेल्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती. विभागामार्फत दि.१५.१.२०१० रोजी अपीलकारास माहिती टपालातून पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री. अनिष परशुरामे यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. उत्तरवादीने पाठविलली माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपीलकाराने आयोगासमोर स्पष्ट केले. त्यानंतर उत्तरवादीने आयोगासमोरील सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष अपीलकारास माहितीची प्रत दिली. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०७०/०२**

**श्री. निमिष सुधीर विलणकर,**
**ए/२२, हॅप्पी हाऊस सोसायटी, ४था मजला,**
**हातीसकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निमिष सुधीर विलणकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.१.२०१० रोजी अर्ज करुन ए-१ श्री. नेवरेकर, ए-२ पालकर, ए-३ विशेष वर्मा, ए-१६ शैला साटम, ए-१८ मीना मयेकर या सभासदांनी एप्रिल-२००८ ते डिसेंबर-२००९ पर्यंत प्रत्येकाने भाडयापोटी भरलेल्या पूर्ण रकमांची माहिती पुराव्यासहित मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

ज्या गृहनिर्माण संस्थांना शासनाच्या सहकार/सामाजिक न्याय/इतर शासकीय विभागाकडून अर्थसहाय्य उपलब्ध झालेले आहे अशाच गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार हा कायदा लागू आहे असे मुख्यालयाचे दि.८.२.२००६ च्या परिपत्रकात नमूद केले आहे.

तथापि आपला साधा अर्ज आहे असे समजून, पुढीलप्रमाणे माहिती देण्यांत येत आहे. सदरची माहिती ही या कार्यालयाचा अभिलेखाचा भाग नाही. ती संस्था स्तरावरची असल्यामुळे ती संस्थेकडून पाप्त करुन घेऊ शकता. तसेच आपणास माहिती देण्याविषयी संस्थेस सूचना देण्यात येत आहे.

यामुळै समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३१.३.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हवी असलेली माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी, संस्थेस सूचना देण्यात येत आहेत असे अपीलकारास कळविले. संस्थेवर प्रशासकाची नेमणूक केली आहे. अपीलकारास संस्थेची कोणतीही माहिती द्यायची नाही असा प्रशासकाने सस्थेच्या सर्वसाधारण सभेत ठराव संमत करुन घेतला आहे. यामुळे माहिती मिळाली नसल्याची बाब अपीलकाराने द्वितीय अपीलात नमूद केली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रशासकाने अपीलकारास हवी असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/३५०२/०२**
**/३५०३/**

**श्री. अनिल गोपाळ देवकुळे,**
**अे-१६,/०:१, ओमकार को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर-२६, वाशी,**
**नवी मुंबई-४००७०३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अनिल देवकुळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.४.२००९ रोजी अर्ज करुन श्री.गोपाळ श्रावण देवकुळे यांचे नावे कुलाबा संक्रमण शिबीर(कफ परेड) बिल्डिंग नं.११ रुम नं.९ वितरित झालेली आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. मूळ ॲलॉटमेंट लेटरची प्रमाणित प्रत, भाडे कधी पर्यंत भरले आहे, थकलेल्या भाडयाचा तपशील इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. मूळ नस्तीचा शोध घेऊन अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश देण्यात आले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराचे वडील श्री. गोपाळ श्रावण देवकुळे यांचे नावे कुलाबा संक्रमण शिबीर(कफ परेड) बिल्डिंग क्रमांक ११ रुम क्रमांक ९ वितरित झाली याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची मूळ नस्ती शोधून माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांना आदेश दिले आहेत. उत्तरवादीने अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०६२/०२**

**श्री. सुदिन रमेश प्रधान,**
**३४/१२३६, सुभाष नगर,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त(सुरक्षा दक्षता),**
**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,**
**वीरमाता जीजाबाई भोसले उद्यान,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, भायखळा(पूर्व),**
**मुंबइ्र-४०००२५.**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,**
**वीरमाता जीजाबाई भोसले उद्यान,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, भायखळा(पूर्व),**
**मुंबइ्र-४०००२५.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सुदिन प्रधान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.९.२००९ रोजी अर्ज करुन सुभाष नगर इथे सी.टी.एस.८२७ वर असलेली गार्डन क्र.४ हिचे क्षेत्रफळ, प्रॉपर्टी कार्ड वर १८१४.७० तर एम वार्डातील नोंदविलेल्या अभिलेखानुसार १८६० चौ.मि. हा फरक येण्याची कारणे मिळावीत इत्यादि एकूण ५ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.८.१.२०१० च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.८.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी उत्तरवादीने अपूर्ण माहिती पुरविली असल्याचे अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकरास उर्वरित माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०६६/०२**

**श्री. दत्ताराम जनार्दन तांडेल,**
**संभाजी सेवा मंडळ, रुम नंबर ३९,**
**जवाहर नगर, संत गाडगे महाराज मार्ग,**
**गोळीबार रोड, खार(पूर्व), मुंबई-४०००५५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**सहमुख्य अधिकारी यांचे कार्यालय,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक भूव्यवस्थापक,**
**सहमुख्य अधिकारी यांचे कार्यालय,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दत्ताराम तांडेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)मौजे बांद्रा(पूर्व) तहसिल अंधेरी जवाहरनगर गोळीबार खार-सांताक्रुज(पूर्व) येथील सर्व्हे नं.३५५अ,३५५अ १,३५५अ २, ३५५ब, १२८,१३०,११,१३६,१४१,३८८,३८७,३८९ या भूखंडांवर आपल्य कार्यालयातून प्लॉटींग करण्यात आलेली आहे. वरीलपैकी कोणते ५भूखंड तुमच्या अखत्यारीत नाहीत असे दर्शविते त्या ५ भूखंडांची एरीया, सर्व्हे नं.,मिळकत याची तपशीलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी.

२)जवाहर नगर गोळीबार, सांताक्रुज(पूर्व) येथील मुस्लिम कब्रस्तानच्या लगतच्या पूर्वेस जो आपण आराखडा तयार केलेला आहे त्या आराखडयावरील न.भु.क्र.देण्यात यावा.

३)मौजे बांद्रा(पूर्व) गोळीबार जवाहर नगर सांताक्रुज(पूर्व) सर्व्हे नं.३५५ अ-१ चा सिटी सर्व्हे कडून मोजणी केलेला नकाशा व आलेली मिळकत ती बरोबर येत नाही असे दर्शविण्यात आलेली आहे. आपल्या मिळकतीवरती किती झोपडीधारकांचे भाडे घेण्यात आले आहे(किती सालापर्यंत) त्यानंतर

सेन्सस झाल्यावर किती झोपडयांचे भाडे आजपर्यंत घेण्यात आलेले आहे याचा संपूर्ण माहितीचा तपशील लेखी स्वरुपात आपणाकडे आहे त्या तपशिलाची छायाप्रत देण्यात यावी.

४)मौजे बांद्रा(पूर्व) तहसिल अंधेरी-जवाहन नगर गोळीबार खार-सांताक्रुज(पूर्व) येथील १२८ एकर भूखंड आपल्या अखत्यारित आहे असे लिहून दिलेले आहे. या १२८ एकर म्हाडाच्या जागेबाबतचा लाल रंगाने मार्कींग केलेल्या आराखडयाची छायाप्रत साक्षांकित करुन देण्यात यावी.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती अत्यंत जुनी असल्याने शोधण्याचे काम सुरु आहे. माहिती उपलब्ध होताच पुरविण्यात येईल. मुद्दा क्र.४ ची माहिती वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई मंडळ यांच्याकडून घ्यावी. अर्जाची प्रत त्यांना देण्यात येत आहे. अर्जातील मुद्दा क्र.५ बाबत कार्यालयात व्यक्तीशः येऊन भेटावे म्हणजे अपीलकाराचे म्हणणे काय आहे ते कळेल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१.१.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. संबंधीत विभागाकडे जी माहिती उपलब्ध असेल,ज्या स्वरुपात उपलब्धअसेल तशी प्राप्त करुन अपीलकारास पुरविण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले.त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिकारी हे आयोगाकडील द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते. अपीलकारास त्वरित माहिती पुरवावी असे दि.१.१.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. सदर आदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार त्यांच्या विरुध्द रु.२५,०००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**मुंबई**
**दिनांक:२४.६.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०७३/०२**

**श्रीमती रेश्मा दत्ताराम मांजरेकर,**
**गणेश दर्शन, ए विंग-७०१,**
**ताराबाग को.ऑप.हौ.सो.लि.,**
**लव्हलेन, माझगाव, मुंबई-४०००१०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**लघुवाद न्यायालय,धोबी तलाव,**
**मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी,**
**लघुवाद न्यायालय,धोबी तलाव,**
**मुंबई-४०० ००२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती रेश्मा मांजरेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.२.२०१० रोजी अर्ज करुन सुट(suit) क्रमांक ३२८, ३२८/६ बाबत माजी न्यायाधिश श्री.मुरुमकर यांनी तयार केलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. १५ दिवसाचे आत र.४/- इतके शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-याने चुकीची माहिती पुरविली. ती माहिती घेण्यास अपीलकाराने नकार दिला आणि प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.६.४.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन suit क्र.३२८,३२८/६बाबत माजी न्यायाधिश श्री.मुरुमकर यांनी तयार केलेल्या अहवालाची प्रत मागीतली होती. अपीलकाराने उद्‌घोशित केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०६८/०२**

**श्री. दिन मोहम्मद कुरेशी,**
**प्लॉट नं.४७-ए-३, बी.एम.सी. स्कूल नं.२च्या समोर,**
**शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई-४०००४३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जॉईंट सी.ओ. यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन,मुंबई बोर्ड, ३रा मजला,**
**म्हाडा भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**जॉईंट सी.ओ. यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन,मुंबई बोर्ड, ३रा मजला,**
**म्हाडा भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दिन मोहम्मद कुरेशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१.२०१० रोजी अर्ज करुन अपीलकारास गोल्डन प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था, नेहरु नगर कुर्ला या संस्थेत सदनिका देणेबाबत व भ्रष्ट अधिका-याची चौकशी करण्याबाबत दि.१०.३.२००९ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गोल्डन प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था, नेहरु नगर, कुर्ला या संस्थेच्या कामकाजाबाबत, कर्मचा-याच्या भ्रष्ट कारभाराबाबत चौकशी करण्याकरीता तक्रार केली होती.

सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सविस्तर अहवाल सभापती, मुंबई मंडळ यांना दि.१६.६.२०१० रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला असल्याचे उत्तरवादीने पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. माहिती पुरविण्यात आली आहे. पत्राची प्रत सभापतींच्या स्वीय सहाय्यकास अग्रेषित केली आहे. सदर पत्राची प्रत सुध्दा अपीलकारास पाठवावी. सदर कारवाई जन माहिती अधिका-यांनी हे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत पूर्ण करावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०७१/०२**

**श्री. गोपाल व्ही. मेरानी,**
**१४/बी-४, जेठीबेन को.ऑप.हौ.सो.,**
**मोरी रोड, माहिम, मुंबई-४०००१६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गोपाल मेरानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.९.२००९ रोजी अर्ज करुन जेठीबेन सहकारी गृहनिर्माण संस्था लि. माहिम, मुंबई या संस्थेचे व्यवस्थापकीय मंडळ मोठया प्रमाणात अनियमितता करत असून अवैध काम करत असल्याबाबत एकूण ९ तक्रार अर्ज सन २००९ मध्ये केले आहेत. सदर तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

आपले तक्रार अर्जानुसार संस्थेस भेट देऊन संस्थेचा लेखी खुलासा प्राप्त केलेला आहे. संस्थेच्या लेखी खुलाशानुसार आपण समितीच्या ३ सभांना गैरहजर राहिल्याने दि.२९.३.२००९ च्या सभेत आपणास चेअरमन व समिती सदस्य या पदावरुन कमी करण्यात आलेले आहे असे संस्थेच्या कागदपत्रांवरुन दिसते. संस्थेने दि.३०.७.२००९ च्या मासिक सभेत श्री.वि.मा.पाटणकर यांची अध्यक्ष म्हणून व सौ. वंदना अशोक पोतनीस यांची सचिव म्हणून नेमणूक केल्याबाबतचे संस्थेच्या कागदपत्रवरुन दिसून येते.

यामुळे समाधान झले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दिनांक ११.१२.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या अवैध कामाबाबत व करण्यात येणा-या अनियमिततेबाबत अपीलकाराने माहिती मागीतली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या कामातील अनियमिततेबाबत केलेल्या तक्रारीवरीवरील कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२४.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०१३/०२**

**श्री. आर.जी. मुलतानी,**
**२२८/२३०, मोतीवाला मेन्शन,**
**२रा मजला, डंकन रोड, मुंबई-४०० ००८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(इ.प्र.),**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय(इ.प्र.)(शहरे),**
**ई वार्ड ऑफीस इमारत, ३रा मजला,१० शेख हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र.)शहरे-II,**
**म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबई,**
**उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय(इ.प्र.)(शहरे),**
**ई वार्ड ऑफीस इमारत, ३रा मजला,१० शेख हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४०० ००८.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आर.जी. मुलतानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.२.२०१० रोजी अर्ज करुन नर्सिंग होम, पॉलीक्लीनीक, मॅटर्निटी होमस आणि वैद्यकीय व्यवसायिक इत्यादी तळ मजला, पहिला मजला व दुस-या मजल्यावर इमारतीच्या एका भागात स्वतंत्ररित्या असणे आवश्यक असल्याचे नमूद करुन याबाबत एकूण ६ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. माहितीपोटी विहित शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२०.२.२०१० च्या पत्रानवये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अर्जातील मुद्दा क्रमांक ४ बाबत अपीलकारास माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१५.४.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कले.

सदर अपीलावर दि.२१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०१०/०२**

**श्री. दत्तात्रय मोहन पेठकर,**
**आर/ओ ११५२ए, विष्णू गल्ली,**
**मु.पो.ता.तासगांव,जि.सांगली-४१६ ३१२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पुराभिलेख सचालनालय,**
**१५६, एलफीस्टन महाविद्यालय इमारत,**
**महात्मा गांधी रोड,**
**मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(मि.व्य.३),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दत्तात्रय पेठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.४.२००९ रोजी अर्ज करुन सार्वजनिक बांधकाम खात्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती पुरविल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.५.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम खात्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास देण्याची उत्तरवादीने तयारी दर्शविली आहे. परंतू कार्यालयाचे नवीनीकरणाचे काम चालू असल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व कागदपत्र सिलबंद करुन ती

इतरत्र हलविण्यात आली आहेत. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, कार्यालयाचे नवीनीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सर्व कागदपत्र कार्यालयात परत आणल्यानंतर अपीलकारास हवी असलेली कागदपत्र जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरवावीत.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६००९/०२**

**श्रीमती प्रणाली धायलकर,**
**२३/३९, डिलाईल रोड,**
**बी.डी.डी. चाळ, एन.एम.जोशी मार्ग,**
**मुंबई-४०००१३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग(प्रशा-३),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव( वि.चौ.),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग(प्रशा-३),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती प्रणाली धायलकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.११.२००९ रोजी अर्ज करुन सार्वजनिक बांधकाम विभागाविरुध्द सी.टी.सिव्हील,सेशन कोर्ट,औद्योगिक न्यायालय,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली येथे किती प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहेत याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती पुरविली नाही.यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.२५.८.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माति आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कले.

सदर अपीलावर दि.२१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सार्वजनिक बांधकाम विभागाविरुध्द विविध न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या न्यायालयीन प्रकरणाबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरीता हजर होते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०२१/०२,**

**श्री. वसंत शामराव उटीकर,**
**तिरंगा को.ऑप.हौ.सो.लि.,**
**डी-२०/०.३ तळमजला, सेक्टर-२५,**
**जुईनगर(पश्चिम), नवी मुंबई-४००७०५.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त,**
**विक्रीकर आयुक्त कार्यालय,**
**मुख्यालय-१, माझगांव, मुंबई-४०००१०.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. वसंत उटीकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन विविध विषयावर माहिती मागीतली होती. तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली. परंतू तक्रारदाराच्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/४३४६/०२ हे दाखल केले होते. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी ४ आरठवडयाचे आत राज्य माहिती आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आयोगाने दि.२६.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यास अनुसरुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला आहे. तक्रारदाराच्या एकूण ६ अपीलांबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी तारीखनिहाय खुलासा केला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता तक्रारदाराच्या अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी विहित वेळेत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले आहेत. परंतु तक्रारदाराच्या अपील क्रमांक ११४९, दि.२९.७.२००९, अपील क्रमांक १४१५,दि.१७.९.२००९, अपील क्रमांक १५४०,दि.१६.१०.०९ या अपीलासंबंधी विलंब झलेला असल्याचे दिसून येते. सदर कालावधीत निवडणूका, वैयक्तिक कामानिमित्त घेतलेली रजा, तसेच हिवाळी अधिवेशनाकरीता नागपूरला जाणे, अधिवेशनाची पूर्व तयारी(कायदा व नियमातील सुधारणा) आयुक्त कार्यालयाच्या

आस्थापनेची पूर्ण वेळ जबाबदारी, सदर विलंब हा जाणूनबूजून अथवा हेतूपुरस्सर करण्यात आलेला नाही असा प्रथम अपीलीय अधिका-यांनी आयोगाकडे लेखी खुलासा केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी तक्रारदाराच्या प्रथम अपील प्रकरणी सुनावणी आयोजित करण्यास, आदेश पारित करण्यास विलंब झाला असल्याचे दिसते. या प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.३.२०१० च्या पत्रानुसार आयोगास सादर केलेल्या खुलाशावरुन आदेश पारित करण्यास हेतुपुरस्सर अथवा जाणूनबूजून विलंब केला असल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, प्रथम अपीलीय अधिका-यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कारवाई केली जाईल याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २८.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०२५/०२,**

**श्रीमती स्मिता पवार,**
**१०३-ए, कृष्णा चेंबर्स,**
**५९, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा निबंधक भागीदारी संस्था,**
**निबंधक भागीदारी संस्था यांचे कार्यालय,**
**नवीन प्रशासकीय इमारत, ६वा मजला,**
**शासकीय वसाहत वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती स्मिता पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२२.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३०.१२.२००८ रोजी अर्ज करुन मेसर्स मोनिका इंडीया फर्मबाबत एकूण ९ मुद्यांवर माहिती मागीतली होती. फर्मच्या कागदपत्राच्या निरिक्षणाकरीता दिनांक व वेळ निश्चीत करण्याची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मेसर्स मोनिका इंडिया, नोंदणी क्र.ब-१८८७७७ या भागीदारी संस्थेसंबंधी कागदपत्राची मागणी केली होती. सदर प्रकरणी ८८ कागदपत्र उपलब्ध असल्याबाबत व शुल्कापोटी रु.४८८/- इतकी रक्कम भरण्याबाबत तक्रारदारास कळविले.तक्रारदाराने दि.२८.१.०९ रोजी पावती क्र.७६६७२८४ अन्वये रु.४८८/- भरले. तक्रारदाराने सदर कागदपत्राच्या प्रती दि.३१.१.०९ रोजी हात बटवडयाने नेलेल्या आहेत असा प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था, मुंबई यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.

गैरतक्रारदाराने माहिती पुरविली असल्याचे तक्रारदाराने मान्य केले. परंतू सेवानिवृत्तीसंबंधीच्या पत्रावर गैरतक्रारदाराने कांही कारवाई केली नसल्याचे तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी मागणीप्रमाणे तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली आहे. सेवानिवृत्ती संबंधीच्या पत्रावर आवश्यक ती कारवाई गैरतक्रारदाराने करुन तक्रारदारास अवगत करावे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/९८६/०२,**

**श्री. सेलवीन हेन्रीक्वीस,**
**मेरी नॉल अपार्टमेंट, प्लॉट नं.३४,**
**फ्लॅट नं.३, लॉर्डस कॉलनी,**
**ऑरलेम मालाड, मुंबई-४०००६४.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी उपनिबंधक,**
**सहकारी संस्था पी वार्ड को.ऑप.हौ.सो.,**
**ए-१, इमारत, आर.टी.ओ. कार्यालयाजवळ, ट्रक टर्मिनस,**
**वडाळा(पूर्व), मुंबई-४०० ०३७.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. सेल्वीन हेन्रीक्वीस यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. ३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन मेरीनोल अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था लि.फ्लॅट ३४, वतनाई व्हीलेज, लॉर्डस कॉलनी, ओर्लेम, मालाड(प.), मुंबई-६४ या संस्थेसंबंधी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती १५ दिवसाचे आत पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२९.४.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१३.२.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की,

तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली आहे. तक्रारदार, तक्रारीवरील सुनावणीकरीता हजर होते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी झाली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २८.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९९/०२**

**श्री.दिलीप रामचंद्र जगताप,**
**रंग भारती, तोडी इस्टेट, मागील प्रवेशद्वार,**
**सन मील कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई-४०००१३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग कार्यकारी अभियंता,**
**जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, जी/द.विभाग कार्यालय इमारत,**
**पहिला मजला, ना.म. जोशी मार्ग, मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग कार्यकारी अभियंता,**
**जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, जी/द.विभाग कार्यालय इमारत,**
**पहिला मजला, ना.म. जोशी मार्ग, मुंबई-४०००१३. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिलीप रामचंद्र जगताप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.४.२०१० रोजी अर्ज करुन टोडी इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि., सन मिल कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई येथील अनधिकृत गाळयांच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध ती माहिती विनाशुल्क देण्यात यावी असे दि.२३.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन टोडी इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि., सन मिल कंपाऊंड, लोअर परेल,मुंबई येथील अनधिकृत गाळयाच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, सन १९६७ मध्ये ४थ्या मजल्याचे काम सुरु होते. मुंबई महानगरपालिकेने बांधकामास परवानगी दिली होती असे कागदपत्रावरुन दिसून येते असे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२५.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०९७/०२**

**श्री. गोपीनाथ रामा साळवी,**
**१९२/१५३४, मोतीलाल नगर १,**
**गोरेगाव(प.), मुंबई-४००१०४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. गोपीनाथ साळवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.८.२००८ व १९.३.२००९ रोजी अर्ज करुन तिन डोंगरी, यशवंत नगर, गोरेगाव(प.), मुंबई येथील झोपडपट्टीच्या पुनर्विकासाच्या कामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत आवश्यक ती माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने दि.४.११.०९,२९.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नराही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तिन डोंगरी, यशवंत नगर, गोरेगाव(प.), मुंबई येथील झोपडपट्टीच्या पुनर्विकासाच्या

कामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सन २००६ ते २००७-०८ ते फेब्रुवारी २००९ पर्यंतच्या कालावधीत विकासाची कामे बंद झालेली आहेत. ती का बंद झाली, बंद झालेली कामे कधी चालू होणार, संस्थेची झोपडपट्टी पुर्नविकासाची कामे चालू होणार आहेत की नाही इत्यादी मुद्दे अपीलकाराने द्वितीय अपीलात उपस्थित केले आहेत. जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपलावरील सुनावणीचेवेळी असे प्रतिपादन केले की, अपीलकारास माहिति पुरविण्यात आलेली आहे. संस्थेच्या पुर्नविकासाबाबतची सद्यस्थिती यापूर्वीच अपीलकारास का दिली नाही, संस्थेच्या पुर्नविकासाचे काम का सुरु होत नाही याबाबतची माहिती अपीलकारास पुरविणेत यावी. सदर प्रकरणी खाजगी व्यक्ती आणि महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळ यांच्यामध्ये Dispute असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणाबाबतची सद्यस्थिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०७७/०२**

**श्री. विश्वास वसंत ताम्हणकर,**
**टागोर नगर चाळ क्रमांक १५६,**
**खो.क्र.२५८५, ग्रुप क्रमांक ५/ब, विक्रोळी(पूर्व),**
**मुंबई-४०००८३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**सशस्त्र पोलीस व दंगल नियंत्रण पथक,**
**नायगाव, मुंबई-४०००१४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**सशस्त्र पोलीस व दंगल नियंत्रण पथक,**
**नायगाव, मुंबई-४०००१४.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विश्वास ताम्हणकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००९ व १९.३.२००९ रोजी अर्ज करुन पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेचे कामकाज करणारे सशस्त्र दलातील मंत्रालयीन कर्मचारी(कनिष्ठ लिपिक ते वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी) यांची विविध मुद्यावर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुनअपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकारास सदर प्रकरणी वेळोवेळी माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. उत्तरवादीने अपीलकारास पुरविलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नसल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य

अधिकारी श्री.पवार यांनी अपीलकारास सर्व संबंधीत कागदपत्रे/धारिका निरिक्षण करण्याकरीता उपलब्ध करुन द्यावी. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून सर्व संबंधीत कागदपत्र/धारिकेचे निरिक्षण करावे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२५.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९७९/०२**

**श्री. दिलीप रामचंद्र गांधी,**
**रुम नं.१, तळ मजला, ८, गांधी विहार,सखाराम किर रोड,**
**माहिम, मुंबई-४०००१६.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता इलाखा शहर विभाग(सा.बां.वि.)यांचे कार्यालय,**
**३रा मजला, डी.डी.इमारत, जुने जकात घर आवार,**
**मुंबई-४०००२३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
**पश्चिम(सा.बां.) उप विभाग,**
**कार्यकारी अभियंता इलाखा शहर विभाग(सा.बां.वि.)यांचे कार्यालय,**
**३रा मजला, डी.डी.इमारत, जुने जकात घर आवार,**
**मुंबई-४०००२३.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिलीप रामचंद्र गांधी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.६.१.२०१० रोजी अर्ज करुन उप विभागातील मोजमाप पुस्तके क्रमांक १)०२८५४०१ २)०७२४९०१ ३)०५१५५५१ ४)६०००५१ ५)०७९९००१ ६)०५९३०५१ ७)०७२४९०१ ८)०७७३६०१ या मोजमाप पुस्तकाच्या छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व्यक्तीशः कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासून घेऊन नेमकी माहिती पुरविण्यात येईल असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास आठ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आदेश पारित केले. त्यानंतरही आठ दिवसात माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उप विभागातील मोजमाप पुस्तकाच्या छायाप्रतीची मागणी केली होती. सदर प्रकरणी कार्यालयात उपलब्ध असलेल्या मोजमाप पुस्तकाच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात आल्या असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००७/०२**
**/७००८/**

**श्री. संदेश चंद्रकांत वाईरकर,**
**श्री मोरेश्वर सदन बिल्डिंग, T ४६/३१३,**
**प्रतिक्षा नगर, सायन, मुंबई-४०००२२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अधिकारी/पुगा,**
**उप-मुख्य अधिकारी कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**खो.क्र.३७२, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक(पुगा),**
**उप-मुख्य अधिकारी कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**खो.क्र.३७२, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. संदेश चंद्रकांत वाईरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.२.२०१० रोजी अर्ज करुन सदनिका(गाळा)(मास्टर लिस्ट)मुंबई शहर/उपनगर मध्ये कोणत्या ठिकाणी उपलब्ध आहेत याबाबत माहिती मागीतली होती. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२९.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सदनिका कोणत्या ठिकाणी आहेत याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०७३/०२**

**श्री. के.व्ही.रविंद्र,**
**२० डी/१०५, १ला मजला,**
**भारत हाऊसच्या समोर,**
**मुंबई-४०००२३.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**दादर(पश्चिम), मुंबई-४०००२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, जी/उत्तर यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग कार्यालय,**
**दादर(पश्चिम), मुंबई-४०००२८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. के.व्ही.रविंद्र यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१.२०१० रोजी अर्ज करुन जी/एन विभाग,धारावी कोळीवाडा आणि त्या परिसरातील अतिक्रमण अवैध/अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३.३.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रारीसंबंधीची सद्यस्थिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळवावी असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३०.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जी/एन विभाग,धारावी कोळीवाडा आणि त्या परिसरातील अतिक्रमण अवैध/अनधिकृत बांधकाम, अतिक्रमणाबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अतिक्रमण जिल्हाधिका-यांच्या जमिनीवर झालेले आहे. सदर अतिक्रमणाविरुध्द जिल्हाधिका-यांनी आवश्यक ती कारवाई करणे अपेक्षित आहे. सदरबाबत माहिती अपीलकारास कळविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०७१/०२**

**ॲड. श्री. राजेश बिंद्रा,**
**२०डी/१०५, १ला मजला,**
**भारत हाऊसच्या समोर,**
**मुंबई-४०००२३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा स्पेशल ॲक्वीझीशन अधिकारी,**
**धारावी पुनर्विकास प्रकल्प,एस.आर.ए.,**
**५वा मजला, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००२३.**

**जन माहिती अधिकारी,**
**धारावी पुनर्विकास प्रकल्प,एस.आर.ए.,**
**५वा मजला, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००२३.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार ॲड. श्री.राजेश बिंद्रा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.१२.२००९ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्रमांक ६८०,६८१,६८२ आणि ६९०, धारावी विभाग, मुंबई येथील मालमत्ता संपादन केली त्याबाबतच्या संबंधीत कागदपत्राच्या प्रतीची व अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२७.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणीआयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन धारावी विभाग, मुंबई येथील संपादित केलेल्या मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास निःशुल्करित्या माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००१/०२**

**श्री.किरण निवृत्ती कोंदमगीरे,**
**सी-१, गौरी इमारत, प्लॉट क्रमांक ६ व ७ सेक्टर ५,**
**नवीन पनवेल(पूर्व), नवी मुंबई-४१०२०६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम माहिती प्राधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,**
**मुंबई युनिव्हर्सिटी, एक्झॅमिनेशन विभाग, एक्झॅम हाऊस,**
**महात्मा फुले भवन, विद्यानगरी कँपस, कालीना,**
**सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००९८.**

**अपीलीय अधिकारी तथा कंट्रोलर ऑफ एक्झॅम्स,**
**मुंबई युनिव्हर्सिटी, एक्झॅमिनेशन विभाग, एक्झॅम हाऊस,**
**महात्मा फुले भवन, विद्यानगरी कँपस, कालीना,**
**सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००९८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किरण कोंदमगिरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.१.२०१० रोजी अर्ज करुन Law of Evidence या पेपरचे पुर्नमुल्यांकन करण्याकरीता दि.१०.११.२००९ रोजी अर्ज क्र.१२१०१ दाखल केला होता, सदर अर्जानुसार निकाल केव्हा मिळेल याबाबत अपीलकाराने अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.१.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती पुरविली. अपूर्ण व चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन Law of Evidence या पेपरचे पुर्नमुल्यांकन करण्याकरीता अर्ज करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांच्या आदेशानुसार अपीलकारास आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव श्री.जी.टी. पगारे यानी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरीता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०९४/०२**

**श्री. रमेश नथ्थूजी झाडे,**
**३/७०३, श्री शाश्वत कॉंप्लेक्स, प्लेझंट पार्क,**
**मिरा भाईंदर रोड, मिरा रोड, जि.ठाणे-४०११०७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम माहिती प्राधिकारी तथा उप सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग(विशि-१),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**अपीलीय अधिकारी तथा कक्ष अधिकारी(विशि-१),**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग(विशि-१),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रमेश नथ्थूजी झाडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.१.२०१० रोजी अर्ज करुन एखाद्या विद्यापीठाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या निर्देशाशिवाय किंवा पूर्व परवानगीशिवाय अधिव्याख्याता पदासाठी शैक्षणिक अर्हतेसंबंधी परिपत्रक लागू केल्यास विभाग काय कारवाई करते याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील तरतुदीनुसार नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. माहितीच्या व्याख्येनुसार कोणत्याही अभिलेख्याची प्रत हवी असल्यास त्याबाबत मागणी करावी म्हणजे त्यानुसार माहिती उपलब्ध करुन देणे सुलभ होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.१.२०१०च्या पत्रानवये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते, सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एखाद्या विद्यापीठाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागाच्या परवानगीशिवाय अधिव्याख्याता पदासाठी शैक्षणिक अर्हतेसंबंधी परिपत्रक लागू केल्यास विभागाकडून काय कारवाई करण्यात येते अशी सर्वसाधारण प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागीतली होती. उक्त अधिनियमानुसार अशी सर्वसाधारण प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागता येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००४/०२**

**श्री. अमित सुरेश खानविलकर,**
**१/६, सकीनाबाई चाळ, पारशी वाडा,**
**सहार रोड, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०० ०९९.** .... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी-२,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अमित सुरेश खानविलकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.१.२०१० रोजी अर्ज करुन श्री साई वत्सल सोसायटी सी.टी.एस.क्र.५६० मार्फत विकासका विरोधात दि.२६.३.०९,२४,६,०९, २६.१०.०९, २९.१०.०९ व दि.१२.१२.०९ रोजी पत्र पाठविली आहेत, त्यावर केलेल्या कारवाईची अचुक, योग्य ती माहिती द्यावी अशी मागणी केली होती. उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख व सामुग्रीचे निरिक्षण करावे, त्यानंतर सूचित केलेली माहिती विहित शुल्क भरुन प्राप्त करावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.३.३.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन विकासकाविरुध्द एकूण ५ पत्र पाठवून केलेल्या तक्रारी संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती.झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने हील्टॉन डेव्हलपर्सकडून कागदपत्र घेतली आहेतअसे तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. हील्टॉन डेव्हलपर्सकडून पुनर्विकासाचे काम करण्यात येणार आहे असे मंडळाचे म्हणणे आहे. हील्टॉन डेव्हलपर्स बरोबर पुनर्विकासाचे कामाबाबत वाटाघाटी चालू असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे म्हणणे आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत वस्तुस्थिती कळवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:२८.६.२०१०** — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००५/०२**

**श्री. अनंत जीवराज मेहता,**
**१,प्रसाद बंगला, आनंद सागर सोसायटी,**
**आंबावाडी, इराणी रोड, डहाणू रोड,**
**जि.ठाणे-४०१६०२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, वाडा,**
**तालुका वाडा, जि.ठाणे.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, वाडा,**
**तालुका वाडा, जि.ठाणे.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अनंत मेहता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन मौजे वरसाले ता.वाडा येथील जमिन खरेदीच्या साठेखत करुन घेणार आणि आता शेतक-यांच्या गैरव्यवहारामुळे वाडा कोर्टात दावा र.मु.नं.८७/२००९ अनुसार तलाठीकडे लीट पेन्डन्सी नोटीस देतांना तलाठी म्हणाले की कोणी दस्तऐवज केला तर आम्ही फेरफार टाकून देणार. तलाठीच्या सांगण्याप्रमाणे तशी तरतूद असेल तर त्या नियमाची संपूर्ण माहिती द्यावी. नसेल तर तसे कळवावे अशी अपीलकाराने माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जमिन खरेदीच्या साठेखताबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास निःशुल्करित्या माहिती टपालातून पोच देय डाकेने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२८.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९७५/०२**
**/४९७६/**

**श्री. हार्दिक नरेंद्र मिस्त्री,**
**कोळीवाडा, फणसवाडी, जे.के.कंपाऊंड,**
**९१/के, तळ मजला, रुम नं.१४,**
**सिताराम पोद्दार मार्ग, मुंबई-४०० ००४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई(सा.बां.) विभाग,**
**गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता बांधकाम,**
**उप विभाग क्रमांक १- वरळी,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई(सा.बां.) विभाग,**
**गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. हार्दिक नरेंद्र मिस्त्रि यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन बांधकाम उप विभाग क्र.१ वरळी/बांधकाम उप विभाग क्रमांक-२ वरळी/ पूर्व उप विभाग, परेल/ उत्तर उप विभाग, दादर व विकास विभाग चाळी, वरळी या उप विभागांची सन २००८-०९ व २००९ ते नोव्हेंबर-०९ या कालावधीत एसआर,सीआर हेड खाली केलेल्या कामाची यादी कामाचे नाव टि.एस.रक्कम धनादेश क्रमांक, एजन्सी इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. मागणी केलेली माहिती न मिळाल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मूळ अर्जात मागीतलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी आठ दिवसाचे आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले.

जन माहिती अधिका-यांनी आदेशप्रमाणे आठ दिवसाचे आत माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उप अभियंता बांधकाम, उप विभाग क्रमांक १,२,पूर्व उप विभाग, उत्तर उप विभाग अंतर्गत सन २००८-०९ व २००९ ते नोव्हे.२००९ या कालावधीत केलेल्या कामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने सर्व संबंधीत कागदपत्राचे निरिक्षण केले. त्यामुळे अपीलकाराचे समाधान झाले असल्याचे पत्र अपीलकाराने दि.७.६.२०१० रोजी उत्तरवादीला दिले असल्याचे उत्तरवादीने सदर पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकाराचे समाधान झाले असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः२९.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४५५८/२**

**श्री. विल्यम एफ. डिसोझा,**
**ए-१६, गुड विल मॅन्शल,**
**अण्णा लुईस को.ऑप.हौ.सो., बिट नं.११,**
**टागोर नगर, पी.ओ.विक्रोळी(पूर्व)**
**मुंबई-४०००८३.** **..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक,**
**उप निबंधक को.ऑप. हौ.सो.(एस वार्ड)यांचे कार्यालय,**
**कोकण भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा ॲडमिनिस्ट्रेटर,**
**उप निबंधक को.ऑप. हौ.सो.(एस वार्ड)यांचे कार्यालय,**
**कोकण भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. विल्यम डिसोझा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.३.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१.२००९ रोजी अर्ज करुन अण्णा लुईस सहकारी गृहनिर्माण संस्था, विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३ या संस्थेचा डाटा मिळण्याची मागणी केली होती. मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२४.२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सदर प्रकरणी राज्य माहिती आयोग, खंडपीठ कोकण यांनी आदेश पारित केले असल्याची बाब उत्तरवादीने दि.९.९.२००९ च्या आदेशाची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०१०/२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-४०००१९. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था मंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला, फोर्ट,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,**
**सहकारी संस्था, एफ/एन विभाग,**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था मंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला, फोर्ट,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.६.२.२०१० रोजी अर्ज करुन राजबागच्या आराखडयाचे अवलोकन करावे,राजबागाच्या आराखडयाप्रमाणे दोन पॅसेंजर लिफ्टमधील पॅसेज सोसायटीच्या मालकीचा असून सदर पॅसेजवर काही सभासदांनी अतिक्रमण करुन पॅसेज ब्लॉकमध्ये समाविष्ट करुन घेतला आहे. सदर अतिक्रमणावर कार्यालयाकडून जी कारवाई होणार त्याची माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.११.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अशी माहिती पुरविण्याची उक्त अधिनियमात तरतूद नाही असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.८.४.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन राजबागाच्या काही सभासदांनी पॅसेजची जागा ब्लॉकमध्ये समाविष्ट करुन घेतल्याबाबत करण्यात येणा-या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचा विषय मुंबई महानगरपालिकेशी संबंधीत आहे. जन माति अधिका-यांनी अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज वार्ड ऑफीसकडे पुढील आवश्यक कारवाईकरीता पाठवावा.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००९/२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-४०००१९. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था मंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला, फोर्ट,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,**
**सहकारी संस्था, एफ/एन विभाग,**
**जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था मंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला, फोर्ट,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.२.२०१० रोजी अर्ज करुन प्रशासकाने दि.२५.६.०९ आणि दि.१८.७.०९ रोजी दलूचंद सोसायटीचे माजी चेअरमन श्री.किशोर छेडा यांना दोन पत्र लिहिली, सदर पत्राबाबत अपीलकाराने माहिती मागीतली होती. प्रशासकाने खुलासा कला नाही. याचा अर्थ चेअरमनने पत्राची दखल घेतली नाही. यावर कार्यालयाकडून जी कारवाई होणार याबाबत माहिती मागीतली होती. विहित कालावधीत मागणी केलेली माहिती मिळाली नाही. म्हणून अपीलकाराने दि.२०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्याने व माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने ती देणे अपेक्षित नाही असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१६.४.२०१० रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, प्रशासकाने संस्थेच्या माजी अध्यक्षांना दि.२५.६.०९ व दि.१८.७.०९ च्या पत्रांवर काय कारवाई करण्यात आली याबाबत प्रशासकाकडून माहिती घेऊन अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०११/२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई-४०००१९. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता(इ.प्र.)शहर-२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, उपप्रमुख अभियंता शहर यांचे कार्यालय,**
**ई विभाग, महापालिका कार्यालय, ३रा मजला,**
**शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियता(इ.प्र.)शहर२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, उपप्रमुख अभियंता शहर यांचे कार्यालय,**
**ई विभाग, महापालिका कार्यालय, ३रा मजला,**
**शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.१.२०१० रोजी अर्ज करुन महानगरपालिका क्र.ईईबीपी/६१२१/शहर-२ ता.२७.१.०९ या पत्रामध्ये संपूर्ण इमारतीस बी.सी.सी.दाखला प्रदान केल्यानंतर रहिवाशांना इमारतीमध्ये रहाण्याची परवानगी आहे असे म्हटले आहे. सदर रहाण्याची परवानगी ही बाब म.न.पा.ची मेहेरबानी समजायची किंवा कसे याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. भोगवटा प्रमाणपत्र मंजूर केल्यानंतर किंवा विशिष्ट इमारतीचे बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाण्पत्र स्विकारल्यानंतर रहिवाशांना संबंधीत सदनिकांमध्ये रहाण्यास परवानगी देण्यात येते असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१७.३.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माति आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकारान जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन म.न.पा.ने दिलेल्या भोगवटा प्रमाणपत्राबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. इमारतपूर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर संबंधीत रहिवाशांना संबंधीत इमारतीत रहाण्याचा अधिकार पोहचतो याबाबत म.न.पा.ने अपीलकारास खुलासा केला आहे. सदर प्रकरणी काही प्रश्न उपस्थित करण्याची बाब शिल्लक राहत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक: ३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०७२/२**

**श्री. अशोक लालचंद पुर्वे,**
**न्यू राहूल नगर, मुलुंड कॉलनी,**
**मुलूंड(प.), मुंबई-४०००८०. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**टी विभाग यांचे कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड(प.), मुंबई-४०००८०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**टी विभाग यांचे कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड(प.), मुंबई-४०००८०. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अशोक पुर्वे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

दि.७.८.२००९ रोजी जय शास्त्रीनगर जी.जी.एस. मार्ग श्री.साईबाबा मंदिराच्या मागे मुलुंड कॉलनी येथे सदर जागेच्या मालकाने म.न.पा. रस्त्यावर दोन्ही बाजूस लोखंडी गेट लावले आहेत,दि.७.८.२००९ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर आपल्या विभागीय कार्यालयातून झालेल्या कार्यवाहीसंदर्भात माहिती मिळणेबाबत.

जन माहिती अधिका-यांनी दि.५.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. जन मातिती अधिका-यांनी समाधानकारक माहिती पुरविली नाही, अपुरी माहिती पुरविणे या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दिनांक ११.२.२०१० रोजी आदेश पारित

केले. उत्तरवादीने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

रस्त्याचे सौंदर्यीकरण तसेच देखरेखीसाठी कार्यालयाकडून परवानगी देण्यात आलेली असल्याबाबत अपीलकारास उत्तरवादीने कळविले आहे. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुनर्विकासासंबंधीचे कागदपत्र निशुल्करित्या पाठवावेत.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०७३/२**

**श्री. अजितकुमार पंजाबी,**
**द्वारा- रमजान भटार, चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०.** **..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**टी विभाग यांचे कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड(प.), मुंबई-४०००८०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,**
**टी विभाग यांचे कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड(प.), मुंबई-४०००८०.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अजितकुमार पंजाबी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

संबंधीत कामकाजाची प्रशासकीय माहिती अभिलेखावर तसेच सॅप प्रणालीवर आपल्या विभाग हद्दीमध्ये परिरक्षण खात्याअंतर्गत होणारी कामे जन हिताची जनतेच्या पैशातून होणारी कामे १)रस्ते दुरुस्त किंवा नवीन बनविणे २)गार्डनची सिव्हील कामे ३)डिस्लजींग-शौच टाकी साफ करणे ४) डिसल्टींग - पावसाळी गटारातील गाळ काढणे याची अदा करण्यात आलेल्या देयकांची प्रत ५)पॉटल्स व बॅड पॅचेस, ट्रंचेस चर काढणे, बुझविणे प्रत्येक टेंडरच्या एका कामाच्या सर्व प्रती मिळाव्यात. चौकी कशी असावी? चौकीचे भाडे, डिपॉझीट कशा प्रकारे मासिक, सहामाही तसेच टेंडर भरते वेळी सोबत जोडलेली पत्र सिव्हील इंजिअनअर, सुपरवायझर नेमणूक यांच्या फोटो

प्रमाणपत्रासह छायांकित प्रती मिळाव्यात. हे सिव्हील इंजिनिअर नेमलेले प्रत्येक चौकीत कोणत्या वेळेत असतात ही माहिती मिळावी.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन करावे. त्यानंतर अपीलकारास हव्या असलेल्या उपलब्ध कागदपत्राच्या प्रतीसाठी प्रत रु.२/-प्रमाणे योग्य त्या रक्कमेचा भरणा करावा,गार्डन सिव्हील कामाच्या माहितीकरीता रु.१००२/- इतके शुल्क भरावे. त्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे अनुक्रमे दि.१०.१२.०९ व दि.२१.१२.०९च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. शुल्क भरल्यावर ७ दिवसात छायाप्रती देण्यात याव्यात तसेच उपलब्ध असलेल्या अभिलेखानुसार आवश्यक माहिती देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२९.३.२०१० रोजी आदेश पारित केले. योग्य माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सहाय्यक अभियंता, परिरक्षण खाते टी विभाग, मुलूंड(पश्चिम) मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील सिव्हील कामाच्या टेंडरची माहिती मागीतली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सिव्हील कामाबाबत अभियंत्यांकडून प्रमाणपत्र प्राप्त करावीत आणि ती अपीलकारास दिनांक १ ऑगस्ट,२०१० पूर्वी पुरवावीत.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००२/२**

**श्री. भूषण भगवानदास घोडी(पटेल),**
**भगवानदास हाऊस सी/१६,**
**चिंचोली बंदर रोड,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त, पी/उत्तर**
**विभाग कार्यालय, लिबर्टी गार्डन समोर, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता(इमारत),**
**पी/उत्तर विभाग कार्यालय, लिबर्टी गार्डन समोर,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. भूषण भगवानदास घोडी(पटेल) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१.२००९ रोजी अर्ज करुन मालाड, ता.बोरीवली, न.भु.क्र.१११४/२ चिंचोली बंदर लिंक रोड, मालाड ही मिळकत आदीवासींची आहे. सात बारा मध्ये कलम २९६६,३६अ अधिन नोंद आहे. मिळकत मध्ये अपीलकाराची चाळ आहे तेथे अपीलकार राहतात. बिनशेती कर व टॅक्स अपीलकार भरतात. मंडळ अधिकारी कुरार यांचे कार्यालयाने मिळकत विक्रीकरीता परवानगीबाबतचे पत्र पाठविले आहे. अपीलकाराची परवानगी घेतली नाही. विक्रीकरीता कार्यालय कुठल्या कायद्यानुसार कारवाई करणार आहे याबाबत लेखी माहिती द्यावी. वारसाने नाव दाखल करण्याकरीता अपीलकाराने शपथपत्र आणि इंडेमनीटी बाँड दिला होता त्यावर कार्यवाही झाली नाही याबाबत माहिती मागीतली होती. न.भू.क्र.१११४ सर्व्हे क्र.४४३/२ बाबत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२५.२.०९ रोजी अपील दाखल केले. प्रथम

अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

भगवानदास मखनजी हाउस, चिंचोली बंदर रोड, मालाड(प.), मुंबई-६४ येथील चाळीचे मालक श्री.भूषण घोडी यांनी भोगवटयाबाबत तक्रार केली होती. सदर जागेची पाहणी दि.१७.६.२०१० रोजी विभागातील संबंधीत अधिका-यांनी केली. त्यावेळी असे निदर्शनास आले की, संबंधीत चाळ पुर्नविकसित योजनेंतर्गत विकासक मेसर्स दिवाण यांनी सदर जागेवर विकास योजनेचा फलक लावल्याचे आढळले. तक्रारदाराच्या भाडोत्र्यांनी केलेल्या कामाची तक्रार केली की, लोखंडी ग्रील लावून गॅलरी बंद करण्यात आलेली आहे. याबाबत विभागाने चौकशी केली असता निदर्शनास आले की, भाडोत्र्यांनी लावलेली ग्रील त्यांच्या सुरक्षेसाठी आहे असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. तसेच सदर प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरीता हजर नव्हते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०९८/२**

**श्री. अमृत मारुती देवंग,**
**१०२,अे,पहिला माळा,**
**रुम को.ऑप.सोसायटी, नालासोपारा(प.),**
**पिन-४०१२०३.** **..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**बांद्रा-कुर्ला कॉंप्लेक्स (एम.एम.आर.डी.ए.),**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा निष्कासन विभाग भूमी शाखा,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**बांद्रा-कुर्ला कॉंप्लेक्स (एम.एम.आर.डी.ए.),**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अमृत देवंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.६.२००९ रोजी अर्ज करुन पश्चिम द्रुतगती महामार्गावरील रस्ता रुंदीकरणामध्ये शंकरवाडी, जोगेश्वरी(पूर्व) येथे बाधीत झालेल्या झोपडयांचे निष्कासन झाले अथवा नाही याबाबत माहिती मागीतली होती. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील रस्ता रुंदीकरणामध्ये शंकरवाडी,जागेसश्वरी(पूर्व) येथे झोपडी क्रमांक १६/२२, १७/२३, ६४/९५ आणि ८८/४९ बाधीत होत आहेत. सदर झोपडया दर्शविणारी कार्यालयाकडील उपलब्ध नकाशाची छायांकित प्रत व सदर झोपडीधारकांची उपजिल्हाधिकारी(अति/निष्का)अंधेरी, यांचेकडून प्राप्त झालेली परिशिष्ट-२ ची कार्यालीयन नस्तीची छायांकित प्रत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१३.७.२००९ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली आहे. रस्ता रुंदीकरणात बाधीत झोपडीधारकांचे निष्कासन हे २००६-२००७ साली झाले असून रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. आय.डी.क्रमांकाप्रमाणे निष्कासनासंबंधी माहिती लिखित स्वरुपात भूमी शाखेकडे उपलब्ध

नाही. परंतू संबंधीत अभियांत्रिकी विभाग आणि पुनर्वसन व पुर्नवसाहत विभागाचे प्रतिनिधी यांच्या समवेत प्रत्यक्ष स्थळ पहाणी केल्यानंतर निष्कासनाबाबत माहिती देणे शक्य होईल असे दि.१.४.२०१० रोजी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकारान जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पश्चीम द्रुतगती महामार्गवरील रस्ता रुंदीकरणामध्ये शंकरवाडी, जोगेश्वरी पूर्व येथे बाधीत झालेल्या झोपडयांचे निष्कासनाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निःशुल्करित्या माहिती पोच देय डाकेने पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०९७/२**

**श्री. प्रकाश अर्जून पंडागळे,**
**द्वारा- रचनात्मक कार्य समिती,**
**राष्ट्रीय शाळा मार्ग, गांधी चौक,**
**विले-पार्ले(पश्चिम), मुंबई-४०००५६. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, फाईन आर्ट गॅलरीच्या बाजूला,**
**चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी,**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालय,**
**मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, फाईन आर्ट गॅलरीच्या बाजूला,**
**चेंबूर(पूर्व), मुंबई-४०००७१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रकाश पंडागळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन श्री नित्यानंद विश्वनाथ पिल्लय या अंध कर्मचा-याच्या हॅपी होम अंधशाळा, वरळी, मुंबई येथील सेवा तपशील उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२९.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन हॅपी होम अंधशाळेतील श्री नित्यानंद विश्वनाथ पिल्लय या अंध कर्मचा-याच्या सेवा तपशीलाची मागणी केली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निःशुल्करित्या माहिती पोच देय डाकेने पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०९९/२**

**श्री. इर्शाद अहमद घोरी,**
**२, बिंदू टिळक रोड,**
**सांताक्रुझ(प.), मुंबई-४०००५४. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,**
**आझाद रोड, गुंडावली रोड, अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ. व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक पालिका आयुक्त, के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,**
**आझाद रोड, गुंडावली रोड, अंधेरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६९. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. इर्शाद अहमद घोरी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००९ रोजी अर्ज करुन अपीलकाराच्या दि.२३.१०.०९,१६.११.०९ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईसंबंधी अनुषंगिक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेल्या आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरवाव्यात असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही यामुळे माहितीचा अधिकारअधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत जन माहिती अधिका-यांनी ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/२०७३/२**

**डॉ.श्रीमती उषा एस.पाटील,**
**दुकान नं.१, दवाखाना, मिठानगर,**
**औद्योगिक वसाहत, एम.जी. रोड,**
**गोरेगाव(पश्चिम), मुंबई-४०००६२.** ..... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**१)प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बांद्रा विभाग),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**२)प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,मि.व्य.२,**
**मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-४,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार डॉ.श्रीमती उषा पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.७.२००८ रोजी अर्ज करुन मीठागर औद्योगिक वसाहत गोरेगाव(पश्चिम), मुंबई येथील दुकान क्रमांक-१ (डिस्पेन्सरी)चे मासीक भाडे रु.५९/- वरुन म्हाडाने परिपत्रक काढून दि.१.४.१९९८ पासून रु.१४४/- मासीक भाडे अशी भाडे वाढ केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१३.८.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दुकानाचे भाडे रु.५९/- वरुन रु.१४४/- भाडेवाढ केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळवावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४६०९/२**

**श्री. दिनेश महादेव तारकर,**
**द्वारा सुचिता महादेव तारकर,**
**राजा शिवाजी विद्या संकुल, हिंदू कॉलनी,**
**सोसायटी ऑफीस, दादर(पूर्व), मुंबई-४०००१४. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**१)प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**धारावी विभाग, जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालय,**
**ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**२) उप जिल्हाधिकारी(एस.आर.ए.),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा ऑफीस, ५वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(धारावी विभाग),**
**धारावी विभाग, जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालय,**
**ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. दिनेश महादेव तारकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.९.२००९ रोजी अर्ज करुन परिशिष्ट-२ मधील ४ पात्र धारकांना चुकीच्या पध्दतीने पात्र करण्यात आले, त्यांना अपात्र करण्यात यावे याबाबत लेखी माहिती द्यावी अशी अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

जय हनुमान सह.गृ.नि.संस्था, दादर डिव्हीजन, अंतिम भुखंड क्र.३६,न.र.क्र.३ येथील झोपडी धारक १)श्री.जयेश यशवंत वारेकर २)श्रीमती सुनिता यशवंत वारेकर ३) श्री.गायके विजय वामन ४) श्री.रावसाहेब काशिद मारुती ५)श्री.माणिक जलाली कल्लू ६)श्री.मिस्त्री बन्सीलाल के. यांनी सर्वेक्षणाचे वेळी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे त्यांचे झोपडे सर्वेक्षणास पात्र ठरविण्यात आलले आहे.

माहिती अपुरी व असमाधानी असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दि.२९.१०.०९ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२६.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन परिशिष्ट-२ मधील ४ पात्र धारकांना चुकीच्या पध्दतीने पात्र करण्यात आले, त्यांना अपात्र करण्यात यावे अशी मागणी केली होती. सदर प्रकरणी उप जिल्हाधिकारी यांनी अपीलकारास दि.२६.११.०९च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०००/२**

**श्री. किरण निवृत्ती कोंडमगीरे,**
**सी-१, तळ मजला, गौरी इमारत,**
**प्लॉट नं.६ आणि ७, सेक्टर ५,**
**न्यु पनवेल(पूर्व),नवी मुंबई ४१० २०६.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**रजिस्ट्रार यांचे कार्यालय,**
**मुंबई युनिव्हर्सिटी, फोर्ट कँपस,**
**मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**रजिस्ट्रार यांचे कार्यालय,**
**मुंबई युनिव्हर्सिटी, फोर्ट कँपस,**
**मुंबई-४०० ००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. किरण कोंडमगिरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.१.२०१० रोजी अर्ज करुन Law of Evidance या पेपरचे पुर्नमुल्यांकन करण्याकरीता दि.१०.११.०९ रोजी अर्ज केला आहे. सदर अर्जानुसार पुर्नमुल्यांकनाचा निकाल केव्हा मिळणार याबाबत माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपलकाराने प्रथम अपील दाखल कले. प्रथम अपीलीयअधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी सुनावणीचेवेळी उत्तरवादीने आयोगासमोर असे प्रतिपादन कले की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती तयार आहे. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत आयोगाचे आदेश झाल्यास अपीलकारास माहिती पुरविण्यात येईल. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांकः२९.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०२४/२**

**श्री. जमीर अहमद लतीफूर रेहमान शेख,**
**यु.टी.नं.९९४, सर्कल नं.६/२, मुंबई सेंट्रल जेल,**
**आर्थर रोड, मुंबई-४०००११.** **..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त,**
**पोलीस उपायुक्त(मु.), दहशतवाद विरोधी पथक,**
**सर जे.जे. रोड,**
**नागपाडा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दहशतवाद विरोधी पथक,**
**सर जे.जे. रोड,**
**नागपाडा, मुंबई-४००००८.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. जमीर अहमद लतीफूर रेहमान शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.८.२००९ रोजी अर्ज करुन भोईवाडा, चंदन चौकशी, काळा चौकी, नागपाडा पोलीस स्टेशन ए.टी.एस.मधील एस.डी.इ. संबंधीच्या डायरीच्या नोंदीची माहिती मागीतली होती. अपीलकारास दि.२५.७.०६ रोजी मुंबई लोकल रेल्वे बॉंब स्फोट गुन्हा मोक्का स्पेशल केस क्रमांक २१/०६ मध्ये अटक करण्यात आलेली असून अपीलकाराविरुध्द ३०.१.०९ रोजी विशेष मोक्का न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याच दिवशी अपीलकारास पुरावा म्हणून सादर केलेल्या सर्व कागदपत्रच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. अपीलकाराविरुध्द दाखल केलेला गुन्हा न्यायप्रविष्ठ असल्यामुळे न्यायालयाच्या परवानगीशिवाय गुन्हयाशी संबंधीत असलेली कोणतीही माहिती देता येत नाही. उक्त अधिनियमातील कलम ८(१)(ख)अन्वये नाकारण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी दि.५.१०.०९च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१७.११.०९ रोजी आदेश पारित

करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दारखल केले.

सदर अपीलावर दि.२१.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पोलीस स्टेशन ए.टी.एस.मधील एस.डी.इ. संबंधी डायरीच्या नोंदीची माहिती मागीतली हूती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध माहिती पुरविली आहे. उर्वरित माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(a)(b)अनुसार नाकारली आहे. सदर पकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०६३/२**

**श्री. ओमप्रकाश पानवार,**
**रुम नं.डी-१-१-२, सेक्टर ६,**
**नेरुळ, नवी मुंबई-४००७०६.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,**
**छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊंड,**
**छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. ओमप्रकाश पानवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.२.२०१० रोजी अर्ज करुन अपीलकाराची मुलगी पियंका हिला एम.जी.एम.मेडीकल कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतांना तीने जी अंडरटेकींग दिली होती त्याची प्रत मागीतली होती. अंडरटेकींग असे म्हणते की, ॲडमिशन देतांना उमेदवार असे लिहून देतो की,"मी ९० दिवसाच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करीन. तसे न केल्यास ॲडमिशन रद्द होऊ शकेल याची मला कल्पना आहे."प्रयत्न करुनही कागदपत्र सापडली नाहीत म्हणून उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर प्रकरणी अपीलकाराने क्र.मुमाआ-४५३८९/अपील क्र.५३०८/०२ हे द्वितीय अपील मा. मुख्य माहिती आयोगाकडे दाखल केले होते. सदर प्रकरणी द्वितीय अपीलावर मा. मुख्य माहिती आयुक्तांनी सुनावणी आयोजित करुन दि.९.२.२०१० रोजी आदेश पारित केले आहेत.अशा परिस्थितीत पुन्हा अपीलकार, उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्याची आवश्यकता नाही.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७००३/२**

**श्री. अब्बास अली हसन अली भिण्डरवाला,**
**रमाबाई माया भगत निवास,**
**रुम नं.२१,२२, तिसरा माळा,**
**ठाकूर पाडा, मुंबई पनवेल रोड, मुंब्रा,ठाणे-४००६१२.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**मुंब्रा प्रभाग समिती कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका,महानगरपालिका भवन,**
**डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,पाचपाखाडी,**
**ठाणे-४००६०२.**

**जन माहिती अधिकारी,**
**ठाणे महानगरपालिका,महानगरपालिका भवन,**
**डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी,पाचपाखाडी,**
**ठाणे-४००६०२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अब्बास अली हसन अली भिण्डरवाला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.१.२०१० रोजी अर्ज करुन रस्ता रुंदीकरणामध्ये दुकान तोडण्यात आले. सदर दुकान कधी व कोणाच्या आदेशान्वये तोडण्यात आले, दुकान रोज एंटरप्रायझेस नावाने ओळखले जात होते, सदर दुकान जलगावकर बिल्डिंग जुना मुंब्रा-पनवेल रोड, मुंब्रा बाजार, मुंब्रा, जिल्हा-ठाणे तोडल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित उपस्थित होते, जन माहिती अधिकारी नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन रोज एंटरप्रायझेस दुकान तोडल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता उत्तरवादी अनुपस्थित होते. अपीलकारास बदली जागा दिल्याचे सदर प्रकरणी दिसून येत नाही. अपीलकाराचे दुकान जुना पनवेल रोडवर असल्याने, रस्ता रुंदीकरणांतर्गत कारवाईत तोडण्यात आलेले असल्याने, सदर दुकानाची कर आकारणी रद्द करण्यात आल्याचे समजते असे सहाय्यक आयुक्त,ठाणे महानगरपालिका यांनी अपीलकारास दि.२५.८.०८ रोजी कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसते. अपीलकारास पर्यायी जागा दिलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकारास त्याचे दुकान रस्ता रुंदीकरणात तोडल्याबाबत पर्यायी जागा देणेबाबत केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०६५/२**

**श्री. किर्ती अमृतलाल राणा,**
**अध्यक्ष, नवी मुंबई मर्चंट्स चेंबर, तळमजला,**
**मध्यवर्ती सुविधा इमारत, बाजार-१, विकास टप्पा-२,**
**मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, सेक्टर-१९, तुर्भे,**
**वाशी, नवी मुंबई-४००७०३. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह निबंधक,**
**सहकारी संस्था(सिडको),**
**तिसरा माळा, रायगड भवन,**
**सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकारी संस्था(सिडको),**
**तिसरा माळा, रायगड भवन,**
**सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.किर्ती अमृतलाल राणा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

फाम को.ऑप.हौ.सोसायटी लि.कोपरखैरणे, नवी मुंबईचे संबंधात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ८८ नुसारची कार्यवाही बाबत मा. सहकार आयुक्त तथा सहकार निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना २४ ऑक्टोबर २००९ रोजी पाठविलेल्या(संलग्न छायाप्रत) पत्राद्वारे त्यांनी योजलेली/निर्धारिलेली उपाययोजना या विषयीची माहिती उपलब्ध व्हावी ही विनंती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचा दि.१.१२.०९चा माहितीचा अधिकारातील अर्ज उपनिबंधक, सहकारी संस्था(सिडको),बेलापूर नवी मुंबई यांचेकडे दि.१६.११.०९ च्या पत्रान्वये हस्तांतरीत केला. सदर कार्यालयाशी संपर्क साधावा असे अपीलकारास उत्तरवादीने

दि.१४.१२.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२५.१.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकाडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन फाम को.ऑप.हौ.सोसायटी लि.कोरपखैरणे, नवी मुंबईचे संबंधात कारवाई करण्याबाबत पाठविलेल्या पत्राबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. सदर संस्थेच्या वैधानिक लेखा परिक्षणातील नोंदी गैरव्यवहाराबाबत नियमानुसार चौकशी करण्याची अपीलकाराची मागणी आहे. लेखा परिक्षण अहवालावर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास पुरवावयाची आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, लेखापरिक्षणात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यासंबंधी आवश्यक ती कारवाई तात्काळ सुरु करावी व अनुपालन करावे. दोष, उणिवा दूर कराव्यात आणि अपिलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०६९/२**

**श्री. अरुण गणपत भोवर,**
**अे/६०३, साई आशिष, जन कल्याण बँकेच्या बाजूला,**
**स्टेशन रोड, विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, २रा मजला, रुम नंबर ३६९, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी(प्र.श्रेणी-१),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, २रा मजला, रुम नंबर ३६९, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अरुण गणपत भोवर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.२.२०१० रोजी अर्ज करुन अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था लि.इ.क्र.१६७ कन्नमवार नगर विक्रोळी(पूर्व) मुंबई -४०००८३ या संस्थेच्या दप्तराचा ताबा नैसर्गिक न्यायाने उपनिबंधकांकडून प्रशासकाला दिला जात नाही, याबाबत माहिती मागीतली होती. अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था म.,विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३ या संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा प्रशासकास देणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० अन्वये कार्यालयाच्या स्तरावरील कार्यवाही दि.२८.७.०९ व २.२.२०१०रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेला आहे असे जन माहिती अधिका-यांनी दि.८.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अरुण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दफ्तराचा ताबा प्रशासकाला देणेबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०६८/२**

**श्री. दत्ताराम जनार्दन तांडेल,**
**संभाजी सेवा मंडळ, रुम नं.३९,**
**जवाहर नगर, संत घाडगे महाराज मार्ग,**
**गोळीबार रोड, खार(पूर्व), मुंबई-४०००५५.** **..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहमुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, ३रा माळा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह भूव्यवस्थापक(बांद्रा),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, ३रा माळा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दत्ताराम तांडेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.२.२०१०,५.२.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

मौजे बांद्रा(पूर्व), तहसिल अंधेरी जवाहर नगर, गोळीबार संत गाडगे महाराज मार्ग येथिल न.भू.क्र.१३(पै)३३(पै)या भूखंडावरील संभाजी सहकारी गृहनिर्माण संस्था या ठिकाणी दि.२९.१.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या कार्यालयातील श्री.साटम यांनी काही झोपडयांचा पुर्नसर्व्हे केला तसेच परिशिष्ट २ नुसार किती झोपडयांचा पुर्नसर्व्हे करण्यात आला व किती झोपडया वाढीव दाखविण्यात आलेल्या आहेत, ज्या झोपडयांचा सर्वे करण्यात आला त्यांनी पात्र होण्यासाठी जे कागदपत्र सादर केले त्याच्या छायाप्रती, सर्व्हेसाठी संस्थेने दिलेले पत्र या संपूर्ण सर्व्हेबाबतची संपूर्ण अहवालाच्या छायाप्रती साक्षांकित करुन देण्यात याव्यात.

मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित वेळेत मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१८.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याचे आत पुरवणी परिशिष्ट-II तयार करावे आणि अपिलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/६०६४/२**

**श्री. अविनाश बी. घोडके,**
**फ्लॅट नं.०३, पहिला मजला,**
**मुखर्जी बिल्डिंग, अेअर फोर्स,**
**सायन(पूर्व), मुंबई-४०००२२.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मंबई(१) शहर,**
**मल्होत्रा हाऊस, सहावा मजला,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अविनाश घोडके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.१.२०१० रोजी अर्ज करुन श्री.राजकुमार पाटील आणि इतर यांची मालमत्ता आणि दायित्व, शैक्षणिक पात्रता, शसन सेवेत रुजु झाल्याचा दिनांक व वर्ष, वर्षनिहाय विभागातील पदस्थापना, वेतन,भत्ते, प्रतिपूर्ती इत्यादी माहिती मागीतली होती. मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असून माहितीचाअधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.१०.२.२०१०च्या पत्रन्वये अपिलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई यांनी अपीलकाराने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक १ ते ७ व III पैकी मुद्दा क्रमांक ४,५ व ६ ची माहिती विहित शुल्क आकारुन अपीलकारास देण्यात यावी असे आदेश दि.६.४.२०१० रोजी पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.राजकुमार पाटील आणि इतर यांची मालमत्ता आणि दायित्व,शैक्षणिक पात्रता, शासन सेवेत रुजु झाल्याचा दिनांक व वर्ष, वर्षनिहाय विभागातील पदस्थापना, वेतन व भत्ते, प्रतिपूर्ती इत्यादी माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी अर्जातील मुद्दा क्रमांक ४,५,६ बाबतची माहिती देण्यात आली असून उर्वरित मुद्यांबाबतची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने उत्तरवादीने योग्यरित्या नाकारली आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक कारवाई केली असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०२७/०२,**

**श्री. प्रभाकर बी. भंडारे,**
**बी-३०३, उषा कॉंप्लेक्स, खंडेलवार मार्ग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००७८. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक(मासं-अतां ),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित क.लि.,**
**हयुमन रिसोअर्सेस डिपार्टमेंट, प्लॉट नं.सी-१९,**
**इ ब्लॉक,७वा मजला, बांद्रा कुर्ला कॉंप्लेक्स,**
**बांद्रा(पूर्व), मंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. प्रभाकर भंडारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.७.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. २३.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.३.२०१० रोजी अर्ज करुन केंद्र शासन/राज्य शासन/खाजगी क्षेत्रातील कार्यकारी पदाच्या सरळसेवा भरती संबंधीच्या वेतन संरक्षणासंबंधीचे नियम, सर्व कार्यकारी पदांची यादी, अनुज्ञेय भत्ते, प्रतिपूर्ती इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.३(१) आणि मुद्दा क्र.(३ a) व (३b) बाबत माहिती देणे शक्य नाही. मुद्दा क्र.३(२)ची माहिती तयार असून माहिती पुरविण्याच्या शुल्कापोटी रु.४२/- शुल्क कार्यालयात भरणा करुन माहिती घेऊन जावी असे कार्यालयाने दि.१९.४.२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने दि.१६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील मुदतपूर्व आणि चुकीच्या अपीलीय अधिका-यांकडे अपीलकाराने केल्याचे दिसून येते. वास्तविक, अर्जदारास दि.२२.४.२०१० नंतर मुख्य महाव्यवस्थापक(मासं)यांचेकडे तक्रार सादर करणे आवश्यक होते असे गैरतक्रारदाराने लेखी अहवाल आयोगास सादर करुन तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती देऊ केली होती.

परंतु तक्रारदार कार्यालयाकडे फिरकलेच नाहीत. माहितीपोटी शुल्क भरले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने कार्यालयात माहितीकरीता विहित शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करावी. तक्रारदाराने शुल्क भरणा केल्यानंतर गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०१८/२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी/सं.गा.,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामशंकर सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.९.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)संक्रमण शिबीरामध्ये आज पर्यंत प्रकल्प बाधित व्यक्ति(PAP) यांना किती रुम वाटप करण्यात आले? नांव, रुम क्र.,इमारत क्र. याबाबत संबंधीत सविस्तर माहिती यादी मिळण्याबाबत.

२)सदर संक्रमण शिबीरामध्ये किती पुनर्वसन योजना मार्फत व्यक्ती यांना संक्रमण शिबीर वाटप करण्यात आले याबाबत नांव,रुम क्र., इमारत क्रमांक सह संबंधित सविस्तर माहिती यादी साक्षांकित मिळण्याबाबत.

३)सदर संक्रमण शिबीराच्या इमारतीत आजपर्यंत किती इमारत आणि रुम क्रमांक रिकामी आहे याबाबत संबंधीत सविस्तर साक्षांकित माहिती मिळण्याबाबत.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. जाणुनबुजून टाळाटाळीचे उत्तर देऊन अपीलकारास खूप नाचविल्याच्या करणावरुन अपीलकाराने दि.७.९.०९

रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. म्हाडापासून दादर विभागाकडे पाठविले. दादर विभागाशी संबंधीत नाही, म्हाडा कार्यालयाश्षी संपर्क साधावा असे दादर विभागाच्या कार्यालयाने अपीलकारास कळविले. अशी टाळाटाळी केल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकारास ट्रान्झीट कँपमध्ये पीएपीने सामावून घेतले नाही. ट्रान्झीट कँपमध्ये अपीलकारास सदनिका दिली नाही. ट्रान्झीट कँप बांधण्यात आला नाही. त्यामुळे ट्रान्झीट कँपचे वाटप करण्यात आलेले नाही असे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०९४/२**
**/७०९३/**

**श्री. अर्जुनलाल एम.छाब्रिया,**
**बेला व्हिस्टा,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक व एल.आय.सी.ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका सहा.पालिका आयुक्त आर/उत्तर विभाग**
**यांचे कार्यालय,**
**संगीतकार सुधीर फडके उड्डाणपूलाखाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर(प.),**
**मुंबई-४०००६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका सहा.पालिका आयुक्त आर/उत्तर विभाग**
**यांचे कार्यालय,**
**संगीतकार सुधीर फडके उड्डाणपूलाखाली, जयवंत सावंत मार्ग, दहिसर(प.),**
**मुंबई-४०००६८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अर्जुनलाल छाब्रिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.६.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.१.२००९ रोजी अर्ज करुन अपीलकाराचे अशील श्री.गोविंद सखाराम कापसे, पत्रकार यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईबाबत अनुषंगिक विविध मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.११.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१.७.२०१० रोजी आयोजित केलेली सुनावणी दोन्ही बाजूच्या विनंतीनुसार दि.३०.६.२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी प्रथम अपीलीय

अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराच्या अशीलाने केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास, द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमक्ष माहिती पुरविली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४८/२**

**श्री. नवीन रामचंद्र लादे,**
**चिराग व्हिला, माणिकामा लगत,**
**अंधेरी(पू.), मुंबई-४०००९३.** ..... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा भूमिशाखा अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए.(लँड्स सेल),**
**बांद्रा-कुर्ला काँप्लेक्स, बांद्रा(पूर्व), मंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए.(लँड्स सेल),**
**बांद्रा-कुर्ला काँप्लेक्स, बांद्रा(पूर्व), मंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. नविन रामचंद्र लादे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.४.२००९ रोजी अर्ज करुन विजय नगर, मरोळ, अंधेरी(पूर्व) येथील झोपडपट्टीच्या निष्कासनाची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन विजय नगर,मरोळ, अंधेरी(पूर्व) येथील झोपडपट्टीच्या निष्कासनाची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली

नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत निःशुल्करित्या पोच देय डाकेने माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०४७/२**

**श्री. रविंद्र वामन सारंग,**
**खोली क्र.१२८,गोविंदवाडी,**
**सिनेमॅक्स समोर, अंधेरी कुर्ला रोड,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा भूमिशाखा अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए.,**
**बांद्रा-कुर्ला कॉंप्लेक्स, बांद्रा(पूर्व), मंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए.,**
**बांद्रा-कुर्ला कॉंप्लेक्स, बांद्रा(पूर्व), मंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रविंद्र सारंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.३.२०१० रोजी अर्ज करुन वेस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या रुंदीकरण प्रकल्पातील बाणडोंगरी कांदीवली(पूर्व) नकाशा क्र.१३ येथील माहिती अधिकार अर्जातील नमूद झोपडयांचे निष्कासन झाले अथवा नाही याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन झोपडयांचे निष्कासनाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास नि:शुल्करित्या पोच देयस डाकेने माहिती पाठवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०२५/२**

**ॲड.श्री. सिमना अकोल अयुब,**
**९,फिरदोस सोसायटी,**
**औदुंबर स्टॉपजवळ, जुने सिडको,**
**नाशिक-४२२००९. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव(वने),**
**महसूल व वन विभाग(फ-७),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**महसूल व वन विभाग(फ-७),**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार ॲड.श्री. सिमना अकोल अयुब यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.८.२००९ व ७.९.२००९ रोजी अर्ज करुन खालील मुद्यांवर माहिती मागीतली होती.

अ)श्री.व्ही.डी.चाफेकर भावसे,सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त,नाशिक यांचे दि.३१.१२.२००५ रोजीचे मत्ता व दयित्व विवरणपत्राची साक्षांकित प्रत

ब)श्री.व्ही.डी.चाफेकर,भावसे यांच्या सेवापुस्तकाचे(रजा तपशील सोडून)प्रत्येक पानाची साक्षांकित प्रत

क)मागासवर्गीय असल्यास, जात व वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

ड)भावसे अधिका-यांची अद्ययावत ज्येष्ठतासूची

इ)श्री.चाफेकर यांच्याशी संबंधीत मागील ४ वर्षातील बदली आदेशाची साक्षांकित प्रत

फ)श्री.चाफेकर यांच्याशी संबंधीत विभागीय चौकशी संदर्भात दोषारोप पत्र व बजावण्यात आलेलया शिक्षेची प्रत.

जन माहिती अधिका-यांनी दि.६.१०.०९ च्या पत्रन्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. कार्यासनात उपलब्ध असलेल्या भावसे अधिका-यांच्या सिव्हील लिस्टवरुन महाराष्ट्र संवर्गातील भावसे अधिका-यांची जेष्ठतासूची पृष्ठसंख्या अपीलकारास कळवून त्याकरीता लागणारे आवश्यक शुल्क अपीलकाराने भरल्यानंतर अपीलकाराला माहिती पुरविण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३.१२.०९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दि.११.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. प्रथम अपीलावरील आदेशाचे पालन केले. वैयक्तिक त्रयस्थ स्वरुपाची मुद्दा क्र.१ व २ बाबतची माहिती नाकारली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.व्ही.डी.चाफेकर,भावसे सह संचालक, सामाजिक वनीकरण यांचेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. जी माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आलेला आहे अशी माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०३१/२**

**श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण गोवेकर,**
**४२५/६,फातिमाबाई कासम चाळ,**
**न्यू मिल समोर, कर्ला(पश्चिम), मुंबई-४०००७०. ..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त(मुख्या-१),**
**पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(मुख्या-१),**
**पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हरिश्चंद्र गोवेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

अपीलकाराच्या सेवापुस्तकातील भरतीचा दिनांक दुरुस्त होणेबाबत मा.पोलीस उप-आयुक्त,(मुख्या.कक्ष-९),मा.पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई यांचे कार्यालयात दि.१६.३.२००९ रोजी विनंती अर्ज सविनय सादर केलेला आहे. सदरच्या विनंती अर्जावर सशस्त्र पोलीस वरळी या कार्यालयाचा जा.क्र.३२९६ दि.१७.३.२००९ असा आहे.

सदरचा अपीलकाराचा विनंती अर्ज मा.पोलीस उपआयुक्त(मुख्यालय-२) कक्ष-९, बृहन्मुंबई या कार्यालयास कोणत्या दिनांकास प्राप्त झाला त्याचा आवक क्रमांक व दिनांक तसेच त्यावरील माननीय वरिष्ठांचे आदेश आणि दि.१७.३.२००९ पासून आजपर्यंतच्या कार्यालयीन टिप्पण्या व त्यावरील मा.वरिष्ठांचे आदेश यांच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत विनंती आहे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.१.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अपीलकाराचा अर्ज हा मानीव दिनांक देण्याबाबत व सेवापुस्तकामध्ये भरतीचा दिनांक दुरुस्त होणेबाबत असून तो दिनांक १८.३.०९ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जातील मानीव दिनांकासंबंधी

सादर केलेल्या टिप्पणीची प्रत तसेच अपीलकारास पाठविलल्या उत्तराची प्रत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२१.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसात कार्यवाही करुन अपीलकारास त्याबाबत कळवावे असे दि.४.२.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवापुस्तकामध्ये भरतीचा दिनांक दुरुस्त करण्यासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या पोलीस भरतीचा त्यांच्या सेवापुस्तकातील दिनांक दुरुस्त करुन अपीलकारास त्याबाबत कळवावे,अहवाल सादर करावा असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी आवश्यक ती कारवाई करुन अपीलकारास कळविले नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून१५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०१९/२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,**
**संत राहीदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त(परिमंडळ-३),**
**भायखळा(पूर्व), मुंबई-२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,भायखळा(पूर्व),मुंबई-२७.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामशंकर सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२.३.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

धारावी पोलीस ठाणेमधील दैनंदिनी नोंदवहीनुसार पीएसआय महाजन आणि पो.शि.श्री.जगताप दोघे दि.३.१२.०८ रोजी उत्तर प्रदेश रवाना आणि दि.१४.१२.०८ रोजी धारावी पो.ठाणेस हजर या दरम्यान उत्तर प्रदेश येथे १२ दिवस दोघे पोलीस कोणत्या ठिकाणी मुक्काम(राहण्यास व्यवस्था) केली होती आणि त्यांचे जेवणाची व्यवस्था ऑन डयुटी कुठे होती? या संबंधीत लॉज,हॉटेल बील, इत्यादी साक्षांकित कागदपत्राची माहिती मिळण्याबाबत, तसेच प्रवास भत्ता संबंधित बीलाची साक्षांकित प्रत मिळण्याबाबत.

सदर प्रस्तावाबाबत कोणतेही प्रवासभत्ता बिल सादर कलेले नसल्यामुळे अभिलेखावर कोणतीही माहिती उपलब्ध नाही अशी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरिक्षक धारावी पोलीस ठाणे, मुंबई यांनी अपीलकारास दि.८.४.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी जाणूनबुजून माहिती दिली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

धारावी पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक उत्तरप्रदेश येथे चौकशीच्या कामाकरीता गेले होते. त्यांची कोणत्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था केली होती, त्यांची जेवण्याची व्यवस्था कुठे होती याबाबत अपीलकाराने माहिती मागीतली आहे. संबंधीत पोलीस उपनिरिक्षकांनी प्रवासाबाबत कोणतेही प्रवासभत्ता बिल सादर केलेले नसल्यामुळे अभिलेखावर कोणतीही माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.४.२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०१४/२**

**श्री. गोविंद दिगंबर सुडके,**
**ए-१०२, आशापुरा धाम, सेक्टर-१६,**
**शिवमंदिर समोर, मोराज कॉंप्लेक्स जवळ,**
**सानपाडा, नवी मुंबई-४००७०५.** ..... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सह.आयुक्त,**
**विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, माझगांव, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, माझगांव, मुंबई.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. गोविंद दिगंबर सुडके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

अ)अपीलकर्त्याने सेवानिवृत्तीनंतर मिळणारे सेवा उपदान,रजारोखीकरण इ.रोखून धरण्यासंबंधीच्या आदेश/सूचनांच्या प्रती तसेच त्याबाबत कार्यवाही पत्रक/टिप्पणी पत्राच्या प्रती मिळणे.

ब)अपीलकर्ता शासकीय सेवेत असतांना, शासनाची कोणत्या प्रकरणात महसूल हानी अथवा आर्थिक नुकसान केले आहे. ही महसुल हानी तात्पुरती की कायम स्वरुपी आहे? महसूल हानी किती आहे? महसूल हानी/आर्थिक नुकसान निश्चित करण्यासाठी केलेल्या मोजदादीची विवरण प्रत मिळावी. तसेच सदर महसूल हानीस अपीलकर्त्याव्यतिरिक्त विक्रीकर विभागातील कोणते अधिकारी दोषी होते. त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली, दोषारोप ठेवण्यात आले काय? व केलेल्या कारवाईची सद्यस्थिती बाबत सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळाव्यात अशी मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन केले. या व्यतिरिक्त अपीलकारास कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. जन माहिती अधिका-यांनी संबंधीत अभिलेख निरिक्षणाकरीता अपीलकारास उपलब्ध करुन द्यावे. निरिक्षणानंतर मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरवावी असे नमूद करुन दि.३.२.२०१० रोजी आदेश पारित केले. अपूर्ण, चुकीची,दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर माहिती पुरविली. सेवानिवृत्त उपदानाची रक्कम अपीलकारास दिलेली नाही हा मूळ मुद्दा आहे. सदर प्रकरणी अपीलकाराची विभागीय चौकशी चालू आहे. नियमानुसार चौकशी पूर्ण होईपर्यंत अपीलकारास उपदान देय नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०१७/२**

**श्री. विठोबा एकनाथ अटक,**
**मु.पो.खालापूर, पोलीस लाईन,**
**ता.खालापूर,जि,रायगड. ..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**रायगड,ता.अलिबाग,**
**जि.रायगड.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप-अधीक्षक,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**रायगड,ता.अलिबाग, जि.रायगड ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. विठोबा अटक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.८.०९ रोजी अर्ज करुन पोलीस अधीक्षक दिघावकर यांनी खालापूर पोलीस ठाणेची वार्षिक तपासणीवेळी अपीलकाराने अर्ज सादर केला होता, त्या अर्जाची चौकशी केलेल्या संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. सदर माहिती समाधानकारक नाही. माहिती पूर्णपणे मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाई संबंधीची अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, प्रथम अपीलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी माहिती प्राप्त करुन अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०२६/२**

**श्री. विजय कोंडय्या मंथेना,**
**७/३४, अब्दुल्ला मेन्शन,**
**हरियानावाला लेन, स्टेशन रोड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**सहाय्यक पालिका आयुक्त के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**पालिराम पथ, बेस्ट डेपोसमोर,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**सहाय्यक पालिका आयुक्त के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**पालिराम पथ, बेस्ट डेपोसमोर,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विजय मंथेना यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.४.१२.०९ रोजी अर्ज करुन बी.एस.ई.एस.रुग्णालय संचालकांनी ओ.के. इमेजिंग/सी.टी.स्कॅन मशिनरीच्या केलेल्या नोंदणीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ८ बाबत माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.२९.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२१.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दिनांक ११.३.२०१० रोजी आदेश पारित केले. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सी.टी.स्कॅन मशीनबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सी.टी.स्कॅन मशिनविषयीची कोणतीही कागदपत्र उपलब्ध नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. सदर माहितीवरुन मशिनची नोंद घेण्यात आली नव्हती. सी.टी.स्कॅन मशिन कार्यरत होती असे अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यामध्ये काहीही विरोधाभास दिसून येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः ३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०२४/२**
**/७०२१/**

**श्री. कल्पेश संघवी,**
**डायमंड क्वीन बिल्डिंग,**
**दुसरा मजला, ऑफीस नं.२०८,**
**१९८, राजा राम मोहन रॉय मार्ग,**
**मुंबई-४००००४.** ..... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय,**
**ॲनेक्स बिल्डिंग, महापालिका मार्ग,**
**सी.एस.टी.स्टेशन,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा परवाना विभाग,**
**मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय,**
**ॲनेक्स बिल्डिंग, महापालिका मार्ग,**
**सी.एस.टी.स्टेशन,**
**मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. कल्पेश संघवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.६.९.०९ रोजी अर्ज करुन मुंबई शहरात जाहिरात Gadgets किती आहेत याबाबत एकूण २७ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.५.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. उत्तरवादीकडून बरीच पत्र मिळाली परंतू समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मुंबई शहरातील जाहिरातीच्या Gadgets बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती विहित कालावधीत पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी गेल्या दोन वर्षापासूनची जाहिरातीच्या Gadgets बाबतची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०२१/२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्रमांक २,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त(परि.-३),**
**मध्य नियंत्रण कक्ष, भायखळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष, भायखळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामशंकर सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.३.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)पी.एस.आय. महाजन धारावी पोलीस ठाण्यात केव्हापासून कार्यरत आहेत?

२)धारावी पोलीस ठाण्यात कार्यरत असल्यानुसार किती वेळा शासकीय तपास व कारवाई संबंधित मुंबईच्या बाहेर गेले?

३)तपास अंतर्गत पीएसआय महाजन जेथे जेथे गेले त्या ठिकाणाचे नांव आणि वारंट व तिकिट आणि स्टेशन डायरीत नोंद रवाना व हाजिरबाबत साक्षांकित माहिती मिळण्याबाबत.

४)पीएसआय महाजन यांनी किती वेळा व कोणत्या तपासासंबंधीत प्रवासभत्ता घेतला? साक्षांकित माहिती व त्यांची संबंधीत प्रत व नोंद असलेली डायरीची साक्षांकित प्रत.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.४.२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. धारावी पोलीस ठाण्याच्या दि.७.५.२०१०अन्वये अपीलकारास माहिती देऊन दुय्यम प्रतीवरअपीलकाराची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आली. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अभिलेखावर जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी माहिती अपीलकारास दिली असल्याचा लेखी अहवाल जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५०२२/२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम क्रमांक २,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई-४०००१७.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त(परि.-३),**
**मध्य नियंत्रण कक्ष, भायखळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष, भायखळा(पूर्व),**
**मुंबई-४०००२७.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. रामशंकर सरोज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.३.२०१० रोजी अर्ज करुन धारावी पोलीस ठाणे येथील दि.९.४.०९ रोजीच्या दैनंदिनी नोंदवही संबंधीत माहिती, पोलीस स्टेशन डायरीमध्ये नमूद मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करण्यात आले आहे का? त्याने योग्य जामीन सादर केल्यास त्यास जामीनावर सोडता येईल अशी माहिती अपीलकारास दिली त्याचा संबंधीत पुरावा देण्यात यावा, साक्षांकित प्रत द्यावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथमअपीलीय अधिका-यांनीसुनावणी आयोजित केली. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, धारावी पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अपीलकारास देऊन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आली. मागणीप्रमाणे माहिती

मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराच्या अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, धारावी पोलीस ठाणे यांनी अभिलेखावरील जेवढी उपलब्ध माहिती आहे तेवढी अपीलार्थी यांना यापूर्वीच दिलेली आहे असा जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन तसे प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४४३६/२**

**श्री. दिलीप गुलाबराव बोंद्रे,**
**सहाय्यक आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग,**
**महाराष्ट्र पोलीस मुख्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरिक्षक(आस्थापना),**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरिक्षक(आस्था),**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. बोंद्रे दिलीप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.९.२०१० रोजी अर्ज करुन पोलीस निरिक्षकाच्या बदलीबाबत एकूण ८ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. योग्य माहिती मिळाली नाही, चुकीची माहिती देण्यात आली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३०.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पोलीस निरिक्षकाच्या बदलीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. उत्तरवादी हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांकः ३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/७०७०/२**

**श्री. आत्माराम कचेश्वर वाघ,**
**सी-३६, शिवाई दर्शन सोसायटी,**
**पोखरण रोड-१, शिवाई नगर,**
**ठाणे(प.), पिन-४००६०६.** **..... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कामगार उपायुक्त व अध्यक्ष,**
**सुरक्षा व रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाकरीता,**
**कॉपर रोलर्स प्रा.लि.कंपाऊंड, लालबहादूर शास्त्री मार्ग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००७८.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक,**
**सुरक्षा व रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाकरीता,**
**कॉपर रोलर्स प्रा.लि.कंपाऊंड, लालबहादूर शास्त्री मार्ग,**
**भांडूप(प.), मुंबई-४०००७८.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आत्माराम वाघ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.५.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

श्री.डी.डी.राईकर,सरकारी कामगार अधिकारी यांनी सुरक्षा रक्षक मंडळ भांडूप मुंबई येथे सचिव म्हणून कार्यभार स्विकारल्यानंतर अनुकंपा तत्वावर नोंदणी मंजूर करण्यात आलेल्या अर्जदाराची अर्ज आल्यापासून मंजूरी झाल्यापर्यंतची टिप्पणीसह माहिती.

जन माहिती अधिका-यांनी देऊ केलेली माहिती ही अर्धवट स्वरुपाची आहे म्हणून अपीलकाराने दि.१.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास देण्यासाठी जन माहिती अधिका-यांनी दि.१३.१.२०१०

रोजी माहिती तयार ठेवली होती. अपीलकाराने रु.२०/- इतके शुल्क जमा करुन माहिती घेऊन जावी असेही दि.१३.१.२०१० रोजी अपीलकारास कळविले आहे. परंतू अपीलकाराने माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावरील सुनावाणीकरीता अपीलकारास बोलावले. माहिती तयार असल्याबाबत अपीलकारास कल्पना दिली असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अनुकंपा तत्वावर महिला सुरक्षा रक्षक/सुरक्षा रक्षक म्हणून नोंदणी केलेल्या अर्जदाराचे अर्जावरील प्रक्रिया म्हणून केलेल्या कारवाईचे अनुषंगाने दस्तऐवजासह माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकारास आयोगासमक्ष माहिती दिली. आता सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९८९/०२**

**श्री. खंडू मुरलीधर घुगे,**
**३/१८, ताडदेव पोलीस वसाहत,**
**ताडदेव, मुंबई-४०००३४.** ..... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव(परिक्षा),**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक,**
**मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. खंडू घुगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.१२.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)पेपर नं.२ विधी या विषयाची माझ्या उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्रत मिळू शकते का? मिळत असल्यास त्याबाबत माहिती मिळावी.

२)पेपर नं.२ विधी या विषयाची माझ्या उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्रत मिळत नसल्यास त्याचे कारणाची मला माहिती मिळावी.

विधी विषयाचा पेपर क्रमांक-२ बाबत उमेदवारांना उत्तरपुस्तिकेची प्रत/मुखपृष्ठ देण्याची बाब उमेदवारांच्या व्यक्तिशः माहितीशी संबंधीत असल्याने तसेच माहिती देण्यात कोणतेही जनहित नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम नियम क्र.८(१)(९) नुसार उत्तर पुस्तिकेची प्रत देता

येणे शक्य नाही अशी जन माहिती अधिका-यांनी दि.१.१.०९ रोजीच्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. अपु-या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१.१२.०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विधी विषयाच्या पेपर क्रमांक २च्या उत्तरपत्रिकेच्या प्रतीची मागणी केली होती. माहितीच्या अधिकारांतर्गत उत्तरपत्रिकेच्या प्रती देता येत नाहीत. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकाराची मागणी नियमानुसार नाकरली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक:३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/४९८५/०२**

**श्री. नलीन मोतीलाल राठोड,**
**साईमगन एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**रुम नं.२, तळ मजला, पाद्री वाडी(पटेल वाडी),**
**नंदा पातकर रोड, विलेपार्ले(पूर्व), मुंबई-४०००५७. ..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ७वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायक तहसिलदार(अति./निष्का.),**
**अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ७वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. नलीन राठोड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.१.२०१० रोजी अर्ज करुन परिशिष्ठ-२ कामी विकासक, आर्कीटेक्ट,सोसायटी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या रेशनकार्डाच्या प्रती, परिशिष्ट-२ची संबंधीत संचिकेची तपासणी केली असता अपीलकाराने मागणी केलेल्या झोपडीधारकाच्या शिधापत्रिकेच्या प्रती आढळून येत नाहीत. त्यामुळे अपीलकाराची विनंती मान्य करता येत नाही, असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१५.२.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास पुन्हा एकदा संबंधीत संचिका निरिक्षणाकरीता उपलब्ध

करुन द्यावी. त्यानंतर अपीलकारास हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती पुरवारव्यात असे प्रथम अपलीय अधिका-यांनी दि.३१.३.२०१० रोजी आदेश पारित केले. संचिकेची तपासणी मागीतलेली नसतांना संचिकेची तपासणी करण्याचे आदेश दिले. काही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन परिशिष्ट-२ ची दाखल नकाशाची प्रत,रेशनकार्डाच्या प्रती इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. एसआरए योजनेतील ३१ व्यक्तीच्या रेशनकार्डाच्या प्रती संचिकेवर उपलब्ध नसल्याने माहिती पुरविता येत नसल्याचे उत्तरवादीने अपीलकारास कळविले आहे. ३१ व्यक्तींकडून रेशनकार्डाच्या प्रती गोळा करुन अपीलकारास पुरविण्याचीबाब माहितीच्या अधिकारात मान्य करता येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**मुंबई**
**दिनांक:३०.६.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०२८/०२,**

**श्री.दौलत डी. गुना,**
**अे-३, गुंडेचा को.ऑप. हौ.सो.,**
**हेमू कलानी रोड नं.३, ईरानीवाडी, कांदिवली(प.),**
**मुंबई-४०००६७. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालिका आयुक्त आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,**
**एम.जी.एक्स रोड नं.२, एस.व्ही.पी. तरण तलावाजवळ,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००६७. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.दौलत गुना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२०.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे रोजी अर्ज करुन अवैधरित्या केलेल्या बांधकामाबाबत/प्रस्तावित अवैध बांधकामाबाबत तक्रारी करुन तक्रारींवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदाराच्या तक्रारीवरील कारवाईची माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराच्या तक्रारी संदर्भात कार्यालयाच्या कर्मचा-यांनी पहाणी केली असता पक्षकारांनी प्लॅस्टरींग, प्लंबींग, लाद्या बसविणे आदी किरकोळ स्वरुपाची कामे केल्याचे आढळून आले आहे. सबब कोणतीही कारवाई कार्यालयामार्फत प्रस्तावित करता येत नाही असे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदाराच्या तक्रारीनुसार गैरतक्रारदाराने कार्यालयामार्फत निरिक्षण करुन तसा अहवाल दिला आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०२९/०२,**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**बेला व्हिस्ता,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक व एल.आय.सी. ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालिका आयुक्त आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**संगीतकार सुधीर फडके फ्लाय ओव्हर खाली, जयवंत सावंत मार्ग,**
**दहिसर(प.), मुंबई-४०००६८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. अर्जूनलाल छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.९.१०.०९ रोजी अर्ज करुन श्री.गोविंद सखाराम कापसे यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती दिली नसल्याने तक्राराराने आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/४४००/०२ हे दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२५.३.२०१० रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

श्री.गोविंद कापसे यांनी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास पाठविली. आयोगाच्या दि.२५.३.२०१० च्या आदेशाचे पालन केले असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमक्ष माहितीची अतिरिक्त प्रत अपीलकारास पुरविली. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारानेआयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे. तक्रारदारास माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०३०/०२,**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**बेला व्हिस्ता,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक व एल.आय.सी. ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. अर्जूनलाल छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२.१.१० रोजी अर्ज करुन श्री.मयूर सी.पारीख, मेसर्स एम.आर.एंटरप्रायझेस, शॉप क्रमांक ५, ठक्कर बाप्पा कॉलनी, कुर्ला(पूर्व), मुंबई यांच्याविरुध्द दि.२२.६.०९ रोजी वैयक्तिक तक्रार दाखल केली होती, सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने आयोगाकडे द्वितीय अपील क्रमांक २००९/४५६०/०२ हे सादर केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराचा तक्रार अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)अनुसार पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडे दि.३.७.०९ च्या पत्रान्वये पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला. तसे अपीलकारास दि.११.११.०९च्या पत्रान्वये कळविले असल्याचा लेखी अहवाल गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर केला. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने नियमानुसार कारवाई केली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०७७/०२,**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**बेला व्हिस्ता,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक व एल.आय.सी. ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालिका आयुक्त, एल विभाग यांचे कार्यालय,**
**लक्ष्मणराव यादव मार्केट, एस.जी बर्वे मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. अर्जूनलाल छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२९.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराच्या अशीलाने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन खीरानी रोड, यादव नगर, साकीनाका, मुंबई येथील सर्व्हे क्रमांक ६,सीटीएस क्र.११० पार्ट १११ येथील प्लॉटवरील बांधकामास कंपाऊंड वॉलसाठी परवानगी घतलेली आहे काय याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२०१०/४४२३/०२ हे दाखल केले होते. सदर प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती तक्रारदारास १५ दिवसाचे आत कळवावी असे आयोगाने दि.२३.३.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.११.१०.०८ रोजी पत्र पाठवून सदर प्रकरणी माहिती दिली असल्याचे गैरतक्रारदाराने दि.११.१०.०८ च्या पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.६.२०१०** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/१०३२/०२,**

**श्री. संजराज हरिश्चंद्र मंगेशकर,**
**द्वारा-श्री. महेश काशिनाथ सुर्वे,**
**८२/एफ, स्नेहा को.ऑप.हौ.सो.लि.,**
**(मुलतानी मेन्शन)ब्लॉक नं.२, ठाकूरवाडी,**
**मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग,**
**दादर(पूर्व), मुंबई-४०००१४. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी(श्रेणी-१),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. संजराज मंगेशकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. २५.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.६.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१५.९.०९ रोजी अर्ज करुन अक्षय सहकारी गृहनिर्माण संस्था, टिळक नगर, चेंबूर, मुंबई या संस्थेविरुध्द आयोजित करण्यात आलेल्या चौकशीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकाडे द्वितीय अपील क्रमांक २०१०/४३६९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ७ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१७.३.२०१० रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदाराकडून पोच पावती घेऊन चौकशी अहवालाची प्रत तक्रारदारास पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन कले. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिति पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३०.६.२०१०**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २०१०/५६१७/०२**

**श्री. भालचंद्र गायतोंडे,**
**१०, मंदार अपार्टमेंट, सरस्वती बाग,**
**केजीएस एस ओ, जोगेश्वरी(पूर्व),**
**मुंबई-४०००६०.** **..... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**मबई महानगर पालिका, के/इस्ट, २रा माळा,**
**गुंदवली, अंधेरी(पूर्व) मुंबई-४०००६९.**

**जन माहिती अधिकारी तथा असि.ॲसेसर आणि कलेक्टर,**
**मबई महानगर पालिका, के/इस्ट, २रा माळा,**
**गुंदवली, अंधेरी(पूर्व) मुंबई-४०००६९.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. भालचंद्र गायतोंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.५.२००९ व दि.२०.१०.२००९ रोजी अर्ज करुन इस्माईल गाव जोगेश्वरी(पूर्व), स्नेहा भवन- श्री. समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था लि. नटवर नगर रोड क्र.५, जोगेश्वरी(पूर्व), मुंबई येथील सीटी सर्व्हे क्र.२५,२५/१ ते ५ येथील मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. असंबंध माहिती दिली. यामुळे अपीलकाराने दि.६.१२.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयाजित केली. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन तसेच यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नसल्याने जागेची पहाणी करण्यासंबंधी नमूद करुन दि.८.१.२०१० रोजी आदेश पारित केले. सदर मालमत्तेचे पुनः निरिक्षण कोणी करावे याबाबत संभ्रम निर्माण

झाला. सदनिका धारकास मालमत्ता कर आणि दंडाची रक्कम मोठया प्रमाणात आकारण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी चुकीचा रेकॉर्ड ठेवला. मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

स्नेह भवन श्री समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्थेतील तळ मजल्यावरील सदनिका क्रमांक जी-१ व जी-२ बाबत जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती ठेवली. सदर सदनिका अपूर्ण अवस्थेत होत्या. सदर सदनिका राहण्याजोग्या नव्हत्या. सदनिकेमध्ये पाण्याचा नळ, संडास, लादी काहीच नव्हते, मनुष्याला राहण्यायोग्य सुखसोई नव्हत्या. तरी दि.१.४.२००० पासून चुकीच्या पध्दतीने मालमत्ता कर, दंड,व्याज आकारण्यात आला असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. विभागामार्फत पुन्हा सदनिकेची अपीलकारासमवेत पहाणी करण्यात आली. त्यानंतर सदर मालमत्तेचा कर सुधारित करुन रु.१,१६,६८५ इतका करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षांना एक विशेष नोटीस पाठविण्यात आली. सदर प्रकरण सहकर निर्धारक आणि जिल्हाधिकारी यांचेकडे निर्देशित करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी सदनिका धारकांना मोठया प्रमाणात मालमत्ता कर,दंड,व्याज आकारणी करण्यात आली. याबाबत अधिकृत कागदपत्र जी-२ सदनिका धारकाने अवैधरित्या शटर लावून टयुशन क्लासेस चालविले याबाबत अपीलकारास माहिती पुरवावी अशी अपीलकाराची मागणी आहे.या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांकः९.७.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**